१

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ओ. वा.
दा. क्र. ६९८१

IRBK-0106981
IRBK-0106981

पुरुषोत्तम
भास्कर
भावे

६९९१

# रक्त आणि अश्रु

[ 'सावधान' मधील लेखांचा संग्रह ]

पुरुषोत्तम भास्कर भावे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. ६९९१ नों. दि.
वि. वा.वा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३०८८
विभाग वा.वा.
क्रमांक २२६८
नों. दि.
वाचनालय शाखा

IRBK-0106981

* सर्व अधिकार लेखकाच्या स्वाधीन आहेत.

* वेष्टनावरील सजावट चित्रकार गोडसे ह्यांची आहे.

प्रथमावृत्ति : १९४२
पुनर्मुद्रण : १९४४
पुनर्मुद्रण : १९५८

प्रमुख विक्रेते : बलवंत पुस्तक भाण्डार, गिरगांव मुंबई ४.

प्रकाशक : पु. भा. भावे, १२०४/९ घोलेपथ, पुणें ५
मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिं. प्रेस, दादर, मुंबई १४.

श्री. वासुदेव वामन फडणवीस

ह्यांच्या अज्ञात पण अनमोल लेखणीस---

# निवेदन

ह्या संग्रहांतील कित्येक लेख लिहितांना कै. अ. ब. कोल्हटकर ह्यांच्या शैलीचा कमीअधिक प्रमाणांत उपयोग केला आहे. एक विशिष्ट परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीनें तो लेखनप्रकार मला फार उपयुक्त वाटला. अर्थात् प्रस्तुत लेखकाचा बरावाईट हातगुणही त्या शैलीस लागणें अपरिहार्य होतें.

महाभारतकारांपासून तो इतिहासकारांपर्यंत साऱ्यांचीं भांडारें मीं आपलींच समजून लुटलीं आहेत; सामान्य मालमत्ता झालेले अर्वाचीन कवींचे व लेखकांचे विशिष्ट शब्दप्रयोगही अगदीं न संकोचता उचलले आहेत! कांहीं लेखांच्या कल्पना कै. मावकर ह्यांनीं दिल्या होत्या आणि शब्दासाठीं नखें चावण्याचा प्रसंग आला असतां त्यांचा पुरवठा श्री. वा. वा. फडणवीस व रा. वि. काळी ह्यांनीं केला. ह्यानंतरही जें कांहीं शिल्लक उरत असेल, तें सर्व माझें आहे!

संग्रहांतील शेवटचा लेख जवळजवळ नव्यानें लिहून काढला आहे; ह्याखेरीज नांव घेण्यासारखा बदल कोणत्याही लेखांत केला नाहीं.

भावे यांचा वाडा,<br>सिताबर्डी, नागपूर

—पुरुषोत्तम भास्कर भावे

गेलीं कांहीं वर्षें दुर्मिळ झालेल्या ह्या पुस्तकाचें हें तृतीय मुद्रण आहे. गांधीवादी राजकारणाच्या भयानक पर्यवसानाविषयीं कित्येक वर्षांपूर्वी येथें करून ठेवलेली भाकिते आज तंतोतंत खरी ठरल्याचा प्रत्यय वाचकांस येईल. पूर्वीच्या आवृत्तीप्रमाणेंच ह्या पुस्तकांतील लेख मुद्रित केले आहेत.

पु. भा. भावे

अनुक्रम ३००८५
विभाग
क्रमांक

# " कोण कोण आहे माझ्याबरोबर ! "

सेनापतीनें साद घातली आहे. स्वातंत्र्यवीरानें शिंग फुंकलें आहे. युद्धाच्या नौबती झडूं लागल्या आहेत. बेलभांडार झालें, विडे उचलले गेले, शपथा वाहिल्या गेल्या, इमान दिलें गेलें ! सेनापतीची अब्रू आतां इरेस पडली आहे. हिंदुत्वाचा मान आतां पणास लागला आहे. लोकराज्याच्या लढ्यास आतां तोंड लागणार आहे.

~ ~ ~

निजाम हैदराबादच्या मोहिमेस आतां सुरुवात होणार आहे.

—असा सेनानी मिळावयास भाग्य लागतें, असा धुरीण लाभावयास दैव लागतें, अशा कार्यासाठीं देहपात व्हावयास जन्मोजन्मींचें सुकृत लागतें. सेनानी आज तुम्हांस हांक देत आहे, सेनानी आज तुम्हांस साद घालीत आहे, **" कोण कोण आहे माझ्याबरोबर ? "**

~ ~ ~

**" कोण कोण आहे माझ्याबरोबर ? "**

—कुणाकुणाला अन्यायाची चीड आहे ? कुणाकुणाला लोकशाहीची चाड आहे ? कुणाकुणाचें धर्मावर प्रेम आहे ? कुणाकुणाचा संस्कृतीवर जीव आहे ? हिंदुधर्म प्यारा वाटतो कुणाकुणाला ? हिंदु संस्कृति लाडकी वाटते कुणाकुणाला ?

—वेदप्रकाशाची निर्घृण हत्या कुणाला आठवते ? धर्मप्रकाशाचा क्रूर वध कुणाला आठवतो ? हुपला येथील बलात्कारित भगिनींची कुणाला स्मृति आहे ! मातृदेवतांवरील अत्याचाराचें कुणाला स्मरण आहे ?

—मातृभाषेवरील आक्रमणाचें कुणाला भान आहे ?

~ ~ ~

**" कोण कोण आहे माझ्याबरोबर ? "**

—हिंदूचें रक्त ज्याच्या नसांतून खेळत असेल त्यानें यावें ! आर्यांच्या संस्कृतीचें स्तन्य जो प्याला असेल त्यानें यावें ! मातांच्या मानाची चाड असेल त्यानें यावें ! भगिनीवरील बलात्कारांची चीड असेल त्यानें यावें !

लोकसत्तेची बूज असेल त्यानें यावें! अन्यायाची लाज धरील त्यानें यावें! मातृभाषेवर प्रेम असेल त्यानें यावें! सिंधुपासून सिंधूपर्यंत व बदरीकेदारपासून कन्याकुमारीपर्यंत ज्यांच्या ज्यांच्या हृदयांत नागरिक–स्वातंत्र्याची ज्योत तेवत असेल त्या साऱ्यांनीं यावें! आसिंधुसिंधुपर्यंत भारत ज्याची ज्याची पुण्यभू असेल, ज्याची ज्याची पितृभू असेल, त्या यच्चयावत् मनुष्यमात्रानें यावें!

~ ~ ~

"कोण कोण आहे माझ्याबरोबर?"

—भीरूंनीं अंधारांत दडून राहावें. कातरहृदयांनीं प्रासादांचे आश्रय घ्यावेत. श्रद्धाहीनांनीं आपलीं तोंडें दडवावींत. धर्महीनांनीं आपलें दर्शनही होऊं देऊं नये.

—कारण येथें वीरांची गरज आहे. येथें निष्ठावंतांची आवश्यकता आहे. येथें धर्मनिष्ठांचें काम आहे. हें सतीचें वाण आहे!

~ ~ ~

"कोण कोण आहे माझा साथी?
कोण कोण आहे माझ्याबरोबर?"

—कारण हें सतीचें वाण आहे. हें व्रत दाहक आहे. येथें केवळ शौर्याचीच नव्हे, तर धैर्याचीही गरज पडेल. येथें केवळ शक्तीचीच नव्हे तर शांतीचीही आवश्यकता भासेल. येथें केवळ निखाऱ्याप्रमाणें फुलणाऱ्या उत्साहाचीच नव्हे, तर पोलादाप्रमाणें थंड व बलाढ्य अशा निष्ठेची गरज भासेल!

—युद्ध हरण्यासाठींही प्रचंड तयारी लागते. पानपत गमावण्यासाठींही दोन लाख बांगडी पिचावी लागते व एक सबंध पिढी कामीं यावी लागते. मग युद्ध जिंकण्यासाठीं केवढी सामग्री लागेल? केवढा निश्चय लागेल? किती त्याग लागेल? अभेद्य निष्ठा लागेल?

~ ~ ~

—हा हैद्राबादचा लढा आहे. हें न्यायासाठीं युद्ध आहे. हा स्वातंत्र्यासाठीं झगडा आहे. ही झुंज अत्याचारी नाहीं, अनाचारी नाहीं, बलात्कारी नाहीं! ही झुंज व्यक्तीची नाहीं, व्यक्तीसाठीं नाहीं, व्यक्तीविरुद्ध नाहीं!

ही झुंज तत्त्वासाठीं आहे. अन्यायाविरुद्ध न्यायाची, अधर्माविरुद्ध धर्माची, पारतंत्र्याविरुद्ध स्वातंत्र्याची, एकशाहीविरुद्ध लोकशाहीची ही झुंज आहे, हा लढा आहे, हा झगडा आहे! सेनासागर साद घालून विचारीत आहे, "**कोण कोण आहेत माझे साथी?**"

~ ~

—आला हजरत ह्या व्यक्तीशीं सावरकर ह्या व्यक्तीचा दावा नाहीं. हैदराबाद ह्या नगराशीं इतर कोणत्याही नगराचें वैर नाहीं. मुसलमान ह्या समाजाशीं हिंदु ह्या समाजाचें मुळींच शत्रुत्व नाहीं.

—तत्राप आक्रमणाविरुद्ध तात्यारावांचें वैर आहे, हिंदु समाजाचें वैर आहे!

—बलात्काराविरुद्ध, अत्याचाराविरुद्ध व अन्यायाविरुद्ध, त्या साऱ्यांचा आणि मानवजातीचा दावा आहे. एकशाहीविरुद्ध साऱ्या लोकशाहीचें आणि नीतिमत्तेचें वैर आहे!

—हें भांडण न्यायाचें आहे, न्यायासाठीं आहे, नीतिमत्तेखातर आहे.

~ ~ ~

—आणि हैदराबाद संस्थानांत आर्य व मानवी अशीं सारीं नीतितत्त्वें पायदळीं पडत आहेत! तेथें एक जमात दुसरीचें भक्षण करते, तेथें एक व्यक्ति दुसरीवर अत्त्याचार करते, तेथें एक समाज दुसऱ्या समाजाची शिकार करतो!

—बलात्कारासमोर नमणें, अत्त्याचारासमोर मान वाकवणें, अन्यायासमोर गुडघे टेकणें, हें अनीतिकारक आहे, अनार्य आहे, अधर्म्य आहे, अहिंदु आहे!

—हैदराबादेंत दैवी संपदेवर दानवी आपदेच्या छाया पडल्या आहेत, सुरवृत्तीवर असुरवृत्ति मात करीत आहेत!

—आणि म्हणून सेनानीनें डंक्यावर टिपरूं मारलें आहे, युद्धाच्या नौबती झडूं लागल्या आहेत आणि साऱ्या सैनिकांस आवाहन करून प्रश्न केला जात आहे, "**कोण कोण आहेत माझे साथी?**"

~ ~ ~

—व्यक्ति मरतात! क्षणाक्षणानें शक्तींचा ऱ्हास होतो! प्रतिकारार्थ बोटही न उचलणारे समाज नामशेष होतात. अधर्म व अन्याय ह्यांसमोर सतत नमणाऱ्या व्यक्ति व समाज मरणाआधींच मरून जातात! त्यांना नौबती जागवीत नाहींत, रणवाद्यें चेतवीत नाहींत, युद्धनाद स्फुरण देत नाहींत! सेनानींची साद त्यांच्या कर्णरंध्रावर आदळते, पण हृदयावर आदळत नाहीं. त्यांची बुद्धि मेलेली असते, त्यांचीं मनें मेलेलीं असतात, त्यांची हृदयें थंड पडलेलीं असतात!

—पण सजीव व्यक्ति जागून उठतात, सजीव समाज धडपडून उठतो आणि आपल्या सेनानीची साद पूर्ण होण्यापूर्वीच तो पडसाद देतो, नौबतीवरील टिपरूं थांबवण्यापूर्वींच तो सज्ज होतो व डंक्याचा नाद विरण्यापूर्वींच घोड्यास टांच देतो!

**"कोण कोण आहे माझ्याबरोबर?"**
**"कोण कोण आहे माझा साथी?"**
**"कोण कोण आहे माझ्याबरोबर?"**

—मातांचे सारे पूत तुमच्याबरोबर आहेत! धर्मांचे सारे लाल तुमच्याबरोबर आहेत! बहिणींचे सारे भाऊ तुमच्याबरोबर आहेत! देशाच्या मातीनें घडलेले व संस्कृतीच्या प्राणांनीं फुंकलेले सारे देह तुमच्याबरोबर आहेत!

—अत्याचारांचा तिरस्कार करणारें, अन्यायाशीं दावा मांडणारें, अधर्माशीं वैर ठेवणारें, बलात्कारांचा द्वेष करणारें हें सारें राष्ट्र तुमच्याबरोबर आहे!

—जेथें तुमचा शब्द पडेल तेथें ह्यांचा देह पडेल, जेथें आपला पाय पडेल, तेथें ह्यांची काया पडेल—हे सारे आपल्या बरोबर आहेत!

२१–१–३९

卐 卐 卐

# सहदेवा, थोडा अग्नि आण !

**बाहू ते संप्रधक्ष्यामि सहदेवाऽग्निमानय** ।—महाभारत, सभापर्व

सहदेवा, थोडा अग्नि आण ! सहदेवा, थोडा अग्नि आण म्हणजे फासे फेकावयास उद्युक्त होणारे ह्याचे दोन्ही हातच मी जाळून टाकतों ! द्युताच्या ह्या दासानें आज धर्माचा अतिक्रम केला आहे. इंद्रियनिग्रहशून्य क्रूरांकडून आज पांचाली ह्याच्यामुळेंच अनान्वित पीडा पावली आहे. हिच्यासाठींच माझा क्रोध मी आज ह्यावर पाखडीत आहे. द्यूतकारांच्या आश्रयास पण्यांगनासुद्धां असतात, परंतु त्यांच्यावरसुद्धां द्यूतकारांची दया असते. त्यांना देखील पणाला लावून कोणी फासे टाकत नाहीं.

परंतु अक्षक्रीडेचा कैफ चढलेल्या ह्या मंदबुद्धीनें आज अनर्थ केला आहे. आज ह्यानें पांडवांची पतिव्रता महिषीदेखील पणास लावून टाकली आहे.

वयानें हा वडील आहे, आमचा नेता म्हणून हा ज्ञात आहे, शांतिशील म्हणून हा ख्यात आहे, दयाशील म्हणून ह्याची कीर्ति आहे, अजातशत्रु म्हणून ह्याला लोक ओळखतात आणि तरीही ह्याचे पातकी हात प्रज्वलित अनलज्वालेवर दग्ध करून टाकण्याची अनिवार इच्छा मला होते. कारण हा वयानें ज्येष्ठ असला तरी बुद्धिभ्रष्ट आहे, आमचा नेता असला तरी व्यसनग्रस्त आहे !

ह्याच्या व्यसनांतून आणि बुद्धिमांद्यांतून निर्माण झालेल्या पापपरंपरेचा प्रतिकार आतां तरी मला करूं दे ! ह्याचे द्यूतमग्न हात, मला जाळून टाकूं देत ! सहदेवा, त्वरित थोडा अग्नि आण, म्हणजे ते घोरकर्मे हात मी दग्ध करून टाकतों !

~ ~ ~

कौरवांचा आणि आमचा संधि कधींही होणें शक्य नाहीं. त्यांच्या आणि आमच्या वैराचा अंत कौरवांच्या अंतानेंच काय तो होऊं शकेल. माझें आणि त्यांचें वैर तर बालपणापासून चालत आलें आहे.

कौरवांचा आणि पांडवांचा भ्रातृभाव अशक्य आहे, कारण कौरव पांडवांचे जन्मजात वैरी आहेत. आजपर्यंत पांडवांच्या नाशाचे आणि

नाशाचेच प्रयत्न ह्या अंधपुत्रांकडून झाले आहेत. रक्तानें ते आमचे बंधु आहेत, एकाच प्रतीपवंशाचे आम्ही कुलज आहोंत, एकाच भूमींत आमचा निवास आहे, हें सत्य असलें तरी कौरव वृत्तीनें आमचे बंधु नाहींत, कृतीनें आमचे बंधु नाहींत, आकांक्षेनें आमचे बंधु नाहींत.

पांडवांच्या विद्वेषानें ते वेडावले आहेत, पांडवांच्या घाताचीच कृति त्यांच्याकडून झाली आहे, सुईच्या अग्रावर बसेल एवढी मृत्तिकाही पांडवांना मिळूं नये ही त्यांची आकांक्षा आहे.

आणि इंद्रप्रस्थ, वृकप्रस्थ, वाराणशी आदि पांच नगरांवरच संतुष्ट होण्यास सिद्ध असलेला हा उदारहृदय धर्म आज आपल्याच भूमींत दास होऊन बसला आहे. त्याच्या पत्नीवर देखील त्याचा अधिकार उरला नाहीं !

ह्यानें बंधुप्रेमानें कौरवांना वश करण्याचा प्रयत्न केला त्याचें प्रायश्चित्त आज आम्ही भोगत आहोंत. हा मूढ धर्म कोणाशींही वैर करावयास सिद्ध नसला, तरी त्याच्या दायादांनीं तसा निश्चय केला नसल्याचें ह्या अप्रबुद्धाच्या ध्यानांत आलें नाहीं. ह्यानें उशाशीं भयंकर सर्प घेतले. ह्यानें पाकगृहांत कपटी मार्जाराला प्रवेश दिला. ह्यानें मस्तकानें पाषाणाचा पर्वत फोडण्याची इच्छा धरली !

~ ~ ~

सहदेवा, थोडा अग्नि आण म्हणजे ह्या द्यूतकार धर्माचे घातकी हात मी जाळून टाकतों.

कारण आमच्या सर्वनाशाला हा कारणीभूत आहे. कौरव आमचे अप्रच्छन्न शत्रु तरी आहेत, परंतु हा आमचा नेता होता. कौरवांच्या कुटिल कैतवास बळी पडून आज हा घोर दंडास पात्र झाला आहे.

पापकर्मा सौबल शकुनि कपटद्यूतप्रवीण आहे, हें ह्या अजातशत्रूस ज्ञात नव्हतें काय ? सहस्र स्तंभ, शंभर द्वारें, आल्हादकारक आसनें, रमणीय रत्नें व आकर्षक अक्ष ह्यांनीं विशोभित केलेली ही तोरणस्फटिका नामक द्यूतसभा ह्या मंदभाग्याला मोह घालून त्याचा नाश करण्यासाठींच निर्माण करण्यांत आली आहे हें हा जाणत नव्हता काय ? एखाद्या गोमायूप्रमाणें धूर्त व लोभी असणाऱ्या धृतराष्ट्रानें अक्षक्रीडेंत रममाण

होण्यासाठीं ह्यास पाचारण केलें तें केवळ बंधुभावाचें वर्धन करण्यासाठींच होय असें ह्या जडबुद्धीस वाटलें तरी कसें ?

परंतु कपटी प्रतिस्पर्ध्यांबरोबरही धर्म्य क्रीडा करण्याचें विनाशकारी व्रत ह्यानें घेतलें आहे. प्रतिपक्ष्याला वश होतील अशा अक्षांचा हा दास झाला आहे. हा युधिष्ठिर केवळ बहुश्रुत आहे, पण ह्यास स्वतःची प्रज्ञा नाहीं. मिष्टान्नें शिजविणाऱ्या धातुपात्राला जशी त्या मिष्टान्नाची माधुरी कळत नाहीं तशी ह्या धर्माला राजधर्माची गति आकलन झालेली नाहीं. ज्याचा अग्रणी परतंत्रानें वागतो, त्याचे अनुयायी नाश पावतात. बिळांत राहाणाऱ्या प्राण्यांचा विषारी व्याल ज्याप्रमाणें ग्रास करतो, तद्वत् प्रतिकारहीन राजा व प्रवासहीन ब्राह्मण ह्यांचा भूमि ग्रास करते. वृक्षाच्या मुळाशीं उत्पन्न झालेली वाळवी ज्याप्रमाणें त्या प्रचंड वृक्षालाहि त्वरित शेंड्यापर्यंत ग्रासून टाकते, तद्वत् लघु भासणारा पराक्रमी शत्रु क्रमशः आपल्या वैऱ्यास आक्रमून टाकतो. प्रतोद ज्याप्रमाणें सारथी वारूस क्षुब्ध करतो, तद्वत् दिग्विजय करूं इच्छिणाऱ्या नृपतीनें दिशा क्षुब्ध करून सोडाव्यात. उन्नतीचा प्रयत्न हीच उत्कृष्ट राजनीति होय, असंतोष हेंच वैभवाचें मूळ होय !

परंतु दुर्गति व अपमान ह्यांतही तुष्ट राहूं बघणाऱ्या ह्या ज्येष्ठ पांडवास हा राजधर्म आकलन झाला नाहीं. आधींच रोगार्त असलेल्यानें कुपथ्य करून आपला मृत्यु जवळ आणावा, त्याप्रमाणें अक्षक्रीडेचें कुपथ्य करून ह्यानें आपला नाश ओढवून घेतला आहे !

~ ~ ~

सहदेवा, थोडा अग्नि आण ! अक्षाच्या एका फेकीबरोबर द्रौपदीस शत्रूची दासी करून सोडणाऱ्या ह्या धर्माचे हात मी जाळून टाकतों !

सहस्र निष्कांनीं भरलेलीं सुवर्णपात्रें व कुकुरपक्षाप्रमाणें देह असणारे अश्व ह्यानें पणास लावले त्याचा मला खेद नाहीं; सर्व सुलक्षणांनीं युक्त अशा दासी व पर्णाशेच्या पुलीनावरील भूमि ह्यानें फाशांच्या फेकीवर गमावली त्याचा मला शोक नाहीं. सावळ्या वर्णाचा, तरुण, रक्तनेत्र असा नकुल, महापराक्रमी असा सव्यसाची, शत्रूचें मर्दन करूं इच्छिणारा असा मी आणि

धर्मांचें अनुशासन करणाऱ्या तुझ्यासह ह्यानें स्वतःला शत्रूच्या दास्यांत बद्ध करून घेतलें ह्याविषयींही मला वाईट वाटत नाहीं.

पण अक्षांच्या सर्वस्वी आहारीं गेलेल्या, राजनीतीची सर्वस्वी विस्मृति झालेल्या, नेतृत्वाच्या उत्तरदायित्वाला पारख्या झालेल्या, पौरुषाला पूर्णपणें मुकलेल्या ह्या धर्मानें आपल्या पापपरंपरेवर अत्यंत निंद्य अशा दुष्कर्माचा कळस ठेवला. दुराराध्य शत्रूंच्या लोभाचें शमन करण्यासाठीं त्यांच्या लालसाज्वालेंत ह्यानें मूर्ख दानाच्या आहुतीमागून आहुति घालून ती अधिकच प्रज्ज्वलित केली व अखेर तींत पांडवांच्या पट्टराणीचा, पुण्यश्लोक पांचालीचा, कोमलांगी कृष्णेचाही बळी देऊन टाकला!

कृश किंवा स्थूल नसलेली, कृष्णकचांची, शरदोत्पलपत्राक्ष्या, शरदोत्पलगन्धया, श्रीप्रमाणें रूपसंपदा असलेली आपली सती स्त्रीही ह्या पतितानें आज पणास लावली!

आमच्या कर्णरंध्रांत हलाहल ओतणारा "**जितमित्येव तं नृपम्**" असा सहर्ष शब्द पांडवांच्या प्रत्येक पराभवासरशीं शठकर्मा शकुनीनें काढला. मस्तकावरील मुकुट, कानांतील कुंडलें आणि शरीरावरील वस्त्रेंही गमावणाऱ्या ह्या अभद्र धर्मानें अखेर कोमलांगी पांचालीसही अक्षांची बटीक बनविली व त्याच्या शत्रूंनीं आनंदातिरेकानें काढलेला "**जितमित्येव**" हा शेवटचा विजयनादहि एखाद्या क्लीबाच्या शांतपणें ऐकून घेतला.

~ ~ ~

सहदेवा, थोडा अग्नि आण! आपल्या कुलस्त्रियांस कुलटांच्या पदवीस नेऊन बसविणाऱ्या ह्या राजाचे हात मी जाळून टाकतों!

केस विखुरलेल्या, उत्तरीय खालीं पडलेल्या, लज्जेनें चूर झालेल्या आणि विफल क्रोधानें वारंवार श्वास सोडणाऱ्या ह्या कृष्णेची दुःस्थिति मी आतां सहन करूं शकत नाहीं. औदासीन्य व विटंबना ह्यांनीं प्रेतवत् फिकें पडलेलें हिचें मुख माझ्यानें आतां बघवत नाहीं.

ज्या कृष्णेचे सागराच्या लाटांप्रमाणें कंप पावणारे केश राजसूययज्ञाच्या वेळीं अवभृथस्नानाच्या मंत्रपवित्र उदकानें ओले झाले ते आज हा मदांध दुःशासन कर्षित करीत आहे. ज्या देवीचें दर्शन सूर्यालाही झालें नसेल, ती आज एखाद्या दीनेसारखी ह्या कामुक कौरवांच्या सभेंत असहाय्य उभी

आहे. जिच्या शरीरास वायूनेंही जपून स्पर्श केला असेल, त्या ह्या पवित्र कोमलांगीला चांडाळ दुःशासनानें फरफटत आणलें आहे.

वायु केळीला पीडाग्रस्त करतो तसें ह्या नीचानें याज्ञसेनीला पीडाग्रस्त केलें आहे आणि हें सर्व सभ्य, हे सर्व वृद्ध, हे सर्व गुरुजन हा प्रकार शांतपणें निरीक्षण करीत आहेत !

~ ~ ~

सहदेवा, थोडा अग्नि आण, म्हणजे ह्या अधम प्रकाराचें कारण असलेल्या त्या ज्येष्ठ पांडवाचे हात मी जाळून टाकतों !

शौर्यास मुकलेल्या, स्वाभिमानाचा विसर पडलेल्या व पतिकर्तव्यास पारख्या झालेल्या ह्या मतिमंदानें आज अनर्थ केला आहे !

किरातांनीं घेरलेल्या भीतिग्रस्त हरिणीप्रमाणें वारंवार अंतःपुराचा आश्रय शोधणाऱ्या कृष्णेला आज दुःशासनानें तेथून ओढून आणलें. रजस्वला, रोदमाना, एकवस्त्रा व अधोनीवि अशा पांचालीला ह्या गृध्रांच्या सभेंत येण्याविषयीं धर्मराजानें दूताकरवीं निमंत्रण दिलें.

“**अनार्या, मी रजस्वला आहें; अनार्या, मी एकवस्त्रा आहें**” म्हणून वारंवार आक्रंदन करणाऱ्या त्या मुक्तकेशा सुकुमारीचें दुःशासन कर्षण करीत असतां दस्यू बनलेले तिचे षंढ पति गुडघ्यांत मान घालून त्या उन्मत्त पशूनें द्रुपदकन्येस केलेलें दुरुत्तर ऐकत होते—

“**याज्ञसेनी, तूं रजस्वला ऐस, तूं एकवस्त्रा ऐस किंवा तूं विवस्त्रा ऐस ! तुला आम्हीं जिंकलें आहे. तूं आमची दासी आहेस. दासीला वस्त्र दिलें, तर असतें, नाहीं दिलें, तर नसतें !**’

दासी ! पराक्रमी पांडवांची पत्नी दासी ! द्रुपदाची कन्या दासी ! इंद्रप्रस्थाची राजलक्ष्मी दासी ! दुर्वृत्त कामांधांकडून तिच्या क्लीब पतीसमोर विटंबित होणारी रजस्वला, रोदमाना, अर्धनग्ना दासी !

~ ~ ~

सहदेवा, थोडा अग्नि आण, म्हणजे शस्त्र उचलण्याची संधीही न देतां आम्हांस निरंतरचे दास करून सोडणाऱ्या ह्या अल्पबुद्धि धर्माचे हात मी दहन करतो !

अरेरे! ह्या सूतपुत्र कर्णानेंदेखील याज्ञसेनीची नीच शब्दांनीं विटंबना केली. ह्या दुःशासनानें कौरवांपैकीं एखादा पति करण्याविषयीं तिला हेटाळून म्हटलें. ह्या धर्मशून्य सभ्यांनीं, ह्या कातरहृदय नृपतींनीं हा सारा निंद्य प्रकार सहन केला!

ही दुःखमग्न कृष्णा विद्ध क्रौंचीप्रमाणें हाहाकार करीत असतांही प्रतिशोधाशिवाय आम्ही जिवंत कां राहिलों? शरीरांत प्राण व बाहूंत बल असतांना हें आम्हीं कां सहन केलें? अश्रूंनीं मलीन झालेलें पांचालीचें मुख आम्हीं शत्रूच्या उष्ण रक्तानें कां क्षालन केलें नाहीं?

~ ~ ~

सहदेवा, थोडा अग्नि आण, म्हणजे सनाथ असूनही हिला अनाथ करणाऱ्या आणि सबल असूनही आम्हांस निर्बल करणाऱ्या ह्या धर्मराजाचे जुगारी हात मी जाळून टाकतों!

कारण हा आमचा ज्येष्ठ बंधु, आमचा अग्रणी असूनही आज ह्यानें शत्रूस अप्रत्यक्ष साह्य केलें आहे. ह्यानें आम्हांस फाशाच्या एका फेकीसरशीं निःशस्त्र, निर्बल व निःसत्व करून सोडलें आहे. रक्ताचा एक बिंदूही न सांडतां, प्रतिकाराची एक संधीही आम्हांस न देतां आमच्या वैऱ्याचा डाव ह्यानें सफल केला आहे.

पांचालीचें केशकर्षण करून कोणीही मरणधर्मा व भूमीस आपल्या पायांनीं स्पर्श करणारा मानव माझ्या हातून जिवंत सुटला नसता. परिघाप्रमाणें पुष्ट व वर्तुळ असलेले हे माझे बाहू पाहा! ह्यांच्या विळख्यांतून प्रत्यक्ष इंद्रदेखील आपले प्राण वांचवूं शकणार नाहीं!

पण माझे बलिष्ठ बाहु, ह्या पार्थाचें शरचाप व नकुल सहदेवांचें खड्ग हीं सर्व आज लहान मुलांच्या खेळण्याप्रमाणें निरुपयोगी ठरलीं आहेत. पांडवांची पतिव्रता भार्या, पार्षत धृष्टद्युम्नाची बहीण, वासुदेवाची सखी, अवमानित झाली असतांही तिचें रक्षण आम्ही करूं शकत नाहीं!

ह्या क्षमाशील शांतहृदय धर्मानें 'तामसी, युद्धप्रवण व कोपिष्ट' म्हणून वारंवार माझ्या हितोपदेशाचा अव्हेर केला आहे. ह्याच्या क्षमावृत्तीचा, व्यसनमग्नतेचा व बुद्धिमांद्याचा आतां मला वीट आला आहे. आपल्या

वयोवार्धक्यामुळें देखील आतां हा माझ्या क्षमेचा विषय होऊं शकणार नाहीं ! सहदेवा—

~ ~

—थोडा अग्नि आण म्हणजे ह्याच्या पापाचें प्रायश्चित्त मी ह्याला देतो !

पांचालीच्या विटंबनेला, पांडवांच्या पराक्रमाला व सर्व क्षत्रियांना साक्ष ठेवून मी सांगतो की, ह्या उन्मत्त कौरवांचा मी निःपात करीन ! ह्या मदांध अंधपुत्रांचें मी निखंदन करीन ! आणि द्रौपदीची विटंबना करणाऱ्या ह्या भारतकुलाधम दुःशासनाला तर युद्धांत बलात्कारानें ओढून ह्याच्या उष्ण रक्ताच्या ओंजळी मी प्राशन करीन ! असें जर मी करणार नाहीं, तर माझे सर्व पितर दुर्गतीस जातील !

पण सहदेवा, प्रथम थोडा अग्नि आण ! ह्या मानभंगास व अनर्थापातास कारण असलेल्या ह्या द्यूतकार धर्माचे दोन्ही हात मला प्रथम जाळून टाकूं दे !

९–४–३८

卐 卐 卐

# बंगाल — करपून गेलेलें ‘ कुसुम ’ !!

कुसुम, अशी बघूं नकोस कुसुम ! तुझ्या पेटलेल्या डोळ्यांकडे आमच्यानें बघवत नाहीं. तुझ्या दृष्टींतली धग आमच्यानें सहन करवत नाहीं. अमानुष अत्याचारांच्या एकेका स्मृतीनें भडकणारा तुझ्या नेत्रांतला जाळ आम्हांला भस्म करून टाकील. कृपा कर आणि पापण्यांचे पडदे टाकून आपली ती दाहक दृष्टि जरा झाकून घे !

~ ~ ~

—खरें आहे ! आमच्या नजरा मेलेल्या आहेत. आमचीं मनें मेलेलीं आहेत म्हणून आमच्या नजराही मेलेल्या आहेत. हृदयाचे सर्व व्यापार थांबले म्हणजे मनुष्य मरतो. त्याच्या रक्ताचें सळसळणें आटोपलें म्हणजे मनुष्य मरतो. शरीरांतली सारी उष्णता थंडावली म्हणजे मनुष्य मरतो. आर्तांचे आक्रोश जेव्हां त्याला जागवत नाहींत, तिरडीवरचीं बंधनें जेव्हां त्याला ताप देत नाहींत, शेणींच्या शय्येची जेव्हां त्याला लाज

विभाग ... क्रमांक ... 

वाटत नाहीं, सर्वस्वी भस्मीभूत करावयास उठलेल्या अग्नीचीही जेव्हां त्याला शुद्ध उरत नाहीं, तेव्हां मनुष्य मरतो.

~ ~ ~

अशी बघूं नकोस कुसुम ! तुझ्या नजरेला आज आमच्यानें नजर देववत नाहीं. आज आम्हीं मेल्याहून मेलों आहोंत. कोणत्या नात्यानें आज आम्हीं तुझें सांत्वन करावें ? कोणत्या तोंडानें आज आहीं तुझी क्षमा मागावी ? कोठल्या हक्कानें आज आम्हीं तुझे अश्रु पुसावेत ? ज्या चांडाळ हातांनीं तुझें केशकर्षण केलें, त्यांचा पुन्हा स्पर्श झालेलाहि तुला पत्करेल, पण आमचा स्पर्श तुला पत्करणार नाहीं. जे नृशंस नेत्र तुला विवस्त्र अवस्थेंत बघून नाचले, ते पुन्हा तुझ्यावर पाशवी उन्मादानें खिळलेले तुला चालतील, पण आमची नपुंसक नजर तुला चालणार नाहीं. आमच्या प्रेतदृष्टीचा तुला वीट येईल, तिरस्कार वाटेल !

~ ~ ~

अशी बघूं नकोस, अशी बघूं नकोस !

द्रौपदीची नजर अशीच निखारे फेकत फिरली. तिला वैऱ्यांची सभा दिसली, तिला अन्नानें मारलेले गुरुजन दिसले, तिला दस्यू झालेला धर्म दिसला, पण तिला एक भीमही आढळला आणि तेथेंच तिची दृष्टि स्थिरावली.

अखेरचा चीत्कार करून मोगल जनान्यांत कायमच्या शांत होणाऱ्या राजपुत कन्यकांच्या नजरा अशाच फिरल्या. त्यांना तुर्कांपुढें माना मोडून बसलेले मानसिंग दिसले, दुहितेचा विक्रय करणारे अजितसिंह दिसले, पण त्यांना प्रतापचे उसळते भाले आणि पद्मिनीच्या चिताही दिसल्या. त्यांच्या दुःखांत सुख होतें, निराशेंत आशा होती. त्यांच्या नजरेंतला अग्नि अचेतन पाषाणावर पडला नाहीं. त्यांचे करुण आक्रोश केवळ शून्यांत नष्ट झाले नाहींत. त्यांचे अश्रु व्यर्थ गेले नाहींत. त्यांच्या नेत्रज्वालेनें दुष्मनांच्या चिता पेटल्या, त्यांच्या आक्रोशाचे प्रतिध्वनि वैऱ्यांच्या मरणघोरांतून उमटले, त्यांच्या अश्रूंच्या बदल्यांत रुधिराच्या नद्या लोटल्या. पण कुसुम, तुझे आक्रोश ? तुझे अश्रु ? तुझी विटंबना ? आणि तुझी ती नजर ?

~ ~ ~

एका रात्रींत दुनिया बदलून गेली. एका रात्रींत कुसुमची दुनिया पार बदलून गेली. आजपर्यंत प्रकाशच प्रकाश होता पण ह्यापुढें त्यांत तेजोगुण उरला नाहीं. आजपर्यंत जल जीवन होतें, पण ह्यापुढें तो लांबच लांब विषारी घुटका झाला. आजपर्यंत सत्य ही एक शक्ति होती, पण ह्यापुढें ती केवळ दुर्बलांची वंचना ठरली.

कालच निर्मळ उदकानें भरलेल्या पुष्करणींत आज विष्ठा कालविली जाते. कालच शुचिर्भूत असलेल्या मंदिरांचा आज रक्तलांछित कसाबखाना बनूं शकतो. कालच आपल्या चारित्र्यानें तळपणारी स्त्री, आज दुर्वृत्त कामांधांच्या पशुतेला बळी पडते ! हें सर्व होऊं शकतें. अस्मानांत देव व जगांत माणसें असतांना हें सर्व होऊं शकतें. कुसुम ज्या भेकड हिंदु जगाचा एक घटक होती तेथें हें वारंवार होऊं शकतें. तेथें वस्तूंचीं मूल्येंच बदलतात. पतिव्रतेचें पावित्र्य, मातेचें मातृत्व, कुमारिकेचें कौमार्य आणि पुरुषांचें पौरुष, हे शब्दच तेथें निरर्थक ठरतात. पुळचटांच्या जगांतून त्यांच्या सर्वस्वाबरोबर त्यांच्या शब्दांचे अर्थही छिनावले जातात. कुसुम, तुला हें ठाऊक नव्हतें. आपलें सर्वस्व ज्यांच्यावर तूं विश्वस्तपणें सोंपवलेंस ते किती नादान होते हें तुला माहीत नव्हतें.

नाहींतर त्या रात्रीं तूं इतकी सुखरूप झोंपली नसतीस. कसल्या संकटाची छाया तुला घेरून टाकत होती ह्याची तेव्हां तुला कल्पना तरी होती काय? पतनाच्या पराकोटीला पोहोंचलेल्या पशूंनाही जें सुचूं नये, तें तुला तरी कसें सुचणार ? दहा मुलांची तूं आई होतीस. तुला बरोबरीचा मुलगा होता, बरोबरीची सून होती आणि अंगावर एक तान्हुलें होतें !

त्या सायंकाळीं तूं आपल्या हातांनीं रांधलेंस, आपल्या हातांनीं वाढलेंस. आणि गृहकृत्यें आटोपून, आपल्या बाळांना उरीं धरून आडवी झालीस. तुझ्या बाळानें तुझ्या हृदयाला दांत लावले, ओरबाडलें आणि त्या ब्रह्मानंदांत तूं झोपीं गेलीस. कुसुम, स्वतःच्या मातेची स्मृति विसरणाऱ्या पशूंचे भ्रष्ट हात तुझ्या कायेवर उद्यांच पडणार आहेत, ह्याची तेव्हां तुला जाणीव तरी होती काय? कुसुम, तुझ्या नीतिमान् आयुष्याची ती मरणघटका होती हें तुला ठाऊक होतें काय? धर्मवेड्यांच्या सूडाचा भाग म्हणून नियतीनें तुला अलग काढलें आहे, हें तुझ्या स्वप्नांत तरी आलें होतें काय? प्रातःकाळचीं

केरपोतेरीं करत असतांनाच तुझ्या सर्वस्वावर पोतेरें फिरणार आहे ह्याची तेव्हां तुला कल्पना होती काय ?

~ ~ ~

अरेरे ! कुलवंताची तूं स्त्री, कुलवंताची तूं कन्या व कुलवंताची माता ! दमडीला विकून घेणाऱ्या बाजारबसवीवरसुद्धां असली अमानुष विटंबना सहन करण्याचा प्रसंग येत नसेल. पण केवळ दुर्भाग्यानें हिंदु जन्मलीस म्हणून बटकीलाही न सोसणारा छळ तुला सहन करावा लागला. तुझें नख बघा-वयाचीही ज्यांची योग्यता नाहीं त्यांनीं धरून निर्दयपणें तुला ओढत नेलें ! तुला बिलगून बसलेल्या तुझ्या बाळाला तुजपासून राक्षसांनीं हिसडून काढलें ! तुझ्या पतीला व भावाला कान धरून एखाद्या गुलामासारखें गांवभर मिरवलें ! आणि कुसुम, भर दिवसा, भर चवाठ्यावर तुझ्या सर्वस्वाची रक्षा झाली. गोविंदपूरच्या हिंदूंनीं थंड डोळ्यांनीं हें पाहिलें ! गोविंदपूरच्या हिंदूंनीं हें थंडपणें सहन केलें ! कुऱ्हाडीच्या घावांनीं शरीराचीं शकलें उडेपर्यंत खोलीच्या निर्जीव दारानेंसुद्धां तुला आसरा दिला, पण गोविंदपूरच्या सजीव प्रेतांनीं तुझा सत्यानाश बोटही न उचलतां बघितला !

~ ~ ~

बदलली, एका घडीत कुसुमची दुनिया पार बदलली ! काल कुसुम एका संसारांत मानानें मिरवणारी लक्ष्मी होती, आज ती केवळ माळावरची माती ठरली. साऱ्या आयुष्याचें व्रत, साऱ्या आयुष्याची निष्ठा, साऱ्या आयुष्याची नीति एका क्षणांत पार धुळीस मिळाली. जेव्हां कुसुमचे केस धरून इरफाननें तिला ओढत नेलें, तेव्हां तिला कळलें, कीं दुबळ्यांच्या स्त्रिया कोणत्याही क्षणीं सबलांच्या भोगदासी बनूं शकतात. तेव्हां तिला कळलें, कीं कोणत्याही निर्बल समाजांत कुलीनत्व असूंच शकत नाहीं. तेव्हां तिला कळलें कीं, पाशवी पिपासेसमोर पतिव्रतेचा पुण्यप्रभाव फिक्का पडतो. तेव्हां तिला कळलें, कीं नीति ही शक्तीची चरणदासीही शोभत नाहीं. जेव्हां तिच्या असहाय अवस्थेंत पाठीवर पाय देऊन आलेला शशीही नादान ठरला, अग्नीच्या साक्षीनें हात धरणारा तिचा पती केवळ षंढ ठरला, आणि गोविंदपूरचा हिंदु केवळ तमासगीर ठरला, तेव्हां तिला कळलें, कीं आपली पुरेपूर वंचना झाली, आपला गळा कापला गेला !

स्त्री म्हणून, माता म्हणून व पत्नी म्हणून प्रत्येक परीनें आपण फसलों! भावानें प्रत्यक्ष बहिणीची विटंबना बघितली, पतीनें प्रत्यक्ष पत्नीचा मानभंग सहन केला!

आम्ही मृत आहोंत! कुसुम, आम्ही मृत आहोंत! चार कप्प्यांची एक पिशवी शरीरांत आहे एवढ्याच कारणासाठीं कांहीं जिवंतपणावर हक्क सांगतां येत नाहीं! निर्जीव घड्याळासारखें टकटकत बसणारें हृदय नांवाचें यंत्र हाडांच्या कोनाड्यांत बसवल्यामुळेंच कांहीं सहृदयत्वावर अधिकार सांगतां येत नाहीं! गटारांतून वाहाणाऱ्या दुर्गंधी पाण्याप्रमाणें नसांच्या नाल्यांतून थंडावलेले रक्त फिरत आहे– एवढ्याचखातर कांहीं कोणाला जिवंत म्हणवून घेतां येत नाहीं. आम्हाला डोळे आहेत, पण दृष्टि नाहीं; कान आहेत पण श्रवणशक्ति नाहीं; शरीर आहे, पण चेतना नाहीं! हें बघ, राष्ट्रीयतेच्या तिरडीवर आम्हांला कसें आंवळून बांधले आहे. खादीच्या मृतवस्त्रानें आम्हांला कसें लपेटलेलें आहे. जातीयनिर्णयाची चिता आमच्यासाठीं सुसज्ज करून ठेवली आहे. खांदे देऊन आमचे मुसलमान बंधु कसे आम्हांला सरळ मसणाच्या मार्गानें नेत आहेत. आणि मेलेल्या नजरेनें आम्ही आमचाच सर्वनाश बघत आहोंत. आम्ही जीवनन्मृत आहोंत! आम्ही जीवन्मृत आहोंत! आम्हांला कोण संजीवन देणार? आमच्यांत कोण चेतना उत्पन्न करणार? आम्हांला कोण ह्या मृतनिद्रेंतून जागृति आणणार?

~ ~ ~

कराचीच्या लक्ष्मीपुत्राची कन्या पितरांच्या कुशींतून मुस्लिम खाटकानें ओढून नेली. पंडित दीनानाथच्या धर्मपत्नीवर देखतां देखत सरहद्दीवर अत्याचार झाला. कुसुम, गोविंदपूरला उमटलेला तुझा आर्तचीत्कार अंतर कापीत पश्चिमेकडे गेला व रेताड सिंधच्या अमृत किल्ल्यांत त्याचे पडसाद उठले! पंधरा वर्षांच्या कोवळ्या पोरीचा प्रलयकालीन आक्रोश हेंच, कुसुम, तुझ्या हांकेचें प्रत्युतर! त्या प्रत्युत्तरानें तुला सांगितलें कीं, "बाई, माझीही स्थिति अगदीं तीच झाली ग! इथली हिंदु स्त्रीसुद्धां अगदी निराधार आहे ग!"

पूर्व टोकाचा बंग व पश्चिम टोकाचा सिंध दोन विद्ध पाखरांप्रमाणें परस्परांना टाहो फोडून सांगत आहेत, कीं "आमच्या हृदयांत तीर घुसला आहे ! रुधिराच्या एकेका बिंदूबरोबर आमचें जीवन झराझर वाहून जात आहे ! आमचे प्राण वांचवा, हें विषदिग्ध टोक कोणी उपटून काढा ! आमचा किती अंत बघतां ?"

कुसुम, तुझ्या मातेच्या कुशींत हा बाण कोणीं मारला, ही अधम तिरंदाजी कोणाची, हा जहरी चावा कोणीं घेतला, हें तुला ठाऊक आहे का ? ज्यांनीं तुला व बंगालच्या प्रत्येक मुलीला उघडी पाडली, ज्यांनीं तुमच्या सन्मानावर घाला घातला, ज्यांनीं तुम्हांला उन्मत्त कामुकतेचा असहाय विषय बनवलें, ज्यानीं तुमच्या शीलाचा घास पातकी पिपासेला कायमचा भरवला, ज्यांनीं तुमच्या छळकांच्या लांछित शीलावर घूत वस्त्राचें पांघरूण घातलें, ते कोण हें तुला ठाऊक आहे काय ?

कुसुम, तुझ्यावर झालेला अत्याचार हा एक अस्वाभाविक अमानुषतेचा अपवादात्मक उद्रेक नव्हता. कारण आज तुझी जी गत झाली, तीच पूर्वी फुलमणीची झाली, तीच गंगादासीची झाली, तीच सुशीलबालेची झाली आणि तीच वासंतीची झाली. वर्षातला प्रत्येक दिवस व प्रांतांतला प्रत्येक गांव तुला ओरडून सांगेल, कीं "कुसुम, तुझीच नव्हे, तर पृथ्वीची सूर्याला एक प्रदक्षिणा पूर्ण होईपर्यंत पांच हजार हिंदु स्त्रियांची हीच गति होत असते !"

ह्याला केवळ वेड म्हणतां येत नाहीं. ह्याला केवळ लैंगिक विकृति म्हणतां येत नाहीं. अमानुष अत्याचारांनीं आपलें आक्रमण त्वरित फलद्रूप करण्याचा हा अगदीं सुसंगत डाव आहे. तुझ्या मातेच्या कुशींत घुसून बसलेला हा बाण मुस्लिम महत्त्वाकांक्षेच्या भात्यांतून निघाला आणि त्याच्या टोकाला माखलेलें जहर—

~ ~ ~

—तें कोणीं माखलें म्हणतेस ? तुला खरें वाटेल कुसुम ? पण तुला खरें तरी कां वाटूं नये ? तुला तें खरें न वाटायला अराष्ट्रीय राष्ट्रीयतेच्या भरीस पडलेली व पिकेटिंगबरोबरच प्रेमचेष्टांतही वाकबगार झालेली तूं एखादी "केशरिया" थोडीच आहेस ? "ऐक्याखातर मी मुसलमानांना

मुकेही दिले आहेत" असें आलापून सांगणारी उंडगी बुलबुल थोडीच आहेस? तूं एक पोळलेली स्त्री आहेस. अत्याचाराचा विषय झालेली तूं एक अश्राफ सती आहेस. ऐक कुसुम! हिंदु स्त्रियांच्या सतीत्वावर मुस्लिम पहारा कोणी बसवला तें ऐक! बंगालची पुण्यभूमि मुस्लिम विषयांधतेची विलासभूमि होईल अशी तरतूद कोणी केली तें ऐक! हिंदूंच्या पाकमुखांत मातेचें मांस घालणाऱ्या कसाबखान्याचें अनावरण कोणी केलें तें ऐक! हिंदु वाङ्मय, हिंदु कला, हिंदु संस्कृति, ह्यांचा निःपात होईल अशी अचूक व्यवस्था कोणी केली तें ऐक! कवींचा, संतांचा व शूरांचा बंगाल पाकिस्तानचा केवळ एक सुभा होऊन राहील अशी तरतूद कोणी केली तें ऐक! हिंदु बंगालचा अंत करणारा हा बाण, कोणी विषांत बुडवला व कोणी फेकला तें ऐक!!

~ ~ ~

देशाची जी माता म्हणवते, पण जी फक्त मुसलमानांची ओली दाई (Wet-Nurse) व हिंदूंची सावत्र आई आहे तिनें! जिनें हिंदूंची स्वत्वभावना एकाद्या मायावी राक्षसीप्रमाणें बुकलून मारली तिनें! जिनें पोटच्या पोराचें दूध तोडून सापाचीं पिलें पोसलीं तिनें! तिनें आणि तिचा एकमात्र कलिपुरुष असणाऱ्या अर्धनग्न साथीदारानें! ज्यानें सर्व दुष्मनांचें भलें करून स्वजनांचें निसंतान करण्याचा चंग बांधला त्यानें! ज्यानें सुभाषबाबूंना कारागृह दाखविलें त्यानें! ज्यानें हिंदूंचें धन शोषून त्यांच्याच नाशासाठीं त्या द्रव्याचा विनियोग केला त्यानें! सिंधी, बंगाली आणि काश्मिरी अबलांच्या पदराला हात घातला गेला असतांही खजूर चोखत ज्यानें प्रतिअजातशत्रुत्व पत्करलें त्यानें!

कुसुम, तुझी आणि तुझ्या मातेची यंत्रणा जन्मजन्मी संपूं नये, तुमचे अश्रु कधीं सुकूं नयेत, तुमचें रडणें जन्मभर थांबूं नये, अशी परिस्थिति उत्पन्न करावयास हा मानभावी महानुभाव व त्याच्या पापणीच्या धाकानें लवणारी "राष्ट्रमाता" कारणीभूत आहे! बंगाली हिंदूंना निःशेष करूं बघणारा जातिनिर्णयाचा समंध ह्यानें चिथावला; एवढेंच नव्हे, तर त्याहीपेक्षां भयंकर असा गुन्हा ह्यानें निःशंकपणें केला. बंगाली फाळणीच्या वेळीं आकाश पाताळ एक करणाऱ्या बंगाली हिंदूंचीं मनें ह्यानें मारून

टाकलीं. बंधुप्रेमाची सुंगी ( Chloroform ) देऊन ह्यानें त्यांना प्रतिकार-अक्षम बनवलें. बेगडी राष्ट्रीयतेच्या तिरडीवर ह्यानें त्यांना करकचून बांधलें आणि छलानें मृतप्राय केलेल्या त्या प्रेतमात्रांवर कपटी हत्येचीं चिन्हेंही दिसूं नयेत म्हणून खादीच्या शुभ्र वस्त्राखालीं त्या जीवन्मृतांना झाकून टाकलें! कळलें कुसुम? तुझ्या वंगमातेला आसन्नमरण करून सोडणारा प्रहार कसा झाला, तें कळलें? हिंदु स्त्रियांच्या अपहरणाची व छळाची उपपत्ति तुला कळली? अंगावर कांटा आणणारे अत्याचार हे केवळ उपटसुंभ अपघात नाहींत, हें तुझ्या ध्यानांत आलें? मुस्लिम महत्त्वाकांक्षेच्या पायांत हिंदूंच्या नंदिनी चिणून भरल्याखेरीज पाकिस्तानचा इमला नीट वठणार नाहीं, एवढ्याचखातर तुझा बळी घेण्यांत आला, हें तुला समजलें? कुसुम, तुझ्या वंगमातेला हिंदु समाजापासून भेदून फेकणारा बाण अस्मानांतून आला नव्हता. तर सैतानापेक्षांही अधम अशा कावेबाजांची ही कुटिल करामत होती. बंगालच्या मर्मावर जाणारा हा बाण जेव्हां प्रत्यंचेसकट आकर्ण ताणला गेला, तेव्हां अहिंसेचे दूत "कोरे चेक" लिहिण्यांत गर्क होते. दायादांचे यश निःसंशय करण्यासाठीं त्यांनीं तेव्हां उपासतापास मांडले होते. घरच्या स्त्रियांना परदारीं लोटूं बघणारे हे दुर्बळ हात जाळूं म्हणणाऱ्या एकाच एक भीमसेनाला "जातवेडा" ठरवण्यांत ह्यांची कर्तबगारी तेव्हां खर्ची पडत होती. हा बाण मुस्लिम महत्त्वाकांक्षेच्या भात्यांतून निघाला, पण विश्वप्रेमाच्या प्रेषितांनीं त्याला मौनाचें विष भरवलें व अहिंसेचा बडिवार बोलत असतां त्यांनीं एक हृदयशून्य हिंसा घडवून आणली!

~ ~ ~

रड कुसुम, पोटभर रड! तुझ्या हृदयाचें पाणी होईपर्यंत आणि मानवी पाषाणांच्या अंतःकरणास पाझर फुटेपर्यंत रड! चरख्याच्या करकराटांतून व बंधुत्वाच्या आरोळ्यांतूनही उमटून पडेल इतक्या आवेगानें रड! अजून तुला पुष्कळ रडलें पाहिजे. हे तुझें रडें कधींही संपणार नाहीं, कारण तें आतां तुमच्या जन्माला लागलें आहे. ज्या दिवशीं जातिनिर्णयाची कृष्णछाया बंगालवर पडली, त्याच दिवशीं तुमच्या नशीबाचा निर्णय लागून गेला. आज आंकडेशास्त्राला बलात्कारित स्त्रियांची मोजदाद तरी

ठेवतां येते, पण फारच थोडक्या अवकाशांत तेंही अशक्य होऊन बसेल. बंगालभर हिरव्या अर्धचंद्राची सुलतानी सुरू होतांच कशाची व किती जणांची दाद लावणार व ती लावून घेणार कोण? मग कुसुम तुला व तुझ्यासारख्याच अभागी स्त्रियांना तोंडावर पदर धरून गुदमरलेल्या स्वरांत नुसतें रडत बसण्याखेरीज गत्यंतर उरणार नाहीं. तो भयाण आक्रांताचा काळ आतां फारच नजीक येऊन ठेपला आहे. तुझा आक्रोश ही त्या सर्वव्यापी आक्रांताची केवळ प्राथमिक किंकाळी होय. त्या अखेरच्या घरघरीचा केवळ पहिला सूर होय. त्या अंतकालीन धडपडीचा केवळ सुरुवातीचा आंचका होय. तुझ्या मुखानें सटवी आज अगदीं उंबऱ्याशीं टेकलेल्या अशुभाची ललकारी देत आहे. म्हणून रड, कुसुम, मनमुराद रड! तुझ्या रोदनाचे स्वर पूर्वटोकापासून पश्चिमटोकापर्यंत व उत्तरटोकापासून दक्षिणटोकापर्यंत घुमत फिरूं देत! सह्याद्रीवर आदळणारी तुझी हांक महाराष्ट्राच्या दरीदरींतून उमटूं दे व हिंदुकुशावर टक्कर खाऊन परतणारी तुझी साद साऱ्या पिशाचप्रदेशाला कंपायमान करूं दे! पूर्वगिरीला भिडणारे तुझे सुतकी सूर निद्रावश मद्रदेशाला गदगदून हालवूं देत!

रड. कुसुम, रड! तुझा दीन हंबरडा ऐकून दगडी हिमालयहि तडकेल व तेथून गंगायमुनांचा पाझर सुरू होईल. तुझें करुण स्फुंदन ऐकून सखोल सागराचें हृदयही उचंबळून येईल! तुझ्या उष्ण निश्वासांनीं काश्मीरची वनश्रीही करपून म्लान होईल! रड कुसुम, अशीच रडत रहा! गंगा व ब्रह्मपुत्रेच्या पाण्यानें ओली झालेली वंगभूमि तुझ्या अश्रुपातानें विरघळून जाईपर्यंत रडत राहा! तूं पददलित असलीस, वंचित असलीस, एकटी असलीस, तुला माणसांनीं सोडलें असलें, देशसेवकांनीं तुला मानवदेहधारी हिंस्र पशूंच्या स्वाधीन केलें असलें, समाजसेवकांनीं तुला दगा दिला असला, तरी तुझी फिर्याद वंगभूमीच्या रक्षक देवतेपाशीं पोहोंचेपर्यंत अशीच रडत राहा!

~ ~ ~

—बंगालच्या कुलदेवते, ऊठ; तुझ्या कन्यका विपत्तींत आहेत. बंगालच्या रक्षकदेवते, ऊठ; तुझीं बाळं संकटांत आहेत. बंगालच्या वास्तुदेवते, ऊठ; तुझें पीठ अपवित्र होत आहे!

माते, तुझ्या शुभचिन्हांनीं पुनीत अशी ही भूमि हिरव्या ध्वजाच्या पसरत्या छायेखालीं कशी काळवंडून गेली आहे. बघ, सुजल, सुफल आणि श्यामल अशी ही भूमि अपवित्रांच्या आगमनानें कशी भयभीत झाली आहे. जितके ललित, जितकें सुंदर, जितकें दिव्य, तें येथें जन्मलें! जें जें मधुर, जें जें रुचिर, जें जें चारु, तें येथें जन्मलें; वंग संगीतानें भारतीय हृदय कंपित केलें. वंग वाङ्मयानें साऱ्या जगाला अंकित केलें. वंग साधूंनीं मानवाला नवी दृष्टि दिली! माते, ह्या भूमीवर तुझी सर्वस्वी कृपादृष्टि होती. रामकृष्ण व विवेकानंद, शरच्चंद्र व रवींद्र, दिलीपकुमार व तिमिरबन, चित्तरंजन व सुभाषचंद्र, तुझ्या छायेंत वाढले. तुझ्या चरणांच्या छायेंत हिंदु संस्कृति येथें फलद्रूप झाली! ती अनेक फलपुष्पांनीं डंवरून निघाली!

पण माते, आज ही भूमि असुरांनीं ग्रस्त केली आहे. तेथें आतां उत्पाती खलांचा भार मोकळा सुटला आहे. वंगभू आतां पीडाग्रस्त झाली आहे! माते, तुझीं बाळें आज सर्वस्वीं दीन झालीं आहेत. तुझ्याच भूमींत तुझ्या देवभाषेवर संकट आलें आहे. तुझ्या बालिकांचे सुंदर वेष छिनावून कुडतीं आणि चोळणा यांत त्यांना विद्रूप केलें जात आहे. शिखा जाऊन शिखानष्टांच्या टोप्यांचे गोंडे सर्व भूमि व्यापून टाकीत आहेत.

आई, आतां अधिक अंत बघूं नकोस! आई, आतां अधिक परीक्षा पाहूं नकोस! हा छळ आतां सोसवत नाहीं. तुझ्या भक्तांनीं नामशेष व्हावें, अशी तुझी इच्छा आहे काय? तसें असेल, तर निदान त्यांना असुरांचें भक्ष्य बनवूं नकोस. तुझ्या सेवकांनीं घृणास्पद म्लेंच्छ जातींत विलीन व्हावें असें तुला वाटेल तरी कसें? तुला त्यांचा नाशच करावयाचा असेल, तर दे, सर्व प्रलयकालीन शक्तींना आज्ञा दे! हिमालयाच्या कोसळत्या भिंतीखालीं सारा बंगाल चिरडून निघूं दे! ज्यांनीं बंगालची भूमि निर्माण केली, त्या पावन गंगा व ब्रह्मपुत्रा आपलेंच अपत्य गिळून टाकूं देत!

पापभारानें क्रोधाविष्ट झालेल्या शेषाच्या एकाच झटक्यांत त्यांच्या दुष्मनासकट हिंदु बंगाल रसातळाला जाऊं दे!

आई, तुझी इच्छा असेल, तर तसेंही होऊं दे, पण हिंदु बंगालचा घास यवनांना करूं देऊं नकोस! त्यापरीस नाशाचा कोणताही मार्ग पत्करेल, कोणताही उपाय सदय ठरेल!

बंगालच्या दुर्गे, ऊठ, तुझीं मुलें संकटांत आहेत! बंगालच्या असुरमर्दिनी ऊठ, तुझ्या मुली विपत्तींत आहेत! आई, आतां अधिक अंत बघूं नकोस. आई! तुझी लेकरें दुर्बळ आहेत, त्यांना क्षमा कर! त्यांना शक्ति दे!

स्त्री हें तुझें पृथ्वीवरील रूप होय! तिचीच तुझ्या भूमींत राक्षसांनीं विटंबना मांडली आहे!

महिषासुरमर्दिनी, तुझ्याशिवाय कुसुमला कोण त्राता आहे? तुझ्याखेरीज तिचें दुःख कोण जाणेल? कोणाला तिचा कळवळा येईल? तुझ्याशिवाय तिचे अश्रु कोण पुसणार? कोण तिला अभय देणार?

देवते, आपलें कराल रूप पुन्हां धारण कर! आपल्या रौद्रतम स्वरूपांत पुन्हा प्रकट हो! अनेक भुजांत शस्त्रधारण केलेली तुझी चंडमूर्ति पाहून गलितांना पुन्हा धैर्य येऊं दे!

तुझ्या तेजाच्या अंशानें प्रत्येक स्त्री तळपूं दे, म्हणजेच करपून गेलेल्या कुसुमवर नवी टवटवी चढेल!

८-९-३६

卐 卐 卐

## " मित्रा, तूं मला मारूं शकशील पण—

### माझ्या कबरस्तानांतून जी धूळ उडेल तिचें तूं काय करणार? "

मित्रा, तूं मला मारूं शकशील! हें स्पष्ट आहे, कीं तूं मला मारूं शकशील तूं मला मारूं इच्छिशील, कांहीं काल तूं माझी चेतना हिरावून घेशील आणि किंचित्काल माझी हालचालही तूं थांबवूं शकशील.

मित्रा, हें सर्व तूं करूं इच्छशील, हें सर्व तूं करूं शकशील! माझा प्राण घ्यावा ही तुझी इच्छा आहे, माझा नाश करावा ही तुझी वांछा आहे, मला गतप्राण करावें हा तुझा हेतु आहे आणि तूं तें करशीलही!

मित्रा, हें सर्व तूं करूं शकशीलही!

आणि मग तुला वाटेल, कीं मी नष्ट झालों, मी हत झालों, मी पंचत्वास गेलों, मृतांच्या संख्याहीन संख्येंत मी समाविष्ट झालों!

मित्रा, तुला वाटेल, माझ्या मूर्ख मित्रा, तुला निश्चित वाटेल, कीं मी मेलों आणि म्हणून तूं निश्चित झालास! मी पंचत्वास गेलों आणि म्हणून तुझ्या चिंता संपल्या! मी हत झालों आणि म्हणून तुझ्या पातकी सुखास निर्वेध सुरुवात झाली! आपल्या खुनी सिंहासनाच्या खुराखालीं सुजनांना निरंतरचे दडपून पापी विलासांचे सोहाळे भोगावयास तूं मोकळा झालास. तुझा कोणीही शास्ता राहिला नाहीं, तुझा कोणीही नियंता राहिला नाहीं!

~ ~ ~

मित्रा, तूं मला मारशील आणि मग तुझा आनंद साऱ्या नभःप्रदेशांतही सामावणार नाहीं; मी महानिद्रेंत मग्न होईन आणि मग तुला सुखाची पहिली वहिली नीज लागेल; काळपुरुषाच्या मुखांत तूं माझा घास घालशील आणि मगच सुखाचें अन्नग्रहण तुला शक्य होईल. माझें चलनवलन बंद पडेल आणि मगच अप्रच्छन्नपणें तुला हालचाल करतां येईल!

मित्रा, माझा मरणसोहळा तूं केवढ्या उल्हासानें साजरा करशील? प्रभंजनाप्रमाणें वेगवान्, अग्नीप्रमाणें दाहक आणि सुतीक्ष्ण बाणाप्रमाणें मर्मग्राही, असा मी कायमचा शम पावलेला पाहून तुला केवढा हर्ष होईल? आपल्या प्रचंड शक्तीनें सजीवपणीं बलिष्ठांतील बलिष्ठांचे दर्पहरण करणारा, उन्मत्तांतील उन्मत्ताची रग जिरविणारा, पापी सिंहासनाधीशांचीं आसनें गदगदा हालवून सोडणारा, माझा शूर देह कायमचा शांत झालेला पाहून तुला केवढा मोद होईल, तुला केवढें समाधान वाटेल? ध्यानीं, मनीं आणि स्वप्नीं तुझें सर्वस्व व्यापूनही जो उरला होता, ज्याच्या पोलादी पकडींत तुझें अस्तित्व केवळ अशाश्वत होऊन राहिलें होतें, ज्याच्या करक्रीडेनेंही तूं अस्वस्थ व कंपायमान होत होतास आणि ज्याच्या शब्दाशब्दानें तुझ्या हृदयाचें स्पंदन मंद मंद होत होतें, त्या विराट्प्रकृतीची अखेर आलेली पाहून तुला खरेंच किती तोष वाटेल?

~ ~ ~

त्याच्या निरुपद्रवी वाटणाऱ्या शरीराचें दर्शन होतांच दुःखाश्रूंचें नांव सांगून आनंदाश्रु तुझ्या कपटी नेत्रांत उसळूं लागतील! शोकश्वसितांचें वाण घेऊन हर्षाचे उच्छ्वास तुझ्या कंठांत दाटी करतील! मृत्यूचीं उदास वाद्यें तुला जन्मदिनाच्या आनंदसंगीताइतकीं मधुर भासतील!

आणि मित्रा, मग तूं तें कलेवर, तूं तें प्रेत, तूं तो देह अत्यंत समारंभानें, अत्यंत सोपस्कारानें, त्याची अखेरची शय्याभूमि म्हणून निर्माण केलेल्या गर्तेत लोटून देशील आणि मृत्तिकेच्या थराखालीं झांकून टाकलेल्या त्या देहावर बांधलेलें कबरस्तान हा तुला तुझ्या यशस्वी कलाकुसरीचा कळस वाटेल!

~ ~ ~

मित्रा, तूं मला मारूं शकतील. माझें मृण्मय शरीर तूं भूमिगत करूं शकशील. माझ्या पार्थिव देहाला मूठमाती देऊं शकतील. पुनरुत्थानाचा संभवही नष्ट करण्यासाठीं तूं माझ्या मृत शरीरावर प्रस्तराची कबर उभारशील!

**पण मूर्खा, माझ्या कबरस्तानांतून जे असंख्य धूलिकण उडत राहतील त्यांचें तूं काय करणार?** त्यांना तूं कसें थांबविणार? त्यांचें तूं कसें निवारण करणार?

कारण मित्रा, माझ्या मृण्मय शरीराची माती कबरस्तानाच्या बंदिवासांत पडून राहाणें उचित समजणार नाहीं. ती माती माझ्या शरीराची आहे, तिचा प्रत्येक कण निष्ठेचें, आदर्शांचें आणि पराक्रमाचें अमृत आकंठ प्यालेला आहे!

~ ~ ~

मित्रा, तूं मला मारूं शकतील, पण माझ्या कबरस्तानांतून उडणाऱ्या त्या अगणित धूलिकणांचें तूं काय करणार? मी एक होतों, तर माझ्या मातीचे कण अनंत असतील. मी गोचर होतों, तर ते अगोचर असतील, मी एकसंधि आणि दृश्य होतों, तर चूर्ण झालेल्या माझ्या शरीराचे विघटित घटक असंख्य आणि सूक्ष्मदेही असतील!

मित्रा, तूं मला मारूं शकशील, पण माझ्या कबरस्तानांतून उडणारे धुळीचे कण जेव्हां स्वतंत्र शरीर धारण करून हजारांनीं अस्मानांत उडतील, तेव्हां तूं त्यांचें कसें निवारण करणार ?

~ ~ ~

मित्रा, जिवंत माणसें पुरवतात, जिवंत शत्रु पुरवतात, जिवंत वैरी सह्य वाटतात ! पण माणसाच्या मृण्मय शरीराचे उडणारे कण फार वाईट ! कारण सजीव शरीरांची धूळ करतां येईल, पण वाऱ्यावर आरूढ होऊन चवताळत धावणाऱ्या धूलिकणांचें काय करणार ? तेथें शक्ति निःशक्त ठरते, बाहुबलास तकवा उरत नाहीं व विनाशास नपुंसकत्व येतें !

कारण मित्रा, मृत्तिकावस्था ही साऱ्या सजीव आणि निर्जीव वस्तुजाताची अंतिम अवस्था आहे. पुष्पांची मृत्तिका होते, पुष्पकोमल प्रमदांची मृत्तिका होते, राजप्रासादांची धूळ होते आणि गडगडून पडलेल्या राजपदांची व प्रधानपदांचीहि धूळ आणि धूळच होते ! मित्रा, अखिल वस्तुजाताची धूळ करतां येते, पण आधींच त्या अवस्थेप्रत पोहोंचलेल्या अणुरेणूंचें मात्र कांहींही करतां येत नाहीं !

~ ~ ~

आणि म्हणूनच मित्रा, कबरस्तानांतून उडणाऱ्या धूलिकणांचें निवारण हें एक दुर्घट आणि अशक्यप्राय कर्म आहे ! जगांतील दरोबस्त बलिष्ठांची खवळून उठलेली क्रुद्ध सेना पत्करेल, पृथ्वीवरील यच्चयावत् शक्तिमंतांशीं सामना आलेला परवडेल, साऱ्या सजीव सृष्टीनें सन्मुख ठाकून केलेला युद्धाचा पुकारा परवडेल, पण कबरस्तानांतून उडत राहाणाऱ्या धुळीचा पाठलाग परवडणार नाहीं !

कारण स्वतःस मारून खाक बनलेल्या ह्या विनम्र धूलिकणांची सत्ता अमर आहे व त्यांचें सामर्थ्य अपार आहे ! बहरलेल्या लावण्याचा नूर लुटून घेणाऱ्या, डंवरलेल्या उद्यानांना आत्मसात् करणाऱ्या, पुष्ट लोहशरीरांना खाऊन टाकणाऱ्या, ह्या धूलिकणांचें दर्शन कुणाला कंपित करणार नाहीं ? त्यांच्या सर्वव्यापी व सर्वभक्षक शक्तीनें कोण भयचकित होणार नाहीं ?

सजातीय सजीवांशीं मुकाबला करितां येईल, धनत्तरांची दौलत लुटून घेतां येईल, सत्ताधीशांची सत्ता छिनावतां येईल, पण आधीं स्वतःच खाक

बनून मग अस्मान झांकळणाऱ्या, प्रथम स्वतःच धूळ बनून नंतर वातावरण व्यापणाऱ्या, वस्तुजाताच्या अंतिम अवस्थेप्रत गेल्यावर साऱ्या सजीव उन्मत्ततेस आव्हान देणाऱ्या ह्या धूलिकणांचें निवारण, मित्रा, खरोखरच कसें करणार ?

विनाशाला सामोरें जाऊन त्यांनीं विनाश मारला आहे. सजीवतेचें मोल देऊन त्यांनीं सजीवतेवर मात केली आहे. जडदेहाला अलभ्य अशा अमरतेचे कुंभ प्राशन केल्यावर हे सूक्ष्म धूलिकण मृत्यूच्या गव्हरांतून उलटून उसळले आहेत ! प्रत्यक्ष अंतकाचे सामर्थ्य हिरावून परत फिरलेल्या ह्या धूलिकणांचें शासन, मित्रा तूं कसें करणार ?

~ ~ ~

कबरस्तानांतून उडत राहाणाऱ्या धुळीचें शासन करावयास आजपर्यंत कोणीही शक्त झालेला नाहीं ! इहलोकांतील बलाढ्यतम शक्तिमंतालाही आजपर्यंत तिचें निवारण करितां आलें नाहीं. कारण मित्रा, कबरस्तानांतून उडणारी धूळ ही एक प्रचंड शक्ति आहे, तें एक अनंत आणि अमर तत्त्व आहे !

चेतनेवर अधिकार सांगणारे सजीव पुतळे मृत्यूचा संस्कार घडलेल्या उडत्या मातीची सदैव भीति बाळगतात ! कबरस्तानांतून उडत राहाणाऱ्या धूलिकणांच्या दर्शनानें त्यांच्या काया कंपित होतात !

~ ~ ~

मित्रा, तूं मला मारूं शकशील ! तूं मला मारूं शकशील, पण मृत्यूच्या साथीदारीनें माझ्या कबरस्तानांतून जी धूळ उडेल, तिचें तूं काय करणार ?

~ ~ ~

**“ मित्रा, तूं मला मारूं शकशील, पण माझ्या कबरस्तानांतून जी धूळ उडेल तिचें तूं काय करणार ? ”**

३–९–३८

卐 卐 卐

# “ आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या –”

सारा दरबार तटस्थ झाला होता! सारीकडे स्तब्धता नांदत होती, श्वासांचा अवरोध झाला होता, नेत्र अनिमिष बनले होते, डोळ्यांच्या पापण्या लवत नव्हत्या आणि प्राणांनीं कर्णयुग्मांत प्रवेश केला होता!

मराठ्यांचा राजा आतां काय बोलेल? जिजाऊचा पुत्र आतां काय बोलेल? महाराष्ट्राचा तारणहार, युवकांचा होनहार, हिंदूंचा आधार, आतां काय बोलेल?

तरवारीचे वार त्यांनीं बेदरकार झेलले होते. आग ओकणाऱ्या भडिमारयंत्रांना ते निर्विकार चित्तानें सामोरे गेले होते. घायाळांचे आर्त चित्कार श्रवण करतांना त्यांचीं हृदयें कधीं कातर झालीं नव्हतीं!

पण आज, आतां, या क्षणीं, मात्र त्यांच्या राजाच्या एका शब्दावर त्यांचे प्राण अडकले होते.

काय बोलेल? मराठ्यांचा राजा आतां काय बोलेल?

~ ~ ~

दिव्य लावण्याची पुतळी नतमस्तक होऊन त्या सामंतचक्रान्वित महाराजांच्या सभेंत उभी होती.

ह्या विजयी राजावर तिच्या रूपमोहिनीचा प्रभाव पडणार नाहीं का? विरलमेघावृत वर्षाचंद्रिकेप्रमाणें तिच्या अवगुंठित मुखमंडलावरून सौंदर्य ओसंडत होतें. ह्या सौंदर्याचा परिणाम मराठ्यांच्या त्या तरुण राजपुरुषावर होणार नाहीं का!

शत्रूची स्त्री आज त्याच्या कवेंत सापडली होती. ज्या शत्रूनें आजपर्यंत हिंदु स्त्रियांवर दया दाखविली नाहीं, पतिव्रतांचें पावित्र्य ज्या दुष्मनानें सदैव पददलित केलें, अबलांवरील बलात्कार हें ज्या हाडवैऱ्याचें परंपरागत ब्रीदवाक्य होतें, त्या शत्रूची, त्या वैऱ्याची, त्या दुष्मनाची दुहिता, त्या दुष्मनाची भार्या, त्या दुष्मनाची कन्या, आज त्याच्या कवेंत गवसली होती!

दया? क्षमा? माफी?

दया कुणाला दाखवायची? क्षमा कुणाला करायची? माफी कुणाला द्यायची? रक्षण करायचें कुणाचें? औदार्य उधळायचें कुणावर? दाक्षिण्य दाखवायचें कुणाला?

दाहिर राजाच्या कन्यकांवर महमद बिन कासिमनें केली· होती काय दया? कमलकुमारीची आहुति आपल्या अभिलाषेच्या अग्नींत देतांना अल्लाउद्दीननें केली होती का क्षमा? पांखराप्रमाणें फडफडणाऱ्या राणी दुर्गावतीच्या बहिणीला आपल्या जनानखान्याच्या पंजरांत कोंबतांना अकबरानें दाखविलें होतें का दाक्षिण्य?

शेकडों सतींच्या शीलावर निखारे रचले, शेकडों पतिव्रतांनीं जिवंत जोहार केले, सहस्र सहस्र हिंदुपुत्रांच्या रक्तानें त्यांची माता न्हाऊन निघाली, लक्षावधि मंदिरें उध्वस्त झालीं!

हें सर्व झालें, तेव्हां दया कुठें गेली होती, क्षमा कुठें पळाली होती, मानवता कुठें लपली होती, दाक्षिण्यानें कुठें तोंड दडवलें होतें?

आणि ज्यांनीं ज्यांनीं हें सर्व केलें, ज्यांनीं पतिव्रतांची विटंबना केली, ज्यांनीं मंदिरें भ्रष्ट केलीं, ज्यांनीं प्रजा त्रस्त केली, ज्यांनीं असंख्य बलात्कार केले, ज्यांनीं अत्याचारांचा एकही प्रकार शिल्लक ठेवला नाहीं—

—त्यांची ही कन्या, त्यांची ही लेक, त्यांची ही सून.

खड्गाच्या आघाताला खड्गाच्या प्रत्याघाताचें प्रत्युत्तर मिळतें, अग्न्यस्त्राच्या प्रचंड भडिमाराला त्याहीपेक्षां दाहक मारागिरीची पावती मिळते, भाल्याची एक फेक भाल्याच्या दुसऱ्या फेकीचें संपादन करते—

मग बलात्काराचें उत्तर बलात्कारानें, अत्याचाराचें अत्याचारानें व विटंबनेचें विटंबनेनें द्यावयास नको का? ही युद्धनीतीच नव्हे का?

~ ~ ~

सभा तटस्थ होती. मराठ्यांच्या महाराजांची वीरसभा चित्रासारखी तटस्थ होती. हस्तगत झालेल्या शत्रूच्या स्त्रीचा शेवट मुस्लिम राजसभेंत काय होतो, तें त्यांना चांगलें अवगत होतें!

लौकिक धनापेक्षांही स्त्रीधनाविषयीं चकत्यांचे राजे जास्त तृषित असतात हें त्यास ठाऊक होतें. रमणींच्या लावण्याखातर निष्कारण रक्तनद्या निर्माण करण्यास तुरुक सज्ज असतात हें त्यांस ज्ञात होतें. संधीच्या अटीअन्वयेंसुद्धां

शत्रूच्या स्त्रियांची छळणा करण्याचा नोडग्यांचा अट्टाहास असतो हा त्यचा अनुभव होता.

आणि अशा शत्रूची, अशा वैऱ्याची, अशा दुष्मनाची ही लेक, ही सून, ही भार्या, आज मराठ्यांच्या ह्या प्रतापी, ह्या विजयी, ह्या विजिगिषु महाराजाच्या हातांत सांपडली होती! आतां ती पूर्णपणें असहाय होती, अरक्षित होती, अशरण होती! तिच्या समाजानें रचलेल्या पापराशी तिच्या मस्तकावर कोसळूं बघत होत्या!

फक्त एकच वाक्य! एकच शब्द! एकच आज्ञा!

काय बोलेल? हा मराठ्यांचा प्रतापसूर्य आतां खरोखर काय बोलेल?

हिंदु स्त्रियांवरील आजवरचे अत्याचार आठवून "क्रूर शत्रूच्या ह्या सुनेचे धिंडवडे काढा!" असें हा संतप्त महाराज बोलेल काय? "हिला आबाजी सोनदेवास अर्पण करा!" असें हा मराठ्यांचा मुकुटमणी सांगेल काय? "बलात्कारी दुष्मनाच्या ह्या बायकोला एकाद्या बारगिराची बटीक बनवा!" अशी क्रोधाज्ञा हा पराक्रमी नृपाल आज्ञापील काय?

काय म्हणेल? हा मराठ्यांचा राजा, हा जिजाऊचा पुत्र, हा महाराष्ट्राचा तारणहार, हा हिंदूंचा होनहार, काय म्हणेल? काय बोलेल? काय आज्ञापील?

तरुण मराठ्यांचें तें सारें मंडळ जीवाचे कान करून ऐकत होतें. कल्याणच्या खजिन्यासकट ती लावण्यमय ललना हस्तगत करणारा व त्या वादळी काळांतील उग्र युद्धनीति जाणणारा वीर आबाजी सोनदेव पराकाष्ठेच्या औत्सुक्यानें ऐकत होता आणि ती पीडाग्रस्त म्लेंछ तरुणी धडकत्या हृदयानें ऐकत होती.

**"आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या—"**

बोला, महाराज बोला! आजपर्यंत जें कोणालाही बोलतां आलें नाहीं तें आपण बोला! मेनकेचें मादक सौंदर्य अवलोकिल्यावर ऋषि विश्वामित्रालाही जें बोलतां आलें नाहीं तें आपण बोला! प्रत्यक्ष माता माद्रीचें चरण सौंदर्य निरखल्यावर जो मनोविजय युधिष्ठिरास मिळवतां

आला नाहीं तो आपण मिळवा ! कन्येच्या सौंदर्यानें पशु झालेल्या ब्रह्मदेवालाही ज्या इंद्रियांचें दमन करतां आलें नाहीं त्यांचा गर्व लीलेनें आपण हरण करा ! ही आपली लेक नाहीं, ही आपली कन्या नाहीं, तर ही आपल्या कपटी शत्रूची कन्या आहे, बलात्कारी शत्रूची लेक आहे, निर्दय दुष्मनाची सून आहे !

स्त्रियांचा परिवार न बाळगणारा नृपाल हा आज अपवाद आहे. आजचे समाज-नियम आपण हिला आश्रय दिलात तरी, आपणांस दोष देणार नाहींत ! रूढी आणि अलिखित दंडक यांनीं आपण आदर्श नीतिमत्तेला बद्ध नाहीं. जें ऋषि विश्वामित्राला साधलें नाहीं, जें ब्रह्मदेव करूं शकला नाहीं, जें शांत दांत युधिष्ठिराला शक्य झालें नाहीं, तें आपण न केल्याविषयीं आपणास कोणीही अपराधी मानणार नाहीं, कोणीही दोषी समजणार नाहीं !

ब्रह्मदेव प्रत्यक्ष पुत्रीच्या पाठीस लागला होता, युधिष्ठिरास मातेची विस्मृति झाली होती, गुरुपत्नीच्या लावण्याचा मोह चंद्रास आवरला नव्हता !

ही यवनी रूपवती आहे, युवति आहे, ती शत्रुस्त्री आहे ! इंद्रियें अनावर आहेत आणि तारुण्याला दृष्टि नाहीं !

~ ~ ~

**" आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या—"**

बोला, महाराज, बोला ! महाराष्ट्राचे सुपुत्र, बोला ! हिंदु युवकांचे कंठमणी बोला ! आपण ह्या यवनीला पावन करून घेतलेंत तरी त्याचें लांछन आपणास लागणार नाहीं ! अनादिकालापासून विजेते जें करीत आले तेंच आपण कराल ! आबाजी सोनदेवानें हिला आपणासमोर सादर केलें तें ह्याच नम्र अपेक्षेनें !

उदात्त अशा स्त्रीविषयक नीतिकल्पना आजवर प्रत्यक्षांत आणण्याचा अलौकिक अट्टाहास कोणीही धरला नाहीं. युद्धाच्या निर्णयनीतीनें शुद्ध आचाराचा बडिवार कधींच बाळगला नव्हता. विजेत्या अरबांनीं अमानुष अत्याचार केले. युयत्सु पठाणांनीं कोणतेंही कुकृत्य पाप मानलें नाहीं !

मोगलांना नीतिमत्तेची महति कधींच वाटली नव्हती! रक्ताच्या प्रवाहांतून आणि अश्रूंच्या ओघांतून ते सिंहासनाकडे चालत गेले!

त्यांच्या अनीतिमत्तेला कंटाळून वैभवानें कधीं त्यांच्यावर पाठ फिरवली नाहीं! संपदा कधींही त्यांच्यावर कोपली नाहीं! त्यांच्या पापी दौलतीची दोरी त्यामुळें कधींही अकाली तुटलीं नाहीं! सबल अनीतीसमोर दुबळी नीति नेहमींच पांगळी ठरली आहे!

विजयाच्या मदानें आपण धुंद झालां नाहींत काय? तारुण्याचा मोह आपणांस अनावर वाटत नाहीं काय?

बोला! मराठ्यांचे महाराज, महाराष्ट्रभूचे तारणहार, हिंदूंचें होनहार, बोला!

~ ~ ~

**" आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या तर— "**

सभा तटस्थ झाली. तरुण मराठ्यांची ती सभा तटस्थ झाली! नेत्रांच्या पापण्या हालेनात, हृदयाची धडपड बंद पडली, कानांत प्राण आले! बलाढ्य बादशहाशी बेदरकार झुंज घेतांना हा मराठ्यांचा राजा कधीं कातर झाला नाहीं. संकटांचे पर्वत पाहूनही ह्याचें सिंहहृदय कधीं कंपित झालें नाहीं. दास्यानें मिळणाऱ्या पापी दौलतीचा मोह कधीं ह्यास पडला नाहीं!

पण कुठल्याही बलाढ्य शत्रूपेक्षां बलवत्तर, कुठल्याही प्रबल मोहापेक्षां अनिवार्य, अशा शत्रूशीं सामना करावयास, अशा मोहाशीं मुकाबला द्यावयास, हा मराठ्यांचा महाराज आज उभा होता!

काय बोलेल? मराठ्यांचा राजा आतां काय बोलेल?

~ ~ ~

**" आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या तर— "**

तो काळ, ती वेळ, ती घडी येऊन ठेपली! आयुष्यांतील अत्यंत असामान्य विजयाचा, अत्यंत अपूर्व यशाचा, अत्यंत अलौकिक सिद्धीचा तो क्षण होता, तो काळ होता, ती घडी होती!

सोळा वर्षांच्या बालवयांत तोरणा सर करण्याची कृति अलौकिक होती, त्याहीपेक्षां कोवळ्या वयांत यवनसत्ताधीशापुढें मस्तक ताठ ठेवणारी वृत्ति बेदरकार होती, राक्षसकाय अफझुलर्चीं आंतडीं ओढणारें धैर्य अपूर्व होतें !

पण ह्या काळीं, ह्या वेळीं, ह्या घडीस जी वृत्ति प्रकट झाली, ज्या धैर्याचा प्रत्यय आला, जी अतिमानवता अनुभवास आली, तिची सर कशासही आली नाहीं. तिला तोड नव्हती, उपमा नव्हती !

मराठ्यांचा राजा बोलला. त्याच्या मुखांतून अमृतधारांचा वर्षाव झाला !

~ ~ ~

**" आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या तर—! "**

**" —तर आम्हीही असेच सुंदर झालों असतों ! ! "**

अवरोधिलेले श्वास सुटले ! हृदयांची क्रिया पुन्हां चालू झाली ! किरण साधून बसलेले नेत्र विसावले आणि त्यांना अश्रूंचें स्नान घडलें ! कानांत आलेल्या प्राणांची समाधि सार्थ झाली ! साऱ्या सभेवर अमृतवर्षाव झाला ! सारी सभा सुधासिंचनानें न्हाऊन निघाली. त्या असहाय यवनसुंदरीला कृतज्ञतेचे कढ आले !

तिला कळलें, कीं हा मराठ्यांचा महाराज एक जड शरीरी नाहीं, तो एक तेजःपुंज तत्त्व आहे ! ती एक दिव्य स्फूर्ति आहे ! तो एक मानव नव्हे, देव आहे !

~ ~ ~

मानव नव्हे, देव ! एका दिव्य व पवित्र संस्कृतीच्या उदरीं येऊं शकणारा आदिदेव ! शिवाजीमहाराज खरोखरच मानव नव्हते, ते देव होते ! इतकी निष्कलंक विभूति इतिहासानें बघितलीच नाहीं !

ल्यूक्रेशियावर सत्तांध टार्किननें बलात्कार केला आणि आपल्या विनाशाचा पाया घातला. रावणानें सीतेचा अपहार केला व त्याच क्षणीं आपली मरण-घटका लिहून ठेवली. अँथनीला क्लिओपात्राचें पिसें लागलें व त्यांतच त्याचा सत्यानाश झाला !

परंतु साऱ्याच सत्तांध नीतिभ्रष्टांना पापाचें प्रायश्चित मिळालें असें इतिहास सांगत नाहीं, असें पुराण सांगत नाहीं !

कलंकित नीतिमत्तेच्या कावेबाज अकबराचा " थोर " ( The Great ) हा किताब कोणीही छिनावून घेतला नाहीं. जुन्या सहचरीच्या रक्तानें हात रंगवून नव्या संसाराची सजावट करणाऱ्या भ्रष्ट पण शूर आठव्या हेन्रीचा " राजांचा मुकुटमणी, " असाच गौरव करण्यांत आला !

रक्तपात, कपट व बलात्कार ह्यांनीं रंगलेलीं राज्यें क्रुद्ध नीतिदेवतेनें गिळून टाकल्याचें कुठेंही नमूद नाहीं ! विनाशानें त्यांनाही यथावकाश गांठलें, पण नीतिमान् दुबळ्यांवरही त्यानें कधीं दया दाखविली नाहीं !

~ ~ ~

**" आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या तर – "**

मानव नव्हे, देव ! जगाचा उद्धार करावयास समर्थ अशा एकमात्र संस्कृतीचें स्तन्य प्यालेला आदिदेव !

इतिहासानें असंख्य वीर, अगणित राजकारणपटु, अपार मुत्सद्दी बघितले आहेत ! नेपोलियन हा एक असामान्य वीर होता, पण त्याचें चारित्र्य अनैसर्गिक प्रमाणांत अधम होतें ! अकबर चतुर राजकारणी होता, पण त्याच्या कावेबाज कौटिल्याला सीमा नव्हत्या ! वालपोल श्रेष्ठ श्रेणीचा मुत्सद्दी होता, पण त्याच्या शीलभ्रष्टतेला मर्यादा माहीत नव्हत्या !

परंतु बलिष्ठ असूनही बलात्कारी न होणारा, मूर्धाभिषिक्त असूनही मदांध न बनणारा, अतिमानुष शौर्यानें शत्रूंचेंच नव्हे, तर हीन मोहांचेंही दमन करणारा मानव असूनही देवाधिक कृति करणारा, केवळ एकच पुरुषोत्तम ह्या लोकानें पाहिला आणि फक्त तोच अविचलित चित्तानें व पवित्र वाणीनें वदता झाला,

**" आमच्या मासाहेब इतक्या सुंदर असत्या, तर आम्हीं असेच सुंदर झालों असतों ! "**

२–७–३८

卐 卐 卐

अनुक्रम ३००४२
विभाग आ.वा.
क्रमांक २२५
नों. दि.

## —आवाज ? हा कशाचा आवाज ?

—आवाज ? हा कशाचा आवाज ? हा अतिरेकाच्या आनंदाचा नाद आहे काय ? ही विजयाच्या उन्मादाची साद आहे काय ! पुनर्जीवित आशेची ही पहिली हांक आहे काय ? पराक्रमाच्या जन्मक्षणांचा हा प्रथम हुंकार आहे काय ! भूतकाळच्या विरत्या पावलांचा हा प्रतिध्वनि आहे, कीं भविष्य-काळच्या येत्या पावलांची ही चाहूल आहे ? हा आवाज हर्षाचा आहे कीं विषादाचा ? हा ध्वनि सुखाचा आहे कीं दुःखाचा ? ही उमलत्या अपेक्षांची साद आहे कीं कोमेजलेल्या आशेचा हा कोरडा सुस्कारा आहे ? राजस्थान कुलवंतांनीं आज गांधार टापांखालीं घातला कीं महाराष्ट्राच्या सांवळ्या सुपुत्रांनीं आज अटक ओलांडली ? काय झालें ? आज काय झालें ? त्या एकाच नादाच्या टिपऱ्या करून आज दशदिशांनीं कां खेळ मांडला आहे ?

~ ~ ~

आवाज ? हा कशाचा आवाज ? युगांयुगांतून घुमणाऱ्या मुकुंदाच्या मुरलीचे हे सूर आहेत काय ? तांडवकालीन कालीचा हा कंबुध्वनि आहे काय ? असुरमस्तकीं होणाऱ्या कालिकेच्या प्रत्येक प्रहारास सहर्ष साथ देणाऱ्या चरणालंकारांची ही बेछूट खिदळ आहे काय ? हें मराठी सेनासागराचें शहाजणें आहे का रजपूत रणवीरांचें शिंग आहे ?

~ ~ ~

ह्या आवाजाचे सूर वाहून नेतांना मरुताला कां धन्यता वाटते ? ह्या नादाचे पदर परस्परांच्या खांद्यावर दशदिशा कां फेकीत आहेत ? ह्या आवाजाचे शब्द कानांवर पडतांच जलदेवतेचें हृदय कां उचंबळून येतें व वृक्षलतांच्या माना आनंदानें कां डोलूं लागतात ? ह्या आवाजाचा उगम कोठून झाला व शेवट कोठें होणार आहे ? ह्या आवाजाचा आरंभ कोठें आहे व अंत कोठें आहे ? ह्या आवाजाचें कार्य काय आहे व कारण काय आहे ?

~ ~

हिंदु युवका ! ऊठ ! कारण तूंच ह्या आवाजाचें कारण आहेस व तुझी जागृति हेंच ह्या आवाजाचें कार्य आहे. तुला ह्या आवाजाचा आरंभ

माहीत नाहीं काय ? तर मग ऐक ! हृदयांतून त्या आवाजाचा उगम झाला आहे. नव्या आकांक्षांनीं प्रस्फुरित झालेला तुझा समाज, संजीवनासाठीं आसावलेली तुझी संस्कृति, विजिगीषेची आशा धरणारा तुझा धर्म, राष्ट्रीय स्वयंसेवकांच्या हृदयांतून तुला आवाज देत आहे !

आपल्या प्रहरणानिनादानें व्यसनमूढ संभाजीला ह्यौतात्म्याचा संदेश सांगणारा हा आवाज आहे. घोर संकटांनीं ग्रासलेल्या प्रतापचा धर्माभिमान सदैव जागता ठेवणारा हा आवाज आहे. पददलित हिंदूंच्या पुनर्जन्माचा मंत्र शिवाजीला देणाऱ्या माता भवानीचा हा कौल आहे !

ह्या आवाजाला अंत नाहीं, ह्या आवाजाला शेवट नाहीं, ह्या आवाजाला अखेर नाहीं ! कारण अखेरीचा अंत करण्यासाठीं, शेवाचा शेवट साधण्यासाठीं, अंताचा नाश करण्यासाठीं, हा ध्वनि वातावरणाचा भेद घेत आहे. हृदयांतून निर्माण झालेले नाद मरण्यासाठीं उत्पन्न होत नसतात. जडांना जीव न देत व अचेतन हृदयें सकंप करीत, हा आवाज असाच चिरंजीव होईल !

आवाज ? कशाचा आवाज ? हिंदु तरुणा, पद्धतशीर पावलें टाकीत जाणाऱ्या गणवेषधारी राष्ट्रीय स्वयंसेवकांची ती सेना पाहा व मग हा प्रश्न विचार ! ह्या युवकसेनेच्या अग्रभागीं शोभणारा तो पवित्र भगवा ध्वज पहा व मग हा प्रश्न विचार ! हृदयाचे बोल बोलणारें तें शिंग बघ व मग हा प्रश्न विचार !

पाहा, हिंदु तारुण्याचा उसळता सागर डोळा भरून पाहून घे ! हिंदु यौवनाचा हा भरघोंस मोहोर नीट निरखून घे ! हिंदु समाजाच्या आशेचे हे लाल हिंदूचें हें होनहार, नीट न्याहळून ठेव ! राष्ट्रमातेच्या चरणांना आपल्या मांसाचीही मेंदी लावणारें सुपूत ह्यांत आहेत ! भगव्या ध्वजाची शान किंचित्ही विघडूं नये म्हणून त्यावर आपल्या रक्ताचा शिडकाव करणारे वीर ह्यांच्यांत आहेत ! आर्य महिलांचें शील व हिंदूंचा मान ह्यांचें रक्षण करण्यासाठीं बिनदिक्कत ते आपल्या छातीचा कोट उभारतील ! आपल्या मुंडक्यांचे बुरुज रचूनही ते धर्म व संस्कृति यांच्या वैऱ्यांना नामोहरम करतील. एकाच ध्येयावर ह्यांच्या सोत्कंठ दृष्टि खिळलेल्या आहेत. एकाच तालावर ह्यांच्या हृदयाचे ठोके पडतात.

कोठेंही जा, ह्यांची चाल एक आहे! कोठेंही जा, ह्यांचे बोल एक आहेत! कोठेंही जा, ह्यांचें इमान एक आहे! जात, दर्जा व प्रांत ह्यांच्या सीमा पुसून हिंदुत्वाचें एकच वीरकंकण ह्या सान्यांनीं बांधलें आहे! हिंदूंची संस्कृति व हिंदूंचा धर्म, ह्यांच्या चरणीं त्यांनीं आपली निष्ठा, एकदांच व अखेरची वाहून टाकली आहे! हिंदुत्वाच्या नांवानें त्यांनीं बेलभंडार घेतलें आहे! संस्कृतीच्या नांवानें त्यांनीं आण वाहिली आहे! पावन भगव्या ध्वजाला साक्ष ठेवून त्यांनीं सेवेची दीक्षा घेतली आहे!

~ ~ ~

आवाज? कशाचा आवाज? विजयादशमीच्या मंगलमुहूर्तावर आकाशाचीं कपाटें कापीत जाणारे ते बिगुलाचे बोल आहेत! विरोध व टीका ह्यांस लष्करी बेशकपणें तुडवीत जाणाऱ्या सहस्रावधि नवयुवकांच्या पदाघातांचा तो आवाज आहे. कष्टी व विपद्ग्रस्त हिंदु समाजाच्या बेसूर विलापाला दिलेली ती हुरूपाची साद आहे. त्रयस्थांच्या हृदयांत कौतुक, मित्रांच्या हृदयांत अभिमान व शत्रूंच्या हृदयांत भय उत्पन्न करणारा तो ध्वनि आहे. ती आशेची हाक आहे, तो पराक्रमाचा हुंकार आहे, तो विजिगीषेचा नाद आहे! उज्ज्वल भविष्यकालाच्या येत्या पावलांची ती चाहूल आहे व उज्ज्वलतर परंपरेचें ते अमोल आशीर्वचन आहे!

~ ~ ~

युवका, उठ! व नव्या जोमानें जिवंत झालेल्या तरुण हिंदूंचा हा मर्दानी सोहळा डोळा भरून बघून घे! तूं हाडाचा हिंदु असशील, तूं मनाचा हिंदु असशील, शौर्य व पुरःसरता ह्यांस तूं पुरतेपणीं पारखा झाला नसशील, तर वेगानें पुढें जाणारीं हीं तरुण हिंदूंचीं डौलदार पावलें पाहून तुझें हृदय आनंदानें नाचूं लागेल. तुझ्या शरीरांतून रक्ताचे प्रवाह जोरानें सळसळूं लागतील. ह्या तीव्र, कर्कश, प्रमत्त आणि तरीही मधुर अशा वाद्यांची मोहिनी तुला अनावर वाटेल. मनाच्या थडग्यांत मृतप्राय पडलेल्या महत्त्वाकांक्षा ह्या रौद्र विजयध्वनीनें खडबडून उठतील! न पाहिलेलीं स्वप्नें जागत्या डोळां तुला दिसूं लागतील! निराशा व निष्क्रियता ह्यांची अटक तूं क्षणांत नष्ट करशील! अस्मानांत चढत जाणाऱ्या बिगुलाच्या आवाजाबरोबर तुझ्या **वृत्तीही चढत जातील! उंचावत जाणाऱ्या तुझ्या** तरुण

आकांक्षेला सारें जग पायातळीं दिसेल व साहसाच्या आणि पराक्रमाच्या एका नव्याच जगाची तुला प्रचीति पटेल! एका वेषांत आणि एका जोषांत मिरवत जाणाऱ्या ध्येयप्रवण युवकांचें नुसतें दर्शनही केवढी प्रचंड स्फूर्ति देऊं शकतें, तें मग तुला कळेल!

~ ~ ~

हिंदु युवका! ऊठ! संख्या ही निस्संशय एक शक्ति आहे. पण संघटना ही त्यापेक्षां जास्त बलवत्तर शक्ति आहे. संघटित लोहरेणूंचे शस्त्र प्रस्तरांचे पहाड भेदून टाकतें. कार्पासाचे प्रचंड ढीग, अग्नीच्या जागत्या स्फुल्लिंगास नष्ट करूं शकत नाहींत. अविचल निश्चयाचे, अभेद्य जुटीचे व तळपत्या शौर्याचे चारही लोक असंख्य बाजारबुणग्यांचा निःपात करूं शकतात. अखेरची मात नेहमीं संघटनेची असते, शेवटचा डाव सदैव त्यांचा असतो, पराजयाला विजयाची पलट देण्याचें भाग्य नेहमीं त्यांना लाभतें. शिवाजीनें मूठभर ध्येयनिष्ठांची चिवट संघटना करून साम्राज्यें उलथविलीं, निष्ठावंत अल्पसंख्येच्या जोरावरच नेपोलियननें चकित करणारे विजय संपादिले!

~ ~ ~

आवाज? कशाचा आवाज? मूर्खा, जें तुझ्या धूर्त शत्रूंनाही माहीत आहे, तें तुला माहीत असूं नये काय! जा, आणि विचार त्या जागतिक प्रश्नांचा चिवडा करणाऱ्या कलंदर कॉमरेडाला! अहिंसेची आणि सत्याची कंटाळवाणी टकळी लावणाऱ्या एकाद्या धंदेवाईक देशभक्ताला विचार! मुसलमानांच्या गळ्यांत पडणाऱ्या त्या मानवेंद्र रॉयला विचार! ऐक्याचीं बुल्बुलगीतें गाणाऱ्या त्या **सरोजिनीला विचार किंवा त्या** पुचाट पण चढेल जवाहरला जाऊन प्रश्न कर! हा आवाज कशाचा तें ते तुला सांगतील!

~ ~ ~

—आवाज? हा कशाचा आवाज? जो आवाज ऐकून पितरांना संतोष होईल तो हा आवाज आहे. धारातीर्थगत मराठी शिलेदार जो आवाज ऐकून पुनर्जन्मासाठीं उतावीळ होतील, तो हा आवाज आहे! पावनखिंडींतील फत्तर जो आवाज ऐकून पुलकित होतील तो हा आवाज आहे! जो

आवाज ऐकून नरकांत पिचत पडलेल्या मारेकऱ्यांना घोर यातना व्हाव्यात व स्वर्गीय हुतात्म्यांना धन्यता वाटावी तो हा आवाज आहे ! हें राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचें शिंग आहे, हा संघटनेचा संदेश आहे, हा उज्ज्वल जीवनाचा आदेश आहे !

१९–१०–३७

卐 卐 卐

# विमल, तुला काय झालं ?

विमल, तुला काय झालं ? उण्यापुऱ्या तीन लाख वस्तीच्या नागपूर शहराचे आहारनिद्रादि व्यवहार तेव्हां, तूं होतीस तेव्हां, चालू होते व आजही, तूं नाहींस तेव्हांही, ते तसेच यांत्रिक अबाधिततेनें चालू आहेत. तुझ्यासारख्या अल्पवयी कुमारिकेचा इतक्या अकल्पित व भयानक तऱ्हेनें अंत झाला आणि तरीही ह्या निर्जीव, निर्दय व निघृंण नागर जीवनाचा एकही फेरा चुकला नाहीं, एकही व्यापार थांबला नाहीं. तुझ्या शालेय सख्या आजही विद्यालयांचे मार्ग नियतकालीं बिनचूक आक्रमीत जातात. तुझ्या विद्यालयीन प्रांगणांत आजही निश्चित मनांची हर्षनिर्भर खिदळ सारखी चाललेली असते, तुझ्या शाळेच्या भिंती आमोदप्रमोदाचे साद पडसाद आजही प्रतिध्वनित करीत असतात.

एके काळीं तुझ्याही श्रवणेंद्रियाला परिचित असलेल्या घंटेचे ठोके आजही अगदीं तसेच पडतात व दिवसाच्या अखेर श्रांत झालेल्या विद्यार्थिनी घरट्याकडे परतणाऱ्या पाखरांप्रमाणें आजही गटागटानें परत फिरतात. विमल, सर्व कांहीं अगदीं अबाधित आहे. कशालाही खंड पडलेला नाहीं ! चक्राचा एकही फेरा थांबला नाहीं, खिळला नाहीं, चुकला नाहीं ! तुझी अनुपस्थिति क्षणभर भासली न भासली, तोंच तिची स्मृतीही लुप्त झाली !

~ ~ ~

सांग विमल, काय झालं ? हृदयहीन समाजयंत्र तसेंच फिरत असेल व कालचक्रालाही खंड पडला नसेल !

बाजारू वृत्तपत्रांच्या उपेक्षित कोंपऱ्यांत तुझ्या करुण निधनाची वार्ता आली असेल आणि गेली असेल. खलजिव्हेच्या चपल नागिणी गरळ ओकत फिरल्या असतील आणि फिरत असतील. तुझ्या उमलत्या आयुष्याला कृतांतानें नख लावलें, तरी घोरत पडलेल्या समाजपुरुषानें त्याची दखलही घेतली नसेल. पण विमल, आम्ही जाणूं चाहतों! शंकेनें व दुःखानें आमचें हृदय व्याकुळ झालें आहे. तुझ्या शोककारक निधनाचें वृत्त ऐकल्या दिवसापासून आम्हांस अगदीं चैन नाहीं. जहरी इंगळीप्रमाणें एकच प्रश्न आम्हांस वारंवार डंख करीत आहे. कीं काय झालें? विमलला खरोखर काय झालें?

~ ~ ~

—सांग विमल, आम्ही जाणूं चाहतों! ह्या अघोर अनर्थापाताचें कारण आम्ही जाणूं इच्छितों. ओठांवरील जारही न वाळलेल्या तरुण जीवांचे निरपराध बळी कां जातात व कसे जातात तें आम्ही जाणूं इच्छितों. सांग विमल, सांग, तुला काय झालें? षोडशीही पुरती न ओलांडलेल्या तुझ्या कोवळ्या जीवनाची इतिश्री इतकी भयंकर व इतकी अकल्पित कशी झाली? तुझ्या आयुष्याचा आरंभ हाच त्याचा अंत कसा ठरला? मरणाच्या सर्वभक्षक खाईत तुझा पाय कसा पडला? तुला तिथें कुणीं ओढलें? कुणीं ढकललें? संसाराच्या दाहक तापत्रयाला कंटाळून तूं मृत्यूच्या गार छायेला गेलीस का? आयुष्याचें ओझें वाहवेना म्हणून तूं तें मरणाच्या स्वाधीन केलेंस का? जीवनाचा प्याला मरणापेक्षांही जहरी होता म्हणून तूं तो पालथा केलास का?

आरंभाची ओळख होण्यापूर्वीच तुला अंताची आठवण कां झाली!

संसारतापापासून अलिप्त आणि मातापितरांच्या मायाछत्राखालीं वाढणाऱ्या तुला पोरीला तेथून घाईनें कां निघावेंसें वाटलें? तुला कुणीं ओढलें? कुणीं भूल दिली? मृत्यूच्या चकव्यानें तुला कसें चकवलें?

~ ~ ~

सांग विमल, तुला काय झालें तें! तुझ्या जितेपणीं तुला कधींही न बघितलेलें, पण तुझ्या मरणानंतर तुझ्यावर भाऊपणाचा हक्क सांगणारे आम्हीं आज लाचारपणें तुला पुसत आहोंत. तुझ्या प्राणांतिक प्रसंगांतही जे असून

नसल्यागत झालों, ते तुझ्या धर्मांचे बंधु हतबुद्धपणें तुला विचारीत आहोत. लहानग्या बहिणीच्या सर्वस्वावर व जीवावर बेतली असतांहि जे मूढासारखे निद्राविवश होतों, ते आम्ही, आजच्या नादान समाजाचे घटक, तुला विनवीत आहोंत ! सांग विमल, सांग, तुला काय झालें ? निश्चितपणें खेळणाऱ्या कोंबडीच्या अजाण पिलाला चाहूलहि न देतां झडपून नेणाऱ्या ससाण्याप्रमाणें मृत्यूनें तुला कसें उचललें ? विनाशानें तुला कसें घेरलें ? घातपातानें तुला कसें गांठलें ?

~ ~ ~

सांग विमल, सांग ! अंबाझरीच्या काळ्या जलराशींना जें माहीत आहे तें आम्हांला सांग ! इतरांना जीवन, पण निष्ठुरपणें तुला मात्र मरण देणाऱ्या त्या तळ्याला जें माहीत असेल ते आम्हांला सांग. तुझ्या मरत्या श्वासानेंहि फडफडून उठलेल्या तिथल्या झाडझाडोऱ्याला जें ठाऊक असेल तें आम्हांला सांग ! तुझ्या क्षीण किंकाळीला कळवळून पडसाद देणाऱ्या तिथल्या सहृदय टेकड्यांना जें ज्ञात असेल तें आम्हांला सांग ! शाळेपासून अंबाझरी नामक यमद्वारापर्यंत तुझा इच्छेनें किंवा अनिच्छेनें अंतिम प्रवास होत असतां मार्गस्थ वस्तुजातानेंहि जें बघून जड श्वास सोडले, तें आम्हांला सांग ! तुझ्या अंताचा अज्ञात क्षण हा ज्या कृष्णनाटकाचा परमोच्च बिंदू होता, तो साद्यंत प्रकार आम्हांला कळूं दे !

~ ~ ~

विमल, विमल, काय झालें तुला ? बोल बाई, काय झालें तुला ! तुझीं हतभाग्य मातापितरें आक्रंदून तुला विचारीत आहेत ! तुझ्या धर्मांचे भाऊ धाय मोकलून तुला पुसत आहेत. थरारून गेलेली लेकुरवाळी कुटुंबें तुला विनवीत आहेत ! गूढ अज्ञाताचा दाट बुरखा पांघरून आलेलें तुझें मरण, ह्या सर्वांच्या काळजांत घर करून राहिलें आहे. सांग, सांग, आमच्या समाजाचें रक्षक परकोट कुठें निखळले आहेत ? अज्ञाताचे अत्याचारी हात आमच्या मुलीबाळी कशा टिपूं शकतात ?

वेडावलेली कल्पना आम्हांला भलभलतीं दृश्यें दाखवते, संशयाची सैराट पिशाच्चें आम्हांस चैन पडूं देत नाहींत ! मरण दुःसह आहे, पण मरणाचें गूढ आम्हांस जास्तच दुःसह वाटतें !

~ ~ ~

हे प्रकाशा ! तूं सांग विमलला काय झालें तें ! पापी तुला भितात. वंचक अंधाराचा आश्रय घेतात. रक्तपिपासु रात्रीं आपलीं घोर कर्मे आटोपतात ! मग सांग, आपला सारा किरणसंभार घेऊन तूं आकाशाच्या मनोऱ्यावर पहारा देत असतां हें कसें झालें ? मरणाच्या मार्गावर विमलचे पाय कसे पडले ! देखतां डोळां ती अदृश्य कशी झाली ? तिमिराच्या भयानक शक्तीपासून तूं तिचें रक्षण कां केलें नाहींस ?

~ ~ ~

सांग जलदेवते, तूं तरी सांग ! विमलच्या मरणाचें रहस्य पोटांत ठेवून असें हसणें, तुझ्यासारख्या सदय देवतेला शोभत नाहीं ! वीचिवलयांचें वाळे पायांत घालून अजूनही तुझ्याच्यानें नाचवतें कसें ? कमलाच्या पाकळीप्रमाणें पसरणारे तुझे तरंग मृत्यूचे कराल दंष्ट्र कधींपासून झाले ? जीवनाच्या देवतेनें मरणाचें दास्य कधींपासून स्वीकारलें ! शाळेंतून निघाल्यावर अखेर ती तुझ्या आसऱ्याला आली, तूं तिच्या तप्त मस्तकावर आपले शीतल कर फिरवावयाचे होतेस, आपल्या वत्सल कुशींत घेऊन तिला संजीवन द्यायचें होतेंस, आपल्या तरंगसंगीताची तिला अंगाई म्हणायची होतीस, निदान त्या चकलेल्या बाळीचे बोट धरून वत्सलतेंत तुजपेक्षां सरस असलेल्या तिच्या मातापितरांकडे तिला पोहोंचते करावयाचें होतेस ! पण दुष्टे, त्यांपैकीं कांहींही तूं केलें नाहींस. एकाद्या रक्तपिपासु राक्षसीसारखी तूं वागलीस ! एकाद्या घातकी हडळीसारखें तूं वर्तन केलेंस ! कुठल्याही लावेसारखी तूं करणी केलीस. तूं विमलचा गळा दाबलास. तूं तिला गुदमरून मारलेंस. तूं तिचा जीव घेतलास ! सांग, तूं तिचा कां प्राण घेतलास ? सांग, तूं तिचा कां जीव घेतलास ! जगांत दुसरे पापी कमी होते का ? जगांत दुसरे दुष्ट कमी होते का ! बायकांना छळणाऱ्यांची, अबलांवर अत्याचार करणारांची, जगांत वाण होती का ? त्यांची दुनियेंत कमतरता होती का ? मग तूं त्यांना कां बुडविलें नाहींस ? तूं त्यांचा नाश कां केला नाहींस ? आपल्या हजार विळख्यांचे गळफांस तूं त्यांना कां घातले नाहींस ?

सांग, तूं विमलला कां मारलेंस ? सांग, तिला काय झालें होतें, विमलला काय झालें होतें ?

~ ~ ~

अंबाझरीच्या आसमंततलि शिलाराशींनो आणि वनराजींनो ! विमलला काय काय झालें हें कृपाळूपणें तुम्ही तरी सांगाल काय ?

तिच्या क्षीणतम उसास्याचेही पडसाद तुमच्या सहृदयांतून उमटले असतील ! तिच्या श्वासाचे किंवा निःश्वासाचे, रोदनाचे किंवा आक्रंदनाचे सूर पुन्हा एकदां घुमवूं लागा ! तुम्हांला ठाऊक असलेल्या प्रकाराचें ध्वनिचित्र आम्हांस अवगत होईपर्यंत काढीत बसा, म्हणजे विमलला काय झालें होतें त्याचा कयास आम्हांस बांधतां येईल.

मोटारीची घरघर तुमच्या हृदयावर आदळली होती काय ? गुदमरलेल्या किंचाळीनें तुम्हीं कंपित झालां होतां काय ? उन्मत्त हास्य तुम्हीं निनादित केलेंत काय ? पाशवी गुरगुर तुम्हांला प्रतिध्वनित करावी लागली काय ? दीन हंबरड्याचे स्वर तुम्हीं उमटवलेत काय ?

सांगा शिलाराशींनो ! सांगा वनराजींनो ! तरुण कन्यकांच्या सुरक्षिततेच्या नांवानें आम्ही तुमच्या पुढें पदर पसरतों, तुमची नम्रपणें करुणा भाकतों ! सांगा, कसल्या अशुभ ध्वनीचे पडसाद तुम्हांस काढावे लागले ? सांगा कसल्या अमंगल नादाचे निनाद तुम्हीं उमटाविलेत ?

शब्दशून्य स्वर हाही अर्थगंभीर असतो हें ध्यानांत आणा, आणि सांगा, कीं साद–पडसादांचे कोणते भीषण खेळ तुम्हांला खेळावे लागले ?

~ ~ ~

नाहीं ! कोणीच बोलत नाहीं ! विमलला काय झालें होतें हें कोणीच सांगत नाहीं ! शतधा विदीर्ण होऊं बघणाऱ्या अनेक मातापितरांच्या सचिंत हृदयांना अखेरचें समाधानही कोणी देऊं शकत नाहीं, कोणी देऊं चहात नाहीं !

एक दिवस विमल भर संभावित वस्तींतल्या शाळेंत जाते. हजेरीपटाला जबाब देते. तिला कल्पनाही नसते, कीं इहलोकच्या हजेरीपटावरून तिचें नांव भडक तांबड्या रेघेनें बाद करण्याच्या बेतांत मृत्यु आहे म्हणून ! विमल वह्या पुस्तकें आणायला म्हणून निघते. तिला जाणिवही नसते, कीं चित्रगुप्ताच्या पुस्तकांतलें तिचें खातें संपलें आहे म्हणून ! विमलचें शाळेबाहेर पाऊल पडतें, आणि लवकरच जगाबाहेरही ! !

~ ~ ~

छेः ! नाहीं सहन होत ! सांग विमल, तुला काय झालें तें ? तुला तुझ्या साऱ्या मैत्रिणींची आणि भविष्याच्या पोटांत दडलेल्या त्यांच्या सुखदुःखांची शपथ आहे !

विमल, तुला मातृप्रेमाची शपथ आहे, तुला पितृप्रेमाची शपथ आहे, तुला बंधुप्रेमाची आण आहे ! सांग तुला काय झालं तें ?

माशांच्या दंताघातांनीं विच्छिन्न झालेल्या विमलच्या विवर्ण मुखा ! बोलत्या भावनांचा रंग एक क्षणभरच पुन्हा धारण कर ! कायमच्या निःशब्द झालेल्या विमलच्या जिव्हे ! सजीवतेचा शब्द आणखी एकदां तरी काढ ! फुटलेल्या दर्पणाप्रमाणें बिंबशून्य झालेल्या विमलच्या नेत्रा ! जिवाच्या भावलीचें दर्शन तुझ्या गवाक्षांतून एकदां तरी होऊं दे !

विमलच्या प्राणशून्य प्रेता ! ऊठ, सजीव हो ! इतर सजीवांची प्रेतें होऊं नयेत म्हणून क्षणभर प्रेतांनाही सजीव झालें पाहिजे. मरत्या प्राणज्योतीच्या प्रकाशांतही पुढचे मार्ग आम्हांस शोधले पाहिजेत. म्हणून ऊठ, आणि सांग कीं, आजाण मुली मरणाच्या मार्गावर कशा खेंचल्या जातात ! आयुष्याचा बहुरंगी बुद्‌बुद् पुरता फुलण्यापूर्वींच कां फुटतो ? नीटशा डवरण्या पूर्वींच वाढत्या वेलीवर निखाऱ्यांचा वर्षाव कसा होतो ? ऊठ, प्रेता ऊठ, आणि हे सारें आम्हांला सांग ! विमलची प्राणज्योत कशी मालवली गेली ? तिचा अकाल अंत कसा झाला ? तिला काय झालें होतें ? विमलला काय झालें होतें ? आम्हीं जाणूं इच्छितों. आम्हांला सांग ! तिला काय झालें होतें ?

२६–१०–३७

卐 卐 卐

# किर्लोस्करबुवांची बायकोबाजी !

## [ एक विच्छेदन ]

" किर्लोस्कर ", " स्त्री " व " मनोहर " ह्या मासिकांचा अजबखाना संभाळणारे महाराष्ट्रांतलें सुप्रसिद्ध लोखंडी संपादक श्री. शंकर वासुदेव किर्लोस्कर ह्यांच्या द्वितीय भार्यालाभाची वार्ता आतां अखिल महाराष्ट्राचे कान अपवित्र करती झाली आहे.

**"भल्या माणसा दसलाखाची गोष्ट सांगतों फोडुं नको।
पन्नाशीची झुळुक लागली बाइल दुसरी करूं नको"**

हें शारदा नाटकांतल्या रंगेल थेरड्यास सांगितलेलें बोधवचन श्री. किर्लोस्कर ह्यांच्या कानांत गुणगुणण्याची कांहींच आवश्यकता नाहीं.

किर्लोस्करी लोखंडी मालाच्या जोडीला "मोदक–याकुती" वगैरेंचा जोडधंदा (Bye—Industry) सुरू न केल्याविषयीं पस्तावण्याचा प्रसंगही बहुधा ह्या लग्नामुळें त्यांच्यावर येणार नाहीं; कारण ह्या लग्नांतील नवरदेव श्री. **शं. वा. कि.** हे चाळीशी पार पडलेले एक नवजवान आहेत; तशाच त्यांच्या वधूही पस्तीशीच्या ऐन नवयौवनांत असलेल्या बाई आहेत. श्री. किर्लोस्कर हे स्वतः लेकुरवाळे गृहस्थ आहेत आणि त्यांच्या विधवा नववधूही "पहिल्या घरचें" एक मूल घेऊन त्यांचा संसार थाटावयास येत आहेत!

अर्थात् आपल्या दिग्विजयी चिरंजीवांना नव्या नवरीसकट सुन्मुख दाखवावयास येत असलेले पाहून, "किर्लोस्कर" मासिकांत आपल्या हृदयस्पर्शी स्त्रीविषयक प्रश्नांची लांबण लावून "स्त्रियांनो, चाललांत कोठें?" असा गहिंवरून हंबरडा फोडणारे वरपिते डॉ. वा. का. किर्लोस्कर ह्यांच्यावर आतां "**नांदा सौख्यभरें। शोभो तव कुल सत्कुमरें**" असा स्नेहाळ आशीर्वाद देण्याचा प्रसंग येणार नाहीं हें उघड आहे!

~ ~ ~

खरोखर, श्री. किर्लोस्कर ह्यांच्या निर्लज्ज लग्नाविषयीं लेखणी संभाळून, शिष्टाचारानें आणि संभावितपणें लिहिणें जवळ जवळ अशक्य आहे! श्री. किर्लोस्कर हे एक जबाबदार सद्गृहस्थ आहेत असें आम्हीं कधींच समजत नव्हतों. पण कांहीं लोक तसें समजत होते. श्री. किर्लोस्कर हे विवेकशील आहेत असें आम्हांला कधींच वाटलें नव्हतें, पण कांहीं लोकांची तशी कल्पना होती. श्री. किर्लोस्कर हे एक समाजहितैषी आहेत असा भ्रम आम्हांस कधींच नव्हता, उलट ते पहिल्या प्रतीचे, आला दर्जाचे, गेले गुजरलेले समाजविरोधी (Anti-Social) आहेत हीच आमची निश्चिती होती.

परंतु कांहीं भाबड्या लोकांना असें वाटत होतें कीं श्री. किर्लोस्कर हे कर्ते समाजसुधारक आहेत, विवेकशील आहेत, ते प्रामाणिक आहेत, ते तत्त्वनिष्ठ आहेत, आणखी कितीतरी अज्ञात गोष्टी ते आहेत......व जाहिरातबाजी आंगवळणीं पडलेले किर्लोस्करबुवाही स्वतः असलाच उपासनी आव आणीत होते !

~ ~ ~

श्री. शं. वा. किर्लोस्कर ह्यांच्या पत्रिकेंतील द्वितीय भार्यायोग आज फळास आला. त्यांनीं आज म्हाताऱ्या हौसेनें म्होतूर लावून टाकला ! आपल्या शिळ्यापाक्या तारुण्याच्या उसन्या अवसानावर ह्या नवमतवादी गड्यानें धूम-धडाक्यानें स्वतःला " दुस्सरपणीं उजवून घेतलें ।"

कांहीं एका मर्यादेंत विवाह·ही सर्वस्त्री वैयक्तिक बाब आहे व त्यांत ढवळा-ढवळ करण्याचें कोणासच कारण नाहीं. ह्या मर्यादेच्या सामान्य कक्षेंत येण्यासारखा श्री. शं. वा. कि. ह्यांचा म्होतूर असता तर त्याची उठाठेव करीत बसण्याचीं कोणासच गरज नव्हती. म्हातारपणीं हौसेला पालवी फुटलेली राजी अशी मिया आणि बिबी परस्परांच्या गळ्यांत पडल्यास त्यांत कुणाच्या पोटांत दुखण्याचें कांहींच कारण नव्हतें व कुठल्या "पेटंट' औषधाचा त्यांच्या कोलमडत्या संसारास आधार आहे ही चौकशीही कोणी केली नसती !

परंतु सुधारकशिरोमणी, नवमतनंदन, संपादकशौंड श्री. शं. वा. कि. ह्यांचा **हा शरीरसंबंध निरुपद्रवी विहाऱ्या कक्षेंत येत नाहीं. तो एक असामान्य, असामाजिक, अमानुष व पुऱ्या अर्थानें राक्षसविवाह आहे. जोपर्यंत व्यक्तींचीं कृत्यें व वर्तन समाजहितास बाधा आण-णारें नाहीं, तोंपर्यंत त्या वर्तनास खाजगीपणाचें रक्षण समाज देऊं शकतो; वैयक्तिक स्वातंत्र्याची हीच मर्यादा होय.**

परंतु जेव्हां एकादी वारा प्यालेली व्यक्ति, अमानुष, अमानव व असामाजिक वर्तन करूं लागतें, तेव्हां तिच्या बेलगाम उधळण्याला पायबंद घालून तिच्या पाठीवर कोरडे उडवण्याचें काम प्रत्येक जागरूक समाजास करावें लागतें.

पिसाळलेल्या कुत्र्याच्या डोक्यांत काठी घालणें हें जितकें सामाजिक कर्तव्य होय, बुद्धिभ्रंश झालेल्या वेड्याला चार भिंतीआड मुसक्या बांधून कोंडणें हें जितकें सामाजिक कर्तव्य होय, तितकेंच समाजाचें आरोग्य व नीतिमत्ता उन्मत्त वर्तनानें उध्वस्त करूं बघणाऱ्या विकृतवृत्ति माणसाचें दमन करणें हेंहि सामाजिक कर्तव्य होय.

~ ~ ~

श्री. शं. वा. कि. ह्यांचें राक्षसलग्न आज सामाजिक चर्चेचा व टीकेचा विषय झाला आहे, ह्याचें कारण त्यांच्या लग्नाची जात होय. एका कायस्थ पुरंध्रीचा हात वैदिक पद्धतीनें पेटत्या होमासमोर आपल्या हातांत घेणाऱ्या ह्या संपादक-शार्दूलानें आपल्या जिवंत प्रथम पत्नीच्या वैवाहिक जीवनाची होळी त्याच क्षणीं अगदीं निःशंकपणें पेटवून दिली !

आपल्या दुसऱ्या लग्नाचा सोहळा आपल्या वाढलेल्या मुलांमुलींस डोळाभर दाखवतांना ह्या नवमतवारुणीमत्त घोडनवऱ्यास शंकादेखील वाटली नाहीं. आजपर्यंत ज्या वैदिक संस्कृतीवर व आचारांवर आग पाखडतां पाखडतां ह्या संपादकब्रुवाची हयात उधळली गेली, त्या वैदिक संस्कारांचा उपयोग आपल्या स्वार्थासाठीं करून घेतांना ह्या तत्त्वनिष्ठास कसलीच लज्जा वाटली नाहीं !

~ ~ ~

श्री. किर्लोस्कर ह्यांच्या विवाहाचें समर्थन त्यांना किंवा दुसऱ्या कोणालाहि कसें करतां येईल तेंच आम्हांस कळत नाहीं !

ज्या पत्नीबरोबर वयाची कित्येक वर्षें त्यांनीं संसार केला, जिच्यापासून त्यांना मुलेंबाळें झालीं, जी आजपर्यंत त्यांच्या सुखदुःखांत सहभागी होती, ती आजच एकाएकी त्यांना नकोशी कशी झाली ?

स्त्रियांविषयीं रडरडून लेख लिहिणारे त्यांचे जन्मदाते डॉ. वा. का. किर्लोस्कर ह्यांनीं त्यांच्या गळ्यांत खरोखरच एकादी घोरपड बांधली होती काय ?

आणि खरोखरच तसें असलें तरी जिच्या सहवासांत त्यांनीं जवळ जवळ मसणांत गोवऱ्या जाईपर्यंत संसार केला, तिच्या आयुष्याचे आज असे धिंडवडे

काढण्याची कसाबकरणी त्यांनीं काय म्हणून केली ! मानवतेच्या, न्यायाच्या, निष्ठेच्या किंवा सदयतेच्या कोणत्या तत्त्वास धरून त्यांचें वर्तन झालें ?

**श्री. किर्लोस्कर ह्यांनीं आपल्या पुरुषत्वाचा फायदा घेऊन एका कायस्थ विधवेला चटकन वैधव्यपंकांतून ओढून बगलेंत मारलें, पण पाठीं दोन पोरें असणाऱ्या त्यांच्या पत्नीला इच्छा असली तरी एकाद्या दुःखी विधुराचें आयुष्योद्यान** फुलविण्यास पारठीं पोरें पोटीं मारून निघणें शक्य नाहीं, हें मासिक "**स्त्री**" संपादन करणाऱ्या ह्या नारीजीवनाच्या दिवट्या विचक्षणास कसें कळलें नाहीं ?

आपल्या प्रथम पत्नीचा ह्या चोखंदळ नवनीतिज्ञास कंटाळा आला असेल, तिलाही तलाख देऊन मोकळी करण्याइतका तो उदार असेल व उच्च जातींत घटस्फोट जारी नसल्याविषयीं रिवाजाप्रमाणें तो हिंदु समाजाच्या नांवानें शंख करीत असेल, हें सारेंच शक्य आहे !

**परंतु वयाच्या चाळीस वर्षांपर्यंतच्या सोबतिणीस जो क्षणिक लहरीसरसा नाकारू शकतो, आपल्या वर्तनानें तिची स्थिति प्राप्त परिस्थितींत तरी शोचनीय होईल हा माणुसकीचा विचारही ज्यास शिवत नाहीं, आपल्या रंगेल दुष्कृत्याचा आपल्या मुलांबाळांवर विपरीत परिणाम होईल हा पितृसुलभ विचारही ज्या अनैसर्गिक जीवास सुचत नाहीं, तो सुखवादी समंध आपल्या द्वितीय लग्नानें तरी अखेरचा व कायमचा संतुष्ट होईल ह्याची काय निश्चिती ?**

वार्धक्यसुलभ विकृति, भ्रमरवृत्ति, निष्ठाहीनता, कर्तव्यशून्यता व चोखंदळपणा ह्यांचा विध्वंसक लोंढा मोकळा करण्यासाठींच घटस्फोटाची कवाडें खुलीं केली पाहिजेत काय ?

लग्न हा खरोखरच एक सट्टा आहे व सदैव तो तसा राहील ! प्रियाराधनाच्या मादक काळांतसुद्धां परस्पर स्वभावपरीक्षा होण्यापेक्षां फसवणूक होण्याचाच संभव अधिक असतो हें कोणताही सुज्ञ माणूस नाकारील असें नाहीं.

परस्परांशीं शेकडा शंभर टक्के जुळणाऱ्या व्यक्तींचें लग्नग्रंथीनें एकत्र येणें ही घटना सदैव अपवादात्मकच राहील. अशा स्थितींत जडलेलें संबंध निष्ठेनें व

कर्तव्यबुद्धीनें कायम राखणें, परस्परांस संभाळून घेणें व शक्य तोंपर्यंत एकमेकांचे विरोध जुळते करून घेणें हेंच समंजस व सुशिक्षित विवाहितांचें कर्तव्य होय. विवाह ही एक पवित्र व महत्त्वाची समाजसंस्था आहे **व समाजाचें आरोग्य, पावित्र्य व सुस्थिति राखूं इच्छिणाऱ्या जबाबदार घटकांनीं स्वतःस थोडी तोशीस लागली तरी ती सोसून समाजांत घाणेरडे पायंडे पाडण्याचें टाळलें पाहिजे !**

विवाहसंस्थेचें पवित्र्य नाकारणारा वर्ग असणें शक्य आहे आणि अजिबात विवाहसंस्थेची अनवश्यकता प्रतिपादन करणारी विद्वज्जनसभा असणेंहि अशक्य नाहीं. परंतु श्री. शं. वा. कि. ह्यांनीं विवाहाची गोडचूक ( घोडचूक ? ) दोनदां करून निदान विवाह ह्या संस्थेस तरी आपली सक्रिय सहानुभूति दाखवून टाकली आहे.

परंतु त्यांचा हा म्हातारपणीं केलेला विवाह अत्यंत हीन, अत्यंत स्वार्थी, अत्यंत बेजबाबदार, अत्यंत समाजविरोधी आहे !

दोन पोटचीं, एक ' आलेलें ' व तीन वाङ्मयीन कच्चींबच्चीं संभाळणाऱ्या ह्या स्थविरानें समाजाचें आरोग्य पार बिघडवून टाकलें असून एक अत्यंत गलिच्छ व समाजविरोधी उदाहरण घालून दिलेलें आहे !

~ ~ ~

आणि हे चाळिशींत मुंडावळ्या बांधून लाजाहोम करणारे नवरदेव कोण आहेत ?

ते " कुंकू " तले काकासाहेब आहेत काय ? ते स्त्रियांच्या दुःखानें न कळवळणारे " बुरसटलेलें " सनातनी आहेत काय ? ते अल्पवयस्क सती गोदावरीशीं शादी लावणारे बुड्ढे उपासनी बाबा आहेत काय ? ते " अंजनी " भक्त नारायणमहाराज केडगांवकर आहेत काय ? ते दर्जीबाबा आहेत काय ? ताजुद्दीनबाबा आहेत काय ? शिर्डीबाबा आहेत काय ?

नाहीं ! नाहीं ! हे महामहंत नवनीतिनंदन किर्लोस्करबाबा आहेत ! स्त्रियांचीं दुःखें पाहून हे आजवर ढसढसा रडले आहेत. जन्मदात्या स्त्रीजातीची गुलामी पाहून रोज ह्यांनीं अर्धा डझन रुमाल खराब केले

आहेत! दांभिकपणाची ह्यांना चीड आहे, खोटेपणा ह्यांना मानवत नाहीं, फसवेपणापासून हे दहा कोस दूर पळतात!

कुठल्याही सडक्या, नासक्या, क्षुल्लक गोष्टीविषयीं हे "**राक्षसी समाजाला**" **फांशी द्यायला निघतात! स्वतःच्या नाकाला लागलेल्या घाणी-विषयीं हे "जालीम समाजा" लाच जिम्मेवार धरतात व आपल्या मर्यादित अकलेविषयीं व अफाट स्वच्छंदीपणाविषयींही हे समाजालाच बोल लावतात!**

**हातीं धरण्यासारखी समाज ही कोणतीही एक चीज नसल्यामुळें खोबरें फस्त केल्यावर मारुतीपुढें टाकलेल्या कवट्यांप्रमाणें सान्या वैयक्तिक बेवकूफ बेजबाबदारीचीं फळें हे समाजाच्या पुढें फेकून हात झटकतात!**

**खरोखर समाज, "राक्षसी समाज," "सैतानी समाज" हा काय हातांत धरून वाटेल तसा खुपसायला किंवा वळवायला किर्लोस्करांचा लोखंडी नांगर आहे, म्हणून किर्लोस्कर व किर्लोस्करांचीं तीन कुत्रीं आपल्या वैयक्तिक गलिच्छपणामुळें लुतलेल्या अंगाविषयींसुद्धां अझ्राप हिंदु समाजाला डसायला धावतात?**

**समाज व्यक्तींचा बनलेला असतो व शं. वा. कि. सारख्या कर्तव्यहीन व्यक्तीच आपल्या उज्वल उदाहरणानें त्याला 'सैतानी' स्वरूप देतात.**

**निव्वळ वैयक्तिक, जड व अनिर्बंध सुखाच्या मागें लागणारे कीटकच समाजाचा नर्क बनवूं शकतात. साधुत्वाच्या नांवावर अनिर्बंध अनाचार माजवणारे उपासनी व नवमतवादाच्या नकली नांवावर बेलगाम सुखाचारांचा नंगा नाच घालणारे किर्लोस्कर हे दोघेही एकाच जातीचे जडवादी भोंदू होत, दोघेही सारख्याच ठिसूळ कांचघरांत राहातात व दोघेही सारखेच समाजविरोधी सर्प होत!**

बुवाबाजीच्या विध्वंसनाचा डिंग किर्लोस्करांनीं काय मारावा ? उपासनींची दोषचिकित्सा नवे वेष घेऊन स्वतःचा आश्रम थाटणाऱ्या शं. वा. कि. नीं काय करावी ? उपासनी व किर्लोस्कर ही एकाच सैतानाचीं दोन नांवें होत ! जुन्या अथवा नव्या धर्मांचें नांव सांगून पैसे पाडावयास बसणें हाच दोघांचाही सामान्य "उद्योग" आहे ! शिष्यशाखेच्या झुकत्या वर्गणीनें "आत्मोन्नति" साधावी हेंच दोघांचेंही एकच ब्रीद आहे !

हलवायाच्या घरावर उपदेशाचीं तुळशीपत्रें वाहाणाऱ्या ह्या धूर्तांनीं जाचक तत्त्वांची तोशीस आपल्या अनिर्बंध जीवनक्रमास मात्र कधींच लागूं दिली नाहीं ! धर्माच्या वा नीतीच्या व्याख्या कशाही मागेंपुढें सरकविल्या, तरी आपण केलेल्या व स्वीकारलेल्या वर्तनाच्या किमान कल्पनांना चिकटून राहाणें आवश्यक आहे, ह्याचें भान दोघांसही उरले नाहीं ! उपासनी जीर्णमतवादाच्या आधारावर गोदावरीशीं शादी लावीत असले, तर किर्लोस्कर त्यांच्या सोयीनुरूप वारंवार बदलणाऱ्या अजीर्णमतवादाच्या आधारावर तोच प्रकार करतात; परमहंसवृत्तीच्या नांवानें उपासनी वस्त्रांचा त्याग करीत असले तर अद्ययावत् नग्नवादाचें कोरें लेबल डकवून किर्लोस्कर सूर्यकिरणांचा यथेच्छ आस्वाद घेतात. उपासनींच्या रंगेल बुवाबाजीस वात्स्यायनाचा आधार असला तर किर्लोस्करांच्या बुवाबाजीस फ्राईडचा आधार गवसतो ! पृथक् कचरा–पेट्यांतील ही एकच घाण होय ! उपासनी व किर्लोस्कर ह्या भोंदू बुवांचें बाह्यरूप भिन्न असलें तरी त्यांचें ध्येय एक आहे. प्याले भिन्नाकृति असले तरी, त्यांतील जहर एक आहे. लंगोटी व पॅण्ट हीं विरोधरूप दिसत असलीं, तरी त्यांची वीण एक आहे !

~ ~ ~

टोकाचा व्यक्तिवाद व जहरी जडवाद ह्यांच्या आहारीं गेल्यामुळें समाज-विरोधी विवाह करणाऱ्यांची संख्या सुशिक्षित समाजांत भयावह वेगानें वाढत आहे.

बहिणीच्या नवऱ्याशीं तिच्या जिवंतपणीं लग्न लावणारीं रत्नप्रभा दामले, कु. रमणभाई, कवि यशवंत, प्रोफेसर कोल्हते व अशीं कित्येक उदाहरणें अगदीं एवढ्यांत घडलीं आहेत. आज फडक्यांचे जिगरी दोस्त श्री. शं. वा. कि. हेही त्या पंक्तीस जाऊन बसत आहेत.

सामान्यतः विवाहित माणसावर एक जबाबदार, शाबूत डोक्याचा, कर्तव्यनिष्ठ व निरुपद्रवी सद्गृहस्थ म्हणून समाज बेलाशक विश्वास टाकतो. पिता, पति, संपादक व भलाबुरा साहित्यिक ह्या दुर्दैवानें एकत्रित झालेल्या बहुविध नात्यांनीं श्री. किर्लोस्कर ह्यांच्यावरील उत्तरदायित्व कितीतरी पटींनीं मोठें होतें.

पण समाजाचे हे जबाबदार घटक उतारवयांतसुद्धां विकृत वृत्तीला व क्षणिक लहरीला बळी पडून समाजविरोधी वर्तन करतात, तेव्हां **रँ. महाजनी** ह्यांच्याच शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यांना **"एखाद्या महारोग्यासारखें वागवून बहिष्कृत केलें पाहिजे!"**

१८–६–३८

卐 卐 卐

# मुस्लिम स्त्रियांची करुण किंकाळी !!

अस्पृश्योद्धारानें नेत्यांचें लक्ष वेधून घेतलें आहे, ग्रामोद्धाराच्या प्रश्नानें पुढाऱ्यांना गुंग करून सोडलें आहे, फार काय सांगावें, गणिकोद्धाराच्या प्रश्नानेंही कित्येक समाजसुधारकांना बेचैन करून सोडलें आहे! परंतु ह्या देशांत जन्मलेल्या, ह्या देशांत वाढलेल्या, ह्या देशाचें सौंदर्य वाढविणाऱ्या मुसलमान स्त्रियांच्या मूक दुःखाला मात्र कोणीही तोंड फोडलेलें नाहीं, त्यांच्याकडे कुणाचेंच लक्ष नाहीं, त्यांना हात द्यायला मात्र कुणीच दयावंत तयार नाहीं!

वास्तविक पाहातां ह्या देशाला अलंकारभूत असणाऱ्या मुस्लिम ललनांचीं दुःखें फार मोठीं आहेत, त्यांच्यापुढें पडलेले प्रश्न मोठे बिकट आहेत आणि त्यांच्या प्रश्नांना तोंड फोडायला कुणीच पुढें येत नाहीं!

~ ~ ~

हजरत पैगंबराची स्त्रीविषयक दृष्टि अत्यंत उदार व मोठी प्रेमळ अशी होती व त्यांच्या काळचे ते केवळ प्रेषितच नव्हे, तर अव्वल सुधारकही होते! अवघड आणि अशुद्ध अशा परिस्थितींतून पैगंबरानें अरबी स्त्रियांची पुष्कळच सोडवणूक केली. पण आज?

आजच्या पुढारलेल्या काळांत मात्र ह्या देशांतील मुस्लिम स्त्रियांची स्थिति अत्यंत बिकट आहे ! हिंदु स्त्रिया स्वातंत्र्याचा यथेच्छ उपभोग घेत असतां, अस्पृश्यांनीं आत्मोद्धाराचा मार्ग चोखाळला असतां, मुस्लिम मुलींचा मुका मार मात्र अजूनही टळत नाहीं. बुरख्याच्या बंदींत इस्लामी प्रमदा आज बद्ध आहेत. बुरख्याच्या दाट पडद्यामागें चाललेल्या मुसलमान स्त्रीच्या शोकपूर्ण आयुष्यनाटकाची कुणाला दाद नाहीं, फिर्याद नाहीं ! सहानुभूतीच्या नजरेनें त्यांच्याकडे पाहाणाऱ्याचेही डोळे फोडावयास निघेल इतका त्यांचा पुरुषसमाज वेडा आहे ! पतितोद्धाराच्या उदात्त हेतूनें त्यांना हात द्यायला जो धजेल, त्याला हात दाखवण्यास मुसलमान पुरुष सिद्ध होईल ! मानवतेच्या नात्यानें जो त्यांना जवळ करील, तो अनेक आपत्तींना जवळ करील.

पिंजऱ्यांतल्या मैनेपेक्षां किंवा गोठ्यांतल्या गाईपेक्षां मुस्लिम स्त्रीची अवस्था जास्त स्पृहणीय नाहीं. तिला बोलण्याचें स्वातंत्र्य नाहीं, चालण्याचें स्वातंत्र्य नाहीं, हसण्याचें स्वातंत्र्य नाहीं, नटण्याचें स्वातंत्र्य नाहीं, तिला शिकण्याचें स्वातंत्र्य नाहीं, तिला प्रेमविवाहाचें स्वातंत्र्य नाहीं !

~ ~ ~

मुस्लिम युवती ही वृत्तीनें वा स्वभावानें आंबलेली स्त्री नाहीं. ती विनोदप्रिय असते, ती क्रीडाप्रिय असते, ती स्वातंत्र्यप्रिय असते, ती मोठी रसिक, प्रेमळ व बुद्धिमान् असते !

तथापि मुसलमान पुरुषसमाजाच्या आकुंचित, जुलमी व प्रतिगामी स्वभावामुळें मुसलमान स्त्रियांच्या बहुमोल गुणसंपदेला व सेवेला हें राष्ट्र फार मोठ्या प्रमाणांत मुकत आहे. आणि आज राष्ट्र स्वातंत्र्योन्मुख झालें असतां मुस्लिम स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न हा अस्पृश्योद्धाराप्रमाणेंच राष्ट्रीय महत्त्वाचा प्रश्न आहे.

अज्ञानाचे बोळे तोंडांत कोंबून "पडद्या" च्या पार्सलांत त्यांना जखडबंद ठेवणें हा घोर अन्याय व राष्ट्रविघातक घटना आहे.

~ ~

मुस्लिम स्त्रिया पडदा सारून मोकळ्यांत आल्याच पाहिजेत. जगाची ओळख त्यांना व त्यांची ओळख जगाला पटलीच पाहिजे. हिंदु स्त्रियांप्रमाणेंच आयुष्याच्या धकाधकीच्या मामल्यांत स्वातंत्र्याच्या आत्मविश्वासानें त्यांनीं पडलेंच पाहिजे. दोन धक्के घेणें व दोन धक्के देणें हा अनुभवाच्या पाठशाळेंतील धडा त्यांनीं गिरवलाच पाहिजे.

पडदे फेकून देऊन खुल्या चेहऱ्यानें मुसलमान स्त्रिया मोकळ्या वातावरणांत आल्याच पाहिजेत. ह्या देशांतील ख्रिश्चन, हिंदु आदि स्त्रियांना मिळणारें उदार शिक्षण त्यांना जितक्या लवकर मिळेल, तितका त्यांचा, त्यांच्या समाजाचा व ह्या देशाच्या उद्धाराचा प्रश्न सुटत जाईल.

~ ~ ~

पडदे न लावतां मुस्लिम मुलींना शाळेंत नेणारी मोटरलॉरी कधीं दिसेल? दुचाकीवर बसून स्वैरपणें विहार करतांना मुसलमान रमणी कधीं दिसतील? संमिश्र शिक्षणसंस्थांतून खेळीमेळीनें सहाध्यायांबरोबर वागडतांना इस्लामच्या कन्या कधीं दिसतील?

उदार शिक्षणाच्या तिखट सुरीनें अज्ञानाचे व अंधश्रद्धेचे पडदे फाडून आपल्या इतर देशभगिनींप्रमाणेंच मुस्लिम स्त्री दिलखुलास स्वतंत्र केव्हां होईल?

सटींसहामाशीं बुरख्याच्या बासनांतून आंधळी कोशिंबीर खेळत जाणारी बाई म्हणजे मुसलमानीण ही परिस्थिति केव्हां बदलेल?

दुकानांतून, रस्त्यांतून, सिनेमागृहांतून, इस्पितळामध्यें, बागेंत आणि समुद्राच्या कांठावर, सर्व स्थळीं व सर्व धंद्यांत मुस्लिम स्त्रिया हिंदु स्त्रियांप्रमाणें केव्हां दिसतील?

केवळ जनानखान्याच्या बंदिस्त तुरुंगांतील स्वयंपाकिणीचा व दासीचा पेशा सोडून ती पावलोंपावलीं, शिक्षिका म्हणून, परिचारिका म्हणून, टायपिस्ट म्हणून, दुकानदारीण म्हणून प्रकटपणें कधीं वावरूं लागेल?

हें सर्व तत्काळ झालें पाहिजे. हें सर्व तावडतोब झालें पाहिजे. मुसलमान स्त्रीसमाज वाऱ्याप्रमाणें स्वतंत्र व स्वैरगामी असा बनला पाहिजे. त्यांच्या बेड्या निखळून पडल्या पाहिजेत, त्यांचे पिंजरे तुटून पडले पाहिजेत! त्यांचे पडदे फाटून गेले पाहिजेत!

जनानखान्यांत व पडद्यांत पिचत पडलेली ही हिंदुस्थानची शक्ति, ही हिंदुस्थानची संपत्ति, प्रकट झाली पाहिजे, मोकळ्या वाऱ्यांत आली पाहिजे !

~ ~ ~

हिंदु स्त्रियांच्या दुःखानें झुरणाऱ्या साऱ्या पुरोगामी मासिकांनीं मुसलमान ललनांविषयीं मात्र अत्यंत तिरस्करणीय अशी त्रयस्थ वृत्ति धारण केली आहे. ही वृत्ति संकुचिततेच्या पोटीं जन्मास आली नसेल तर ती भीरुतेच्या पोटीं जन्मास आली आहे. हिंदु स्त्रियांच्या दुर्दैवाचीं रसभरीत वर्णनें करावयास मुस्लिम मासिकें कधींच चुकत नसतां हिंदु मासिकांनीं मात्र बंधुभावास जागून आपलें कर्तव्य करूं नये ही लज्जेची गोष्ट होय. हिंदु स्त्रियांच्या वेषभूषेवर व सौंदर्य-प्रसाधनांवर पानेंच्या पानें खर्चीं घालणाऱ्या संपादकांनीं पडद्याआड व बुरख्याआड दडलेल्या मुस्लिम रमणींच्या सौंदर्यास व नजाकतीस घोर अन्याय केला आहे. मुस्लिम प्रमदांचा पडदा हें राष्ट्राच्या सौंदर्यदृष्टीस व स्वातंत्र्यदृष्टीस लागलेलें ग्रहण होय. इस्लामी पुरुषसमाजास इतर समाजाच्या डोळ्यांतील कुसळें दिसत असलीं तरी स्वतःच्या डोळयांतील मुसळें मात्र दिसत नाहींत. तीं दाखविण्याचें पवित्र व मानवतामय कार्य स्त्रीजातीच्या उद्धाराचें कांकण घालणाऱ्या हिंदु मासिकांनीं जातिधर्मभेदाचे क्षुद्र विचार मनांत न आणतां धीटपणें केलें पाहिजे !

मुस्लिम स्त्रियांना हिंदु स्त्रियांप्रमाणेंच उदार शिक्षण व पूर्ण स्वातंत्र्य दिल्यास किंवा त्यांच्यासाठीं कोणी हिंमतबाज दयावंतानें तें मिळविल्यास केवढे चमत्कार होतील ह्याची आमच्या नेत्यांना खरोखरच कल्पना नाहीं. मुस्लिम समाजांतील आडदांडपणा, मुस्लिम समाजांतील धर्मवेडेपणा, मुस्लिम समाजांतील बुरसटलेली वृत्ति, मुस्लिम समाजांतील हेकड अराष्ट्रीयता ह्या साऱ्यांना फार मोठा पायबंद मुक्त झालेली मुस्लिम स्त्री आपोआपच घालील.

सायकलीवर बसणारी, टाइपरायटर हाताळणारी, चित्रभूमीवर चमकणारी, आपल्या साऱ्या देशबांधवांबरोबर दिलखुलास मिसळणारी मुसलमान स्त्री मुल्लामौलवींना, बुरसटलेल्या बांडगुळांना, प्रगतीच्या आड येणाऱ्या माथेफिरूंना केवढा तरी प्रहार करूं शकेल !

राजे अमानुल्ला यांनीं हा प्रयोग अफगाणिस्थानांत करून पाहिला व त्याची भारी किंमत त्यांना द्यावी लागली. अर्थात् फार वेगळ्या कारणासाठीं व परिस्थितीमुळें ! टर्की मात्र आज ह्या सुधारणेचीं गोड फळें प्रत्यक्ष चाखीत आहे.

~ ~ ~

परंतु सदरहू दोन्ही राष्ट्रें शंभर टक्के मुसलमानी राष्ट्रें होतीं आणि हा देश हें एक हिंदु राष्ट्र आहे आणि म्हणूनच ह्या देशांत **मुस्लिम स्त्रियांच्या उद्धाराचा प्रश्न फारच महत्त्वाचा आहे. स्वतंत्र व शिक्षित अशा मुसलमान स्त्रीचें हिंदूशीं जास्त संघटन व सहवास होईल, तर आज देशाला जाचक होऊन बसलेला व गांधींच्या आटोक्याबाहेर गेलेला हिंदु-मुस्लिम ऐक्याचा प्रश्न फार गोडीगुलाबीनें व सुलभतेनें सुटणार आहे.**

स्त्रिया जात्याच भावनामय, मायाळू व कोमल प्रकृतीच्या असतात. सहवासानें व शिक्षणानें त्यांचे आपल्या शेजाऱ्यांशीं जे मैत्रीचे दृढ संबंध उत्पन्न होतील, ते हिंदु-मुस्लिम ऐक्याला प्रसादचिन्हीभूत होत. **स्त्रियांच्या ठिकाणीं सहानुभूति हा गुण विशेष प्रमाणांत असल्यानें आपल्या हिंदु, बुद्ध आदि शेजाऱ्यांची संस्कृति, त्यांची बौद्धिक व ऐहिक संपदा, त्यांचा उदार स्वभाव, ह्या साऱ्यांचें गुणग्राहक आकलन त्यांना जसें होईल तसें तें कठोरवृत्ति, कलहप्रिय पुरुषांना कधींही होणें शक्य नाहीं !**

शिक्षणामुळें मुसलमान स्त्रियांची दृष्टि फार विशाल होईल, फांकेल व स्वातंत्र्य आणि संघटन ह्यांमुळें आपल्या शेजाऱ्यांच्या गुणदोषांचा प्रत्यक्ष पडताळा त्यांना घेतां येईल. **पूर्वग्रह व अज्ञान ह्यांमुळें बसणाऱ्या व बसलेल्या अढ्या अशा रीतीनें त्वरित सुटतील व हिंदु-मुस्लिम प्रेमभावाचा नवा गोफ गुंफण्यांत मुस्लिम स्त्री ही महत्त्वाचा व अपरिहार्य धागा होऊन बसेल !**

~ ~ ~

पुरातन, हट्टी, माथेफिरू व स्वार्थी वृत्तीच्या मुसलमान पुरुषांचा कदाचित् शिक्षित व स्वतंत्र मुस्लिम स्त्रीवर कोप ओढवेल, पण तो कोप केवळ नपुंसक

ठरेल. सामाजिक रूढींचीं बंधनें ताड्ताड् तोडणाऱ्या हिंदु विदुषींनीं बुरसलेल्या पुरुषवर्गाच्या रागाची जेवढी पर्वा केली, तेवढीच पर्वा मुस्लिम स्त्री आपल्या समाजांतील दुराराध्य दुराग्रह्यांची करील !

स्वतंत्र, शिक्षित व आपल्या नैसर्गिक शक्तींनीं युक्त असा मुस्लिम स्त्रीसमाज माथेफिरू व जुलमी पुरुषाच्या प्रकोपाचें पेकाट फार त्वरित मोडूं शकेल. मुस्लिम स्त्रीचा कोषमुक्त फुलपांखराप्रमाणें होणारा नवा अवतार हा मुस्लिम समाजांतील परागतिप्रियतेला, अज्ञानाला व माथेफिरूपणाला झालेला अर्धांगवायूच ठरेल.

मुसलमान समाजांतील उत्तमांगाची अशी कायापालट होऊन नव्या मार्गावर त्यांची पावलें पडतांच ऐक्याचा राष्ट्रीय प्रश्न धडाक्यानें सुटूं लागेल व स्वातंत्र्याचें निधान दिवसा–मासानीं जवळ येईल. कॉंग्रेस व गांधी ह्यांच्या अडाणी व प्रदीर्घ प्रयत्नांना जें असाध्य ठरलें तें फार सुलभतेनें शक्य होईल. स्वातंत्र्य व आधुनिक शिक्षण ह्यांची किल्ली मुसलमान स्त्रियांस लावतांच कित्येक कूट प्रश्नांचीं कवाडें धडाधड उघडूं लागतील !

अर्थात् हें महत्कार्य सुरुवातीला तरी आधींच असहाय असलेल्या मुस्लिम स्त्रीसमाजाला एकाकीपणें करतां येणार नाहीं.

मुसलमानी पुरुषवर्गांतील फारच थोड्या उदारहृदयांची त्यांना मदत होईल आणि म्हणून इतर समाजांतील पुरुष व स्त्रीवर्गाकडे आणि विशेषतः संपन्न व सुक्षिशित अशा हिंदूकडे त्यांचे डोळे आशेनें व अपेक्षेनें खिळून राहातील व ह्या त्यांच्या आशा नि अपेक्षा धडाडीनें पूर्ण करण्याची राष्ट्रीय जबाबदारी हिंदूवर राहील !

कारण कांहीं कोट दलित मुस्लिम स्त्रियांचा प्रश्न हा अस्पृश्यांच्या समस्येप्रमाणेंच एक गंभीर असा राष्ट्रीय महत्त्वाचा प्रश्न आहे हें हिंदूनीं ध्यानांत ठेवावें. ह्या प्रश्नाकडे संकुचित, जातीय व प्रतिगामी दृष्टीनें पाहाणें मानवतेस व पुरोगामित्वास डांबर फासण्यासारखें नीचपणाचें कर्म आहे. गांधी व कॉंग्रेस ह्यांनीं ह्या प्रश्नाकडे आपल्या अदूरदर्शी प्रतिगामित्वास

साजेल असें दुर्लक्ष केलें आहे. ह्या देशांतील धंदेवाईक पुरोगाम्यांची मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नाकडे वळण्याची छाती झालेली नाहीं. रूढीजर्जर इस्लामी पुरुष समाजाची अप्रत्यक्ष साथीदारी करून ह्या साऱ्या महाभागांनीं निरक्षरता, पारतंत्र्य, दारिद्र्य, छळणा व कायिक आणि मानासिक विद्रूपता ह्यांस चिथावणी दिली आहे. म्हणूनच तोंडानें समानतेच्या व स्वातंत्र्याच्या वारेमाप गप्पा मारणाऱ्या पण मनानें व्याधिग्रस्त व संकुचित असणाऱ्या भांडवली वृत्तीच्या हिंदूऐवजीं त्या थोर समाजांतलि निकोप, सुदृढ व शूर जनतेस साद घालणें अत्यंत अवश्य वाटतें.

पंजरग्रस्त मुस्लिम स्त्रीच्या हांकेला ' ओ ' देऊन जो जो कोणी हिंदु, मुसलमान, पारशी, खिस्ती वा बुद्ध धावेल तो राष्ट्राची फार मोठी सेवा करील. तो ह्या देशांतील एकसंधि ऐक्याचा एकेक दगड घालील, तो ह्या देशांत रुजलेल्या पारतंत्र्यवृक्षाच्या मुळावर एकेक घाव घालील !

~ ~ ~

खिलाफत चळवळीला आपलीच मानून हिंदूंनीं मनःपूर्वक सहाय्य केलें, त्याच दृष्टीनें दलित स्त्रियांच्या ह्या प्रश्नाकडे त्यानीं पाहावें. मुस्लिम घसटीची ( Muslim Contact ) चळवळ कॉंग्रेसनें सुरू केली, त्याच धर्तीची चळवळ ह्या देशांतील सुशिक्षित सहृदयांनीं पंकमग्न अबलांसाठीं करावी ! पडेल त्या खस्ता खाऊन, त्रास सोसून, त्याग करून, धैर्य दाखवून, धन वेंचून ह्या देशांतील साऱ्या शुभेच्छु हिंदूंनीं आणि मुसलमानांनीं, बुद्धांनीं आणि यहुद्यांनीं, खिस्त्यांनीं आणि पारशांनीं पतिताला हात देण्याचा, पीडिताला जवळ करण्याचा, अनाथाला अपंगण्याचा संकल्प सोडावा !

अस्पृश्यांचा प्रश्न हा जसा केवळ हिंदूंचाच प्रश्न नसून ह्या देशांतील साऱ्याच कनवाळू व्यक्तींचा प्रश्न आहे, तसाच मुस्लिम स्त्रियांचा प्रश्नही ह्या देशांतील साऱ्याच समाजांचा आहे. अर्थात् ह्या विषयांत हिंदूंची जबाबदारी विशेष आहे. कारण त्यांचें शिक्षण विशेष आहे, त्यांचें औदार्य विशेष आहे, त्यांचीं सांपत्तिक साधनें विशेष आहेत, त्यांची संख्या विशेष आहे व ह्या देशांत एकसंधि ऐक्य व निर्भेळ स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याची त्यांची इच्छाही विशेष आहे ! आणि म्हणूनच पडेल तो त्याग करण्याची तयारी ठेवून

खिलाफतीच्या वा मुस्लिम घसटीच्या ( Mass Contact ) प्रश्नाप्रमाणेंच हा प्रश्न त्वरित हाती घ्यावा व धसाला लावावा. कारण ऐक्याची किल्ली मुस्लिम स्त्रियांपाशीं आहे, असा माझा दृढ विश्वास आहे !

१३–५–३९

卐 卐 卐

# पिंजऱ्यांतील मैनांचा फडफडाट !

स्त्रीचें जीवन सुखमय किंवा दुःखमय करण्याचें सामर्थ्य विवाहांत आहे. ज्या धर्मांतील स्त्रियांना आपला पति निवडण्याचें व त्याला वरण्याचें स्वातंत्र्य आहे, त्यांना सुखी जीवनाची आशा करावयास पुष्कळ जागा असते. पण पडद्यांतच मरणारी मुसलमान स्त्री याही बाबतींत पूर्णपणें पराधीन आहे. कुठल्यातरी पुरुषाच्या जनानखान्यांत त्याची कायदेशीर चारांतील एखादी बायको म्हणून खितपण्याचेंच तिच्या नशिबीं असतें.

वास्तविक पाहातां सवतीबरोबर समाईक संसार करणें कोणत्याच स्त्रीला आवडणें शक्य नाहीं. तथापि कमीत कमी चार बायका करण्याची परवानगी मुसलमानी धर्मानेंच पुरुषांना देऊन ठेवली आहे. त्यामुळें आपल्या पतीच्या प्रेमाचा चौथा हिस्सा जरी आपणाला लाभला, तरी मुसलमान बाई स्वतःला भाग्यवान् मानते.

पण हें भाग्य तिच्या वाट्याला क्वचितच येतें. धर्मस्वरूप कायदा आणि पुरुषांची मधुकर प्रवृत्ति ह्यांमुळें पतीचें एक चतुर्थांश प्रेम कां होईना, तेंसुद्धा मुस्लीम मुलीच्या वाट्यास सहसा येत माहीं.

चार बायका करणें हा तर मुसलमान पुरुषाचा धर्मसिद्ध हक्कच झाला; पण ह्याखेरीज कित्येक बायका तो करतो, पळवतो आणि उपभोगतो !

कारण इतर समाजांत गुन्ह्याच्या सदरांत पडणाऱ्या ह्या क्रिया मुसलमान पुरुषाच्या सामाजिक इज्जतीला मुळींच धक्का लावत नाहींत. उलट असल्या प्रकारामुळें त्याची इज्जत वाढतेच !

परधर्मीयांच्या स्त्रिया फुसलावण्याला, पळवण्याला, वरण्याला, किंवा राख म्हणून ठेवायला मुसलमान समाज उत्तेजनच देतो.

~ ~ ~

ह्या साऱ्याचा परिणाम विवाहित मुस्लीम स्त्रियांवर व्हावयाचा तोच होतो. त्यांचें आयुष्य म्हणजे एक नर्क होऊन बसतो. लग्नाची स्त्री असूनही बटकीपेक्षां खडतर जीवन तिला व्यतीत करावें लागतें. आणि हा सारा मार तिला मुक्यानें सहन करावा लागतो. तिच्या दुःखाची दाद घेणारें पुरुषसत्ताक अशा मुस्लीम समाजांत कोणीही नसतें. कसल्याही चांडाळ पतीचा सहवास व छळ तिला मुकाट्यानें सहन तरी करावा लागतो, किंवा **जाफर हुसेनच्या** दुर्दैवी बायको-प्रमाणें जीव देऊन आपल्या भारभूत जीवनाचा अंत तरी करून घ्यावा लागतो !

कित्येक स्त्रियांचा गळा गुंतवण्याची धर्माज्ञा आणि स्त्रीविषयक मधुकरतेकडे, एवढेंच नव्हे, तर गुन्हेगारीकडेही कौतुकपूर्ण क्षमादृष्टीनें पाहाण्याची मुसलमान समाजाची प्रवृत्ति, ह्यामुळें मुसलमान स्त्री–समाजाच्या सुखाचें वाटोळें झालेलें आहे.

जाफर हुसेनसारख्या बलात्कारी पाप्याला कायद्याच्या कचाटींतून निसटतां येतें, एवढेंच नव्हे, तर एका संस्थानांत त्याचा सन्मानानें सत्कार करून त्याला नोकरीही देण्यांत येते आणि त्याची दुर्दैवी बायको मात्र दुःखानें व शरमेनें आपला जीव देऊन बसते ! ती आपल्या जीवानें निष्कारण आणि निरर्थक जाते, तिच्या दुःखांना औषध नसतें, तिच्या मृत्यूला मोल नसतें !

तिच्या कुटिल पतीला व कठोर समाजाला ती केवळ स्मृतिमात्र होऊन बसते ! प्रकाशाचा एकही किरण न दाखविणारी अनंत व अंधारी रात्र, हेंच खरोखर मुसलमान स्त्रीच्या आयुष्याचें स्वरूप आहे.

इतकें उपयुक्तताशून्य, ध्येयशून्य, स्वप्नशून्य व सुखशून्य जीवन कोणत्याही सजीव प्राण्याचें नसेल ! पुरुषाच्या लहरीनुसार फिरणाऱ्या भावनाशून्य व संवेदनाशून्य भावल्या हेंच मुस्लीम स्त्रीचें यथार्थ वर्णन आहे !

~ ~ ~

पण म्हणून मुसलमान मुलींना हा प्रकार आवडतो अशांतला मुळींच भाग नाहीं. दररोज नवी बाई पाहाणाऱ्या व म्हणून सामान्यतः किळसवाण्या रोगांची पावती आपल्या रंगेलपणादाखल अचूक घेणाऱ्या मानव प्राण्याच्या शेजारांत जखडबंद होणें, कोणत्या शुचिर्भूत मुलीला आवडेल ? स्त्रीविषयक संबंधांत अत्यंत ओंगळ अशा निसरगांठी नीतिमत्तेचा अवलंब करणें हा मुसलमान पुरुषांचा स्वभाव बनून राहिला आहे. स्त्रियांकडे पाहाण्याची त्यांची वृत्तीच अत्यंत बुभुक्षित व रानटी असते. तिला कोणत्याहि तऱ्हेची आध्यात्मिक व बौद्धिक बैठक नाहीं. तो स्त्रीकडे एका सदैव भडकत राहाणाऱ्या शारीरिक भुकेस बळी देण्याचा विषय म्हणून पाहात असतो. परिणामतः डागळलेल्या नीतिमत्तेच्या पुरुषसमाजांत मुसलमान स्त्रिया काळवंडून जातात. त्यांची पवित्र शरीरसंपदा मलिन होत. त्यांचीं मनें मरून जातात व पुरुषांच्या भयानक मगरमिठीची गुलामगिरी तखदिरांत आल्यामुळें अनिच्छेनें व अजाणतेपणें कां होईना, पण त्या सबंध राष्ट्राच्या मानसिक व शारीरिक ऱ्हासास कारणीभूत होतात. देशांत आध्यात्मवादी बैराग्यांचें व आधिभौतिकतावादी नवमतवादीचें पीक आलें असतांहि, मुस्लीम स्त्रियांची समस्या ही राष्ट्राच्या आध्यात्मिक, शारीरिक व बौद्धिक उन्नतीची समस्या आहे, हें त्यांच्या लक्षांत येऊं नये, हें मुक्या व दुःखी मुस्लीम गाईंचें दुर्दैव होय !

~ ~ ~

अज्ञान व गुलामी ह्यासारखा भयंकर शाप नाहीं. परंपरागत अज्ञानामुळें, अज्ञान व गुलामी ह्या नैसर्गिक अवस्था वाटण्याइतका मुस्लीम स्त्रीसमाज पडलेला आहे. पण तरीहि तुलनेनें स्वतःच्या दुःस्थितीची जाणीव कांहीं इस्लाम-कन्यकांना होते. इस्लामेतर स्त्रीसमाजाची स्थिति आदर्श नसली तरी आदर्शाची त्यांना कल्पना आहे. मुक्ततेच्या त्या मार्गावर आहेत, ही जाणीव मुसलमान मुलीला असते. हिंदु स्त्रियांचें स्वातंत्र्य त्यांना दिसतें, खिस्ती स्त्रियांचें विवाह-स्वातंत्र्य त्यांच्या डोळ्यांसमोर असतें, पारशी बायांचें बंधमुक्त वर्तन त्यांच्या नजरेसमोर असतें ! खिस्ती पुरुष दुसरी बायको करूंच शकत नाहीं, उलट एका बायकोशीं लग्न करण्यापूर्वी प्रियाराधनेच्या काळांत तरुणीला तो किती रिझवतो, किती आळवतो व वश करून घेतो !

विवाहप्रसंगीं घेतलेल्या फोटोंतसुद्धां पुरुष उभा राहून आपल्या बिबीला खालीं बसवतो आणि लग्नानंतर जोडीनें जाणाऱ्या स्त्रीपुरुषांत मूल पुरुष आपल्या खांद्यावर वाहातो !

हिंदु धर्मांत बहुपत्नीकत्व मान्य असलें तरी शिक्षणानें, संस्कृतीनें व स्वातंत्र्यानें हिंदु स्त्रीचें केवढें कोट कल्याण केलें आहे ! कायद्याची संमति असली तरी बहुपत्नीकत्व हिंदु समाजांत किती अपवादात्मक होऊन बसलें आहे ! विवाहाचे स्वातंत्र्य हिंदु स्त्रियांना किती वाढत्या प्रमाणांत मिळत आहे ! त्यांना शिक्षणाचा कसा लाभ होत आहे ! त्यांचा पुरुष समाज किती सीधा, सालस व सुसंस्कृत आहे.

किती प्रेमानें व किमानपक्ष माणुसकीनें भारतवर्षांतील मुसलमानेतर स्त्रियांना वागविण्यांत येतें ! मुसलमान समाजाखेरीज साऱ्या स्त्री–समाजांनीं गुलामीची बंधनें तोडली आहेत व सुखाचा आणि स्वातंत्र्याचा मार्ग त्यांनीं चोखाळला आहे. त्या निदान जाग्या झाल्या आहेत आणि सारे पाश तोडण्यासाठीं धडपडत आहेत !

~ ~ ~

बौद्धिक व ऐहिक उन्नति करून घेण्याचा एकमेव उपाय म्हणून जास्त उदार असणाऱ्या इस्लामेतर तरुणाशीं विवाह करण्याचा मार्ग पंजाबी इस्लामकन्यांनीं कांहीं वर्षांपूर्वी चोखळला होता. स्त्रियांच्या गुलामीशीं झगडण्याचा उत्तम मार्ग म्हणजे अशा गुलामी ज्या समाजांत नाहीं, त्या समाजांतील तरुणांशीं सहकार्य करणें हा होय, हें लक्षांत आल्यामुळें इसाई धर्माचा स्वीकार करून त्याच समाजांत विवाहबद्ध होण्याची एक प्रचंड लाट त्या काळांत पंजाबी मुस्लीम रमणींत उठून गेली. इसाई स्त्रियांचें स्वातंत्र्य, त्यांचे शिक्षण, इसाई पुरुषांकडून होणारे त्यांचें कोडकौतुक ह्या साऱ्याच गोष्टी त्यांना तुलनेनें अत्यंत आकर्षक वाटल्या व शक्य झाल्यास, सहकार्य मिळाल्यास व स्वातंत्र्य लाभल्यास कोणतीहि तरुण इस्लामकन्या जें करील, तें करावयांस पंजाबी ललनांनीं प्रारंभ केला. ह्या घटनेमुळें कित्येक मुसलमान मुलींस मुक्ति मिळाली व पंजाबी मुसलमान खवळून उठले ! अस्पृश्यांच्या

धर्मांतरामुळें ज्या तऱ्हेची जागृति हिंदु समाजांत झाली त्याच तऱ्हेची जागृति मुस्लीम मुलींच्या इसाई परिणयामुळें मुसलमान समाजांत झाली! मुसलमानी पुरुषांचीं मनें दुखावतील ह्या खुळ्या समजुतीनें अशा विवाहास कदाचित् अहिंसक पुढारी मोडता घालतील. परंतु मुस्लीम समाजाचें अंतिम हित व स्त्रियांचें सुखी जीवन विचारांत घेणारा कोणताहि मुसलमानांचा खरा हितचिंतक अशा विवाहास उत्तेजनच देईल. सर्वसामान्य स्वातंत्र्याचें व माणुसकीचें अमोलिक तत्त्व अबाधित राखण्यासाठीं मुसलमानांची नामर्जी हें कांहीं मोठेसें भारी मोल नाहीं! ह्या रामबाण उपायानें मुस्लीम मुलींचें वरसंशोधनाचें क्षितिज जास्त विस्तृत व आकर्षक होईल हें एक, इस्लामेतर समाजांत लग्न करणाऱ्या मुलींस अधिक स्वतंत्रता प्राप्त होईल हें दुसरें व ह्या जालिम उपायामुळें मुस्लीम पुरुष समाजास जास्त उदार बनावें लागेल आणि इस्लामच्या गौरवास योग्य असें वर्तन ते करूं लागतील हें तिसरें!

~ ~ ~

स्वातंत्र्याच्या, शिक्षणाच्या व प्रीतिविवाहाच्या ठिणग्या कुणीतरी मुस्लीम स्त्रीसमाजांत टाकण्याचाच उशीर आहे! हें परोपकारी व माणुसकीचें काम एकाद्या शूर दयावंतानें करतांच साऱ्याच प्रतिगामी व बुरसटलेल्या शक्ति धडाधड पेट घेतील! खुद्द **कायदे अझम जीनांच्या** सुपुत्रीनें ह्या विषयांत एक अत्यंत तेजस्वी व पुरोगामी उदाहरण निर्माण केलें आहे. स्वतः **कायदे अझमांनीं गुलबाई** ह्या पारशी युवतीशीं शादी केली असली तरी त्यांच्या पुत्रीनें तसलाच विवाह करावा ह्या गोष्टींस मुसलमान पुरुषांचा प्रचंड विरोध होता. ह्या विषयांत त्यांची वृत्ति फारच संकुचित व अंकगणिताच्या हजरतास शोभेल अशी आहे! संख्येच्या वेडानें ते पछाडलेले आहेत! स्वातंत्र्याची, शिक्षणाची वा दिव्य प्रीतीची त्यांना किंमत नाहीं! म्हातारी मेल्याचें त्यांना जितकें दुःख आहे, त्यापेक्षां जास्त भय काळ सोकावण्याचें आहे! खुल्या तुलनेनें प्रत्येक दृष्टीनें सरस असणाऱ्या इस्लामेतर समाजांत लग्न करण्याचा पायंडा जर का एकदां पडला, तर मुस्लीम ललनामंडळांतील सारा फुलोर मातबर परके समाज रिचवून टाकतील अशी हिशेबी पण वेडगळ व संकुचित धास्ती त्यांना भयग्रस्त करते! ह्या धास्तीपोटीं शिक्षण, स्वातंत्र्य, समता व प्रेमविवाह

ह्या उदात्त कल्पनांचें रसग्रहण करणें त्यांना अशक्य होतें व परक्या समाजांत विवाह करणाऱ्या मुलींची पारध करावयाचा ते चंग बांधतात! पण अचल सहकार्याचें आश्वासन मिळाल्यास **जीनांच्या** कन्येप्रमाणेंच स्वातंत्र्याभिमुख इस्लामकुमरी ह्या साऱ्या प्रतिगामी विरोधास तुच्छ मानील! कारण तिचा पवित्र धर्म तिला स्वातंत्र्य शिकवतो! **असफअलींना** जर हिंदु **गांगुलीशीं** विवाह करतां येतो, म्हातारा **रेझाअली** जर **कु. स्वामींशी** शादी लावूं शकतो, **रशीदला** जर इंदोरच्या **हंसेशीं** विवाहबद्ध होतां येतें व **वासंती भांडारकर** आणि **मालिनी पाणंदीकर** ह्या जर मुस्लीम तरुणांशीं विवाह-बद्ध होऊं शकतात, तर मुस्लीम तरुणींनींच संस्कृतिसंगमास हातभार कां लावूं नये व धर्माच्या तौलनिक अभ्यासास कां पारखें व्हावें? जें स्वातंत्र्य हिंदु तरुणींस आहे, ते स्वातंत्र्य मुस्लीम तरुणीस अत्यंत आवश्यक आहे ही गोष्ट इस्लामेतर तरुणांनीं ध्यानांत घेतली पाहिजे. लाल कपड्याचा फुलदार कुडता घातलेली व कानांत बाळ्यांचे घोस लोंबणारी अडाणी स्त्री म्हणजे मुसलमानीण ही सवंग कल्पना इस्लामेतरांनीं सोडून द्यावी. इस्लामच्या असूर्यपंश्या कन्या ह्या सुंदर आहेत, बुद्धिमान आहेत, स्वातंत्र्यप्रवण आहेत, योग्य सहकार्य व सहाय्य मिळाल्यास प्रेम देण्याची व प्रेम घेण्याची त्यांची इच्छा आहे, तयारी आहे, हें साऱ्यांनीं खूप ध्यानांत ठेवावें!

~ ~ ~

प्रेम! ओह्! प्रेम मुस्लीम स्त्रियांनाही पाहिजे आहे. प्रणयाची तहान मुसलमान स्त्रियांनाही लागली आहे. ह्या देशांतील मुसलमान स्त्रियांचा घसा तर प्रेमासाठीं सुकून गेला आहे! युगायुगांपासून सुकून गेला आहे!

त्याही अखेर हाडामासाच्या पुतळ्या आहेत! वसंतवायूच्या स्पर्शानें त्यांचेंही रक्त उसळ्या घेते. सुंदर, सभ्य व प्रेमळ सहचराच्या कल्पनेनें त्यांचेंही शरीर रोमांचित होतें! चांदण्यांतल्या स्वैर सहली त्यांनाही आवडतात. लज्जेनें त्यांचेही गाल रंगतात. अतृप्त अनुरागाच्या अपेक्षेनें त्यांचेंही हृदय धडधडतें! प्रेमाचे प्याले आपण पाजावेत आणि प्यावेत, प्रियकराच्या हातून प्यावेत असें त्यांनाही वाटतें. प्रेमाचे प्याले पाजावेत व धुंद होऊन पडावें असें

खरोखर कोणत्या स्त्रीला वाटणार नाहीं? इतकी अरसिक कोणती स्त्री आहे? इतकी अभागी कोणती स्त्री आहे?

~ ~ ~

पण हाय! पात्रांतून प्राशन करणाऱ्याची तृषा जाते, त्याच्या इच्छा तृप्त होतात, त्याचें सुख सांद्र होतें, पण पात्राला त्याचें काय? पात्राची तृषा जात नाहीं, पात्राच्या इच्छा तृप्त होत नाहींत! कारण पात्राच्या इच्छेचा किंवा सुखाचा कोणी विचारच करीत नाहीं, तृषा शांत करण्याचें एक साधन, एवढीच त्याची किंमत असते, ह्याच दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें जातें!

मुस्लीम स्त्रीची अवस्था अशा जड, दुर्दैवी व साधनमात्र समजल्या जाणाऱ्या पात्रासारखीच आहे. पुरुषाची पिपासा शांत करण्याचें कार्य तिला करावें लागतें पण तिची तृषा मात्र आजन्म शांत होत नाहीं!

पाणी पाजणाऱ्या पात्रांच्या तृषेचा कोणी जितका विचार करतो तितकाच विचार मुसलमान पुरुष आपल्या हक्काच्या स्त्रियांच्या प्रेमपिपासेचा करतो!

पण तरीही मुस्लीम स्त्रीची तहान जबर असते, जीव जाळणारी असते, आयुष्य शुष्क करणारी असते! आपण कुणाची लयला व्हावें, आपला कुणी मजनू असावा, असें तिला सारखें वाटतें, असा तिला आजन्म ध्यास लागतो!

आणि तो कां लागणार नाहीं? कांहीं झालें तरीं ती स्त्री असतें व स्त्रीला प्रेम शिकवावें लागत नाहीं! ज्याप्रमाणें सुगंधाचा वर्षाव करायला फुलाला शिकवावें लागत नाहीं आणि ज्याप्रमाणें गुलाब दिसतांच गायन करायला बुलबुलाला शिकवावें लागत नाहीं, त्याचप्रमाणें प्रेम स्त्रीला शिकवावें लागत नाहीं. अगदीं शुष्क दिसणाऱ्या स्त्रींत देखील प्रेमाचे झरे असतात!

होय, मुसलमान स्त्रीसुद्धा प्रेमाची प्यासी आहे! आपल्या सहारा वाळवंटा-सारख्या आयुष्याचें उद्यान व्हावें व त्यांत प्रेमाचा अमाप फुलोर यावा असें

तिला सुद्धा फार फार फार वाटतें! नूरजहान तिला माहीत असते, शिरीन तिला माहीत असते, लयला तिला माहीत असते. पाकधर्मीयांच्या चार कायदेशीर बायांपैकीं एक होऊन भागीदारींत नवऱ्यावर मालकी सांगावी व आपल्या वाट्यासाठीं सवतीशीं भांडत बसावें असें तिला वाटत नाहीं, मुळींच वाटत नाहीं! आपल्या बायकोला आणखी तीन पति असावेत ह्या गोष्टीची जशी पुरुषाला शिसारी येईल तशीच आपल्या पतीला अनेक बायका असाव्यात ह्या गोष्टीची कोणत्याही स्त्रीला येईल.

बर्नार्ड शॉ कांहींही म्हणो, पण मुस्लीम स्त्रीला बलिष्ठ बादशाहाची हजारावी बायको होणें आवडणार नाहीं! एखाद्या गरीब माणसाच्या प्रेमधनाची एकमात्र स्वामिनी होणें तिला फार आवडेल!

हें सर्व ती बोलून दाखवील! सार्वजनिक रीत्या ओरडून सांगेल! पण आज ती हतबल आहे, आपल्या दिलाचें दर्द सांगण्याइतकीसुद्धां ती स्वतंत्र नाहीं. वेदनेनें व्याकूळ झाली, तरी ती ओरडू शकत नाहीं. कारण तिला 'पडद्यांत' गुंडाळलेलें आहे. तिची हाक कुणाला ऐकू जाणें शक्य नाहीं! तिच्या तोंडांत अज्ञानाचे बोळे घातले आहेत. तिच्या पायांत परवशतेच्या बेड्या घातल्या आहेत. तिच्या दुःखाकडे दुर्लक्ष करणेंच मुसलमान पुरुषांच्या फायद्याचें आहे!

~ ~ ~

पण मनकवड्यांना तिचीं दुःखें सहज कळतील. हिंदु समाजांतील पुरुषांनीं तिचीं दुःखें जाणलीं पाहिजेत. खिस्ती समाजांतील पुरुषांनीं तिचीं दुःखें जाणलीं पाहिजेत व ह्या देशांतील साऱ्यांनीं तिचीं दुःखें जाणली पाहिजेत नि तिला सक्रिय सहानुभूति दाखविली पाहिजे! कारण मुस्लीम स्त्रियांच्या उद्धाराचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा असा राष्ट्रीय प्रश्न आहे. मुस्लीम स्त्रियांचा प्रश्न सुटल्यास हिंदुमुस्लीम ऐक्याचा प्रश्न फार सुलभ होणार आहे आणि म्हणून राष्ट्रीय वृत्तीच्या साऱ्या पुरुषांनीं मुस्लीम स्त्रियांचें प्रश्न सोडवावयास सहाय्य केलें पाहिजे. मुस्लीम मुलींचा विवाहविषयक प्रश्न हा एक अत्यंत दुस्तर असा कूट प्रश्न आहे. विवाह हा स्त्रीच्या आयुष्यांतील एक निर्णायक क्षण असतो. तो तिला सुखाच्या शिखरावर बसवतो किंवा दुःखाच्या दरींत लोटतो! मुस्लीम समाजाच्या

प्रस्तुत परिस्थितींत विवाह हा सामान्यतः स्त्रीला अत्यंत दारुण असें दुःखच देतो !

मुस्लीम ललनांची ही दुःखी किंकाळी देशांतील हिंदूंना ऐकूं जाणार नाहीं काय ? ते अनाथांला हात देणार नाहींत काय ? ते दीनांच्या उद्धारास धावणार नाहींत काय ? ज्या समृद्ध, संपन्न, हृदयसुंदर व दयाशील हिंदूंनीं खिलाफतीच्या थोर चळवळीस हातभार लावला, जे बंधुभावानें मोहरमच्या पवित्र तिवारांत शरीक झाले, ज्यांनीं मुसलमान पुरुषांचें राजकीय क्षेत्रांत अनेक तऱ्हांनीं कोडकौतुक पुरविलें, ते असहाय मुस्लीम युवतींची मात्र उपेक्षा करतील काय ? दया हें धर्माचें मूळ आहे. सहानुभूति, सहाय्य व सहवास हेंच सांस्कृतिक संवर्धनाचें, प्रेमाचें व ऐक्याचें बीज आहे. मुस्लीम रमणींच्या कूट प्रश्नास आतां ह्या देशांतील समाजानें हात घातलाच पाहिजे. गुलामगिरींत राहाणें हें जितकें पाप आहे, तितकेंच गुलामगिरींत राखणें हें पाप आहे ! मुस्लीम पुरुषसमाजाच्या आध्यात्मिक उन्नतीची चाड बाळगणाऱ्या साऱ्यांनीं त्यांना पापमुक्त करण्याचा चंग बांधला पाहिजे. ह्या समस्येकडे जातीय, संकुचित व धार्मिक दृष्टीनें पाहाणें हें दुष्ट, भेकड व पापी काम आहे. मानवतेच्या विशाल आसऱ्याची आज मुसलमान युवतीस आंस आहे. भूतदयेच्या नांवानें इकडे कोण लक्ष देईल काय ?

३–६–३९

卐 卐 卐

# जाफरहुसेन प्रकरणाचा निष्कर्ष !

(१) बुचम्मा ही चिनय्या मोची ह्याची चौदा वर्षें वयाची मुलगी होय. दरोगा दाऊद व इन्स्पेक्टर ऑफ स्कूल्स जाफर हुसेन ह्या दोघांनीं मिळून एके रात्रीं वर्धा येथें त्या मुलीवर एकूण तीन वेळा बलात्कार केला. तिला फसवून आणण्यांत आलें, तिला तलवारीनें भेडसावण्यांत आलें, तिचें तोंड दाबण्यांत आलें व तिच्या तोंडांत दारू ओतण्यांत आली.

(२) दाऊद हा पोलीस अधिकारी होता. तो जनतेचें रक्षण करणारा कायद्याचा प्रतिनिधि होता. खानसाहेब जाफर हुसेन हे एक शिक्षणखात्यांतले बडे अधिकारी होते. ह्या दोन मुसलमानांचें शिक्षण, त्यांचा दर्जा व

त्यांचा अधिकार ह्यांचा विचार केल्यावर त्यांनीं केलेल्या गुन्ह्याचें स्वरूप फारच भेसूर व अक्षम्य वाटतें.

( ३ ) केलेल्या गुन्ह्याबद्दल जाफर व दाऊदला न्यायालयानें शिक्षा दिली व त्यांच्या गुन्हेगारीवर अत्यंत कडक अशी टीका न्यायमूर्तींनीं केली.

( ४ ) न्यायमूर्तींनीं दिलेली तीन वर्षांची शिक्षा दयाळू होऊन गव्हर्नरनें एक वर्षांची केली.

( ५ ) परंतु एका वर्षाची शिक्षेची मुदत संपण्यापूर्वीच प्रांतिक सरकारनें अधिकच दयावंत होऊन जाफर हुसेनची मुक्तता केली. जाफरच्या क्षमेच्या अर्जावर 'दयेस अगदीं अपात्र' असे शेरे डी. सी. व डी. एस्. पी. ह्या अधिकाऱ्यांनीं मारले होते.

( ६ ) तरीही पंतप्रधान खरे व लॉ मेंबर शरीफ ह्यांनीं जाफरच्या माफी अर्जाची शिफारस केली व त्याची सुटका घडवून आणली. अत्यंत क्षुल्लक गुन्हे केलेल्या दोन हिंदु अपराध्यांना ( त्यांपैकीं एक तेरा वर्षांचा लहान मुलगा होता ) मात्र आवेदनानंतरही क्षमा मिळाली नाहीं.

( ७ ) लोकांचे विश्वस्त पंतप्रधान ह्या दृष्टीनें ह्या प्रकरणांत खऱ्यांचें उत्तरदायित्व फार मोठें होतें. अनाथ बुचम्माला अन्याय होऊं न देण्याची जबाबदारी लोकांचीं मतें मिळवून निवडून आलेले पुढारी ह्या दृष्टीनें त्यांच्यावर होती. पण दुर्दैवानें आपल्या कर्तव्यास ते चुकले, एवढेंच नव्हे—

( ८ ) तर एका भयंकर अपराधाला उत्तेजन देऊन त्यांनीं गुन्ह्यांत भागीदारी केली व समाजाचा अक्षम्य असा द्रोह केला.

( ९ ) जाफरची रदबदली करण्यापूर्वी कॉंग्रेसपक्षाचा सल्ला पंतप्रधानांनीं घेतल्याचें ऐकीवांत नाहीं. पंतप्रधानांची बलवत्तर इच्छा नसती तर ह्या गुन्हेगाराची शिफारस त्यांस बळानें करावयास लावील अशी कोणतीहि शक्ति अस्तित्वांत नव्हती.

( १० ) पंतप्रधानांच्या इच्छेविरुद्ध गव्हर्नरांनीं जाफरला दया करणें शक्य नव्हतें. कारण दयेचा अर्ज वैध मार्गानें व योग्य लोकांच्या शिफारसीनेंच काय तो गव्हर्नरपर्यंत पोहोचूं शकतो. पण खऱ्यांच्या इच्छेला न जुमानतां प्रांताधीपांनीं जाफरला क्षमा केली असती तर ही बाब राजीनाम्यांचा विषय

करण्याइतकी निःसंशय महत्त्वाची होती. कुमारिकांच्या शीलाच्या होळ्या पेटविल्या जात असतां गच्च डोळे मिटून घेण्यासाठीं खास कॉंग्रेस पुढाऱ्यांनीं अधिकार स्वीकारलेले नसावेत !

( ११ ) कॉंग्रेस राजवटीच्या महामंत्र्याचें त्या ओंगळ प्रकरणाबाबत घडलेलें वर्तन अत्यंत गर्ह्य, अत्यंत निंद्य व अत्यंत निषेधार्ह आहे.

( १२ ) त्यांना शक्य असल्यास पंतप्रधानांनीं व कॉंग्रेस धुरीणांनीं त्यांच्या राजवटींत व त्यांच्या शिफारसीनें घडलेल्या ह्या घोर अन्यायाचें समर्थन करून दाखवावें.

८-३-३८

卐 卐 卐

## पंतप्रधान खरे—

आज ज्या एका किळसवाण्या प्रकाराविषयीं आपणांस हें खुलें पत्र लिहिण्याचा प्रसंग आमच्यावर आला आहे, तसा तो आपल्या बाबतींत तरी येईल अशी आम्हांस कल्पना नव्हती. सकारण असो वा अकारण असो, पण थोडासा बाणा बाळगणारे, किंचित् जिवंतपणा असणारे, कण्यांत ( Backbone ) लवभर तरी ताठरपणा ठेवणारे म्हणून आपलें नांव आजवर सांगण्यांत येत असे. अर्थात् आपल्या शूरपणावर आमचा कधींच विश्वास नव्हता. अव्वल दर्जाचा पराक्रम आपल्या हातून कधींकाळीं होईल अशी अपेक्षा आम्हीं स्वप्नांतही केली नाहीं. तथापि आशा वेडी असते. आम्हांस वाटत होतें, खऱ्यांच्या हातून मोठासा पराक्रम घडला नाहीं तरी नीचपणाचें कुकर्म तरी त्यांच्या हातून होणार नाहीं. भेकड पापाच्या घाणेरड्या भागीदारीचें काळें तरी ते स्वतःच्या तोंडाला फासून घेणार नाहींत ! ते मुद्दाम कुणाला न्याय द्यायला गेले नाहींत तरी मुद्दाम कुणाला अन्याय करायला तरी जाणार नाहींत ! कारण कितीही नाहीं म्हटलें, व्यासपीठावरून कितीही नाकारलें तरी अखेर हाड हिंदूचें आहे, रक्त मराठ्याचें आहे !

पण आज मात्र आमची भ्रांती फिटली. आमच्या डोळ्यांवरचें पटल पडलें खऱ्यांनीं वेळोवेळीं व्यासपीठावरून गर्जून सांगितलेलें आहे, कीं आपण राव नाहीं किंवा खापर्डे नाहीं, आपण हिंदु नाहीं, किंवा मराठा नाहीं. आज आम्हांस कळलें

कीं, आपण राव नाहीं किंवा खापडें नाहीं, आपण हिंदु नाहीं किंवा मराठा नाहीं, एवढंच काय पण माणुसकीच्या गुणविशेषांवर अधिकार सांगतां येईल इतके आपण मनुष्यही नाहीं! छीः छीः! आपण एक अत्यंत निंद्य गुन्हा केलात पंतप्रधान! आपण एक अत्यंत अक्षम्य पातक केलंत डॉक्टरसाहेब! आपण एक अत्यंत हिडीस कुकर्म केलंत खरे महाशय! थोर अधिकारी वा सामान्य संभवित ह्या दोन्ही दृष्टींनीं आपलें वर्तन गर्ह्य झालें!

आज न्यायाच्या मस्तकांत फत्तर पडला! आज मानवतेचें तोंड काळें झालें! आज दया शरमून पळाली! आज आपण अगदीं उघड, अगदीं प्रत्यक्ष, अगदीं प्रयत्नपुरःसर जाफरहुसेनची मुक्तता केलीत. त्या चांडाळाला आपण मोकळा सोडलात. त्या पाप्याला आपण क्षमा दिलीत. आज आपण माणूस असून मुसलमानासारखे वागलांत! आज आपण मध्यप्रांताचा बंगाल केलात!

~ ~ ~

बोला, पंतप्रधान बोला! मध्यप्रदेशाच्या मंत्रीवरा, तोंड उघडा! तुम्हीं विश्वस्त असलेल्या जनतेच्या न्यायासनासमोर आज घोर अपराधी म्हणून उभे आहांत. जाफरहुसेन आणि दाऊद हें घोरकर्मे जितके अपराधी आहेत तितकेच आपण अपराधी आहांत, कारण आपण अत्याचाराला उत्तेजन दिलें आहे, (Abet) अपराधांत भागीदारी केली आहे, जाफरच्या मुक्ततेला सर्वस्वी तुम्हीं आणि तुम्हांस पूर्णपणें ग्रासून बसलेला शरीफ–तुमचा "लॉ मेंबर" कारणीभूत आहे.

शरीफ! "लॉ मेंबर" शरीफ! मुस्लीमलीगवाला शरीफ! रोमारोमांत मुसलमान असलेला आणि आपला धर्माभिमान गर्वानें जाहीर करणारा [नाकारणारा नव्हे!] शरीफ! आपली जहाल जातीयता पांढऱ्या टोपीखालीं दडवून तुम्हांस, तुमच्या राष्ट्रीयतेस व तुमच्या न्यायबुद्धीस भडाग्नि द्यावयास राष्ट्रीय सभेंत घुसलेला शरीफ! मेंढ्याचें कातडे पांघरून तुमचा फराळ करायला निघालेला शरीफ!

शरीफला आम्हीं काय बोल लावावा? शरीफला आम्हीं काय दोष लावावा? त्यानें जाफरच्या मुक्ततेचा प्रयत्न केला, त्यानें एक निरपराध हिंदु बाला सर्वस्वी नागवलेली बघितली, त्यानें जाफरच्या पापावर पांघरूण घातलें, तर

त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. कारण शरीफ प्रथम, नंतर व शेवटीं मुसलमान आहे. त्यानें तुमच्यासारखा, खरे, त्यानें तुमच्यासारखा, धर्म, वंश अथवा जात ह्यांचा कधींही इनकार केलेला नाहीं ! तो कॉंग्रेसचा श्रेष्ठ अधिकारी असला, कायदा आज त्याच्या हातांतलें बाहुलें बनला असला, तो तुमचा " लॉ मेंबर " असला, तरी ध्यानांत धरा कीं तो जन्माचा व वृत्तीचा मुसलमान आहे ! तुम्हां खुळ्यांची नजरबंदी करण्यासाठीं त्यानें खादीचा छद्मवेष परिधान केला असला तरी त्याचें मुस्लीम मन बदललेलें नाहीं. शेळीच्या दुग्धसिंचनानें त्याची जित्या रक्ताची चटक मारली गेलेली नाहीं ! आणि म्हणून त्यानें जाफरची कड घेतली, त्यानें जाफरला उचलून धरलें, त्यानें जाफरच्या मुक्ततेसाठीं आकाशपाताळ एक केलें, ह्याविषयीं आम्हांस आश्चर्य वाटत नाहीं.

पण आम्हांला आश्चर्य वाटतें तें तुम्हीं जाफरची बाजू घेतली ह्याचें ! आम्हांला नवल वाटतें तें तुम्हीं त्याची कड घेतली ह्याचें ! आम्हांला अचंबा वाटतो तो तुम्ही त्याच्या सुटकेसाठीं आकाश पाताळ एक केलेंत ह्याचें ! तुम्हीं शरीफशी सहमत झालांत, तुम्हीं त्याच्या डावाला बळी पडलांत, ह्याचें आम्हांस नवल वाटतें !

~ ~ ~

आपणांला माहीत आहे काय पंतप्रधान, कीं आपण दाखविलेली क्षमा ही आंधळी आहे, जातीय आहे, मुसलमानांशीं पक्षपाती आहे ?

दुलीपसिंग शीखाच्या तेरा वर्षांच्या अजाण पोराकडून बंदुकीशीं खेळ खेळत असतां एक जीव गेला, पण बरीच शिक्षा भोगल्यानंतर व त्याच्या व्याकूळ पित्यानें वारंवार प्रार्थना केल्यावरहि त्या मुलाला अद्याप क्षमा मिळूं शकली नाहीं ? पुष्कळच कमी प्रतीचा गुन्हा करणाऱ्या आबाजी देशपांड्याच्या अनेक विनवण्यानंतरहि क्षमादेवतेला पाझर फुटला नाहीं ?

पण व्यभिचारी व अत्याचारी जाफरची दुरवस्था पाहून मात्र क्षमादेवता द्रवून गेली व तिनें त्याची तांतडीनें सुटका केली आणि शिक्षित वयस्क जाफरचीच नव्हे, तर तसलाच गुन्हा करणाऱ्या एका मोटर क्लीनरची, रहीमबेगची देखील दया येऊन त्याला क्षमा केल्याखेरीज न्यायदेवतेला चैन पडेना !

सांगा पंतप्रधान! व्यभिचार, बलात्कार व नारीहरण ह्यांच्या तुलनेनें बनावट कागद व बंदुकीचा अपघातात्मक बार हे फारच भयंकर गुन्हे आहेत नव्हे ?

दुलीपसिंगाचें मूल किंवा आबाजी देशपांडे हे समाजाला अधिक भयावह आहेत नव्हे ? उमरभराच्या पापांत घोळलेल्या जाफर किंवा रहीमबेगचा सुटकेमुळें सुधारण्याचा ( Reform ) जितका संभव आहे, त्याच्या शतांशही दुलिपसिंगाच्या अजाण पोराचा नाहीं असाच आपला विश्वास असेल नव्हे ?

आणि तसें जर नसेल तर जी क्षमादेवी पातकी गुन्हेगारांना कुरवाळूं शकली, तिची माया एका कोवळ्या पोराच्या बाबतींत आणि एका वयस्क गृहस्थाच्या बाबतींत इतकी पातळ काय म्हणून झाली !

ते हिंदु होते म्हणून काय ?

व्यभिचारासारखा क्षम्य अपराध त्यांनीं केला नव्हता म्हणून काय ? बलात्कारासारखें क्षुल्लक पातक त्यांनीं केलें नव्हतें म्हणून काय ?

~ ~ ~

बोला मंत्रीवर, बोला ! आपण आपल्या वर्तनाचें कसें समर्थन करतां ? आपली तर्कपरंपरा काय आहे ? न्यायाच्या कोणत्या तत्त्वाला स्मरून आपण हें पातक बधितलें, संरक्षिलें व त्याची पाठ राखली ?

जाफरची क्षमेसाठी तरफदारी करण्यापूर्वी, त्याची साहेबबहादूर गव्हर्नरकडे दयेसाठीं शिफारस करण्यापूर्वी, आपण कॉंग्रेसपक्षाचें मत घेतलें होतेंत काय ? त्यांनीं ह्या प्रकाराला संमति दिली होती काय ?

तशी संमति कॉंग्रेसपक्षानें दिली नसेल तर प्रश्नच नाहीं, पण दिली असती तरी तिचें बंधन ह्या पापाचारांत तुमच्यावर राहिलें नसतें; स्वतःच्या अधिकारांत ती तुम्हांला निकालांत काढतां आली असती !

मग गव्हर्नरकडे तुम्ही जाफरची शिफारस कां केलीत ? कारण वैध मार्गानें नीच जाफरचें क्षमाआवेदन तुमच्यातर्फेंच गेलें, तुमच्या शिफारशीनेंच गेलें !

सांगा, बलात्काराची शिफारस आपण कां केलीत! व्यभिचारांना आपण कां उचलून धरलेंत? ह्या पापाच्या गटारांत आपण कां हात धुतलेत?

~ ~ ~

खरे महोदय, आपणांस माहीत असेलच, कीं जाफरचें क्षमाआवेदन वैध मार्गानें प्रवास करीत असतां, वरिष्ठ सरकारी गोऱ्या अधिकाऱ्यांनीं देखील ते क्षमेला अपात्र असल्याचें व असल्या दयेला आपला सर्वस्वी विरोध असल्याचें स्पष्टपणें नमूद केलें होतें!

आणि तरीहि आपण त्याला क्षमेची शिफारस दिलीत? आणि तरीहि आपण त्याला दयाविषय ठरवलेंत?

ह्या सुशिक्षित समंधानें एका निरपराध बालिकेच्या आयुष्याची होळी अगदीं थंड्या रक्तानें पेटवली, प्रांताचे मुख्य मंत्री ह्या न्यायानें त्या असहाय पोरीला आपण कांहीं देणें लागतां, हा विचारहि आपणांस शिवला नाहीं? तें शिफारस-पत्र खरडतांना ही कल्पनाहि आपणांस आली नाहीं, आपला हात किंचित्‌हि थरकला नाहीं? आपलें हृदय एकदांहि खटकलें नाहीं? जाफरहुसेन किंवा दाउदच्या निगरगट्टपणें आपण त्या कृष्णकर्मावर क्षमेचें शिक्कामोर्तब करून टाकलेंत?

~ ~ ~

"आब्बाजान, आपने जरूर कुछ किया होगा!" आपण जाणतां महाशय हें कोणाचें प्रशस्तिपत्र आहे, ही कोणाची शिफारस आहे?

कायद्याचे दूत जाफरचा झाडा घ्यावयास त्याच्याकडे जाऊन पोहोंचले, तेव्हां जाफरच्या सुशिक्षित सुपुत्रीने हें प्रशस्तिपत्र आपल्या महाभाग पित्याला दिलें हें आम्हांस निश्चितीपूर्वक ठाऊक आहे.

"कोहीबी महजबकी औरत अपनी बिघडीहुई इज्जतके बारेमें दुनियामें झूट नहीं बता सकती! आब्बाजान, आपने जरूर कुछ किया होगा!"

खरेमहाशय, प्रत्यक्ष पुत्रीकडून पित्याला मिळालेले हें शिफारस पत्र आहे!

सोबत आम्हीं बुचम्माची जबानी तिच्याच शब्दांत छापली आहे. टीका-निरपेक्ष, केवळ एवढीच जबानी कोणत्याहि कुटुंबांत वाचली गेली, तरी पंतप्रधान,

आपल्या दयेच्या स्वरूपाची जात त्यांना पटेल व तुम्हीं स्वतः केलेल्या महान् अपराधाचा त्यांना परिचय होईल. ते सारे तुमच्या नांवानें ओरडून उठतील, "दुबळा, वंचक, गुन्हेगार!"

~ ~ ~

बोला पंतप्रधान! बोला मंत्रीश्रेष्ठ! बोला डॉक्टरसाहेब! "गुन्हेगार गुन्हेगार" म्हणून चौफेर तुमच्यावर पिस्तुलासारखीं बोटें रोखलीं गेलीं तर तुम्हीं स्वतःचें कसें समर्थन कराल? तुम्हीं वंचित व क्रुद्ध जनतेला काय जाब द्याल? तुम्हीं कोणत्या तर्कशास्त्राचा आधार घ्याल? रडत बसलेल्या बुचम्माचें तुम्हीं कसें समाधान कराल? कडाकड बोटें मोडत बसलेल्या चिनय्याला एक पिता म्हणून तोंड दाखवतांना तुम्हांला कसली उजागरी राहील?

सांगा डॉक्टर खरे, बोला पंतप्रधान, सांगा मंत्रीमहाशय! शक्य असेल तर आपलें समर्थन करून दाखवा, आपली बाजू सांगून पाहा, आपल्या तर्कपरंपरेचा आम्हांसही परिचय होऊं द्या!

८-३-३८

卐 卐 卐

## तिलांजलि व प्रतिज्ञा

हिंदु व राष्ट्रीय ह्या नात्यानें माझी मला नव्यानें ओळख पटत आहे. स्वतःकडे व जगाकडे एका नव्या नजरेनें मी आतां बघूं शकतों. माझ्या दृष्टीवरील भ्रमपटल ह्या क्षणीं गळून पडल्यानें माझे वैरी कोण व कैवारी कोण, मित्र कोण व अमित्र कोण तें माझ्या नीट ध्यानांत आलें आहे. माझ्या असहाय्य अवस्थेला कोणकोणत्या व्यक्ति व प्रवृत्ति कारणीभूत झाल्या तें आतां माझ्या स्पष्टपणें ध्यानांत आलें.

मला दीन करून सोडणाऱ्या प्रवृत्तींना धिःकार असो! मला दुर्बल करणाऱ्या प्रवृत्तींना धिःकार असो! माझा तेजोभंग करणाऱ्या संस्थांना धिःकार असो! त्या सर्वांच्या नाशाचा आज मी संकल्प सोडतों. त्या सर्वांच्या नांवानें आतां मी तिलांजलि देतों!

हें पाहा माझ्या अंजलींत मी जल घेतलें. ह्या जलांत अत्याचारित अबलांचे अश्रु आहेत, ह्या जलांत हुतात्म्यांचें रक्त आहे, पीडितांच्या निश्वासांनीं हें जल अभिमंत्रित केलें आहे. बंगालच्या कुसुमला स्मरून, श्रद्धानंदांच्या हौतात्म्याला आठवून, विनाशाच्या दैवतांना आवाहन करून मी ही तिलांजलि सोडतों—

[ १ ] गांधीवादाचा नाश होवो; गांधीवादानें माझा घात केला.

[ २ ] गांधीग्रस्त संस्थांचा नाश होवो; त्यांनीं माझ्या देशाची दुर्दशा केली.

[ ३ ] राजकीय बुवाबाजीचा नाश होवो, सैतानी साधुत्वाचा नाश होवो, अराष्ट्रीय राष्ट्रीयत्वाचा नाश होवो, त्यांच्या नांवानें मी आज पाणी सोडतों.

[ ४ ] महाराष्ट्र व महाराष्ट्रधर्म ह्यांच्या वैऱ्यांचा निःपात होवो. त्यांच्या नांवानें मी तिलांजलि देतों.

[ ५ ] हिंदूंच्या दुष्मनांचें निर्मूलन होवोः त्यांच्या नांवानें मी पाणी सोडतों.

[ ६ ] प्रतिकार अक्षमतेचा नाश होवो, विसंघटनेचा नाश होवो, धर्मग्लानीचा नाश होवो. हिंदु समाजाला क्षीणत्व आणणाऱ्या सर्व दुर्गुणांचा नाश होवो. त्या सर्वांना मी तिलांज़लि देतों !

[ ७ ] परवशतेचा नाश होवो. तिच्या नांवानें मी पाणी सोडतों.

मी केवळ विध्वंसाचा दास नसून विधायकतेचाहि भक्त आहें. विनाशांतून विधायकतेचा जन्म होत असतो. शत्रूंच्या संहारांत मित्रांची सेवा असते. खांडववनाच्या दहनानंतरच नूतन नगरींचे जन्म शक्य होतात. माझे शत्रु मीं ओळखले व त्यांच्या नांवानें मीं तिलांजलि दिली. पापाच्या निर्मूलनांतूनच आतां पुण्याचा जन्म होईल. तिलांजलीच्या जलानें माझ्या प्रतिज्ञांचे वृक्ष पालवतील. माझा धर्म मला कळला आहे. माझ्या कर्तव्याची ओळख मला पटली आहे, म्हणून मी आज प्रतिज्ञा करतों, वेदांना साक्ष ठेवून मी प्रतिज्ञा करतों, हिमालयाला साक्ष ठेवून मी प्रतिज्ञा करतों, भागिरथीला साक्ष ठेवून मी प्रतिज्ञा करतों, चितोडच्या सतींना साक्ष ठेवून मी प्रतिज्ञा करतों, मातृभूमीच्या अतृप्त इच्छांना साक्ष ठेवून मी प्रतिज्ञा करतों, हिंदूंच्या रक्षणकर्त्या देवदेवतांना आवाहन करून मी प्रतिज्ञा घेतों —

[ १ ] हिंदुस्थान हा सर्वस्वीं हिंदूंचा देश आहे. हिंदुत्वाखेरीज राष्ट्रीयत्वाची दुसरी व्याख्या मी ओळखत नाहीं. शिवाजीमहाराजांच्या पवित्र चरणांना स्मरून मी अशी शपथ घेतों, कीं ह्याचें विस्मरण मला कदापि होणार नाहीं.

[ २ ] धर्म व संस्कृति ह्यांचें मोल देऊन मी कोणताहि संधि स्वीकारणार नाहीं. पुण्यश्लोक प्रतापचा आत्मयज्ञ आठवून मी अशी शपथ घेतों—

[ ३ ] मीं माझ्या मातृभूमीवर सदैव प्रेम केलें आहे व म्हणूनच मी सदैव स्वातंत्र्याची आस धरली आहे. स्वातंत्र्याखेरीज कधींहि माझें समाधान होणार नाहीं, कधींहि नाहीं !

[ ४ ] स्त्रियांचा मी सदैव आदर करीन. अबलांचें मी सदैव रक्षण करीन पतिव्रतांच्या पावित्र्यासाठीं मी माझे प्राणहि ओंवाळून टाकीन.

[ ५ ] हीन लोकेषणेसाठीं मी बहुसंख्यांक मार्गभ्रष्टांच्या सुरांत कालत्रयीं सूर मिळविणार नाहीं. सारें जग एकीकडे व मी एकीकडे, अशी स्थिति झाली तरी माझ्या तत्त्वांशीं व श्रद्धेशीं मी प्रतारणा करणार नाहीं.

[ ६ ] पराजय-प्रवणता, निराशावाद व संशयवाद, ह्यांच्या आहारीं मी कधींहि जाणार नाहीं. शुद्ध बुद्धीनें व कर्मफलांची अपेक्षा न करतां मी माझें कर्तव्य करीन. श्रीकृष्णाचा दिव्य संदेश मला निरंतर स्फूर्ति देईल.

[ ७ ] मरणाचें भय मी कधींहि बाळगणार नाहीं. मरण म्हणजे मृत्यु नव्हे ह्या सत्याची जाणीव मी सतत ठेवीन.

मला जे जे आदरणीय, जे जे पवित्र, जे जे वंद्य, त्या सर्वांस स्मरून मी ही प्रतिज्ञा घेत आहे. ज्या क्षणीं मी माझ्या व्रतापासून चलित होईन तो क्षण माझा अंतिम ठरो ! ज्या क्षणीं मी माझ्या प्रतिज्ञेचा भंग करीन तो माझ्या अक्षय्य दुर्गतीचा आरंभकाल ठरो ! त्या क्षणीं माझ्या अतृप्त पूर्वजांचे शाप माझ्या मस्तकीं पडोत-पायातळची धरित्री त्याक्षणीं माझा ग्रास करो !

२७-१२-३६

卐 卐 卐

## —नमन !

सरासरी आठ महिन्यापूर्वी वृत्तव्यवसायाच्या दगाबाज सागरावर आम्हीं 'आदेश' ची कागदी नौका लोटून दिली. हिंदुत्वनिष्ठ तत्त्वज्ञानाच्या प्रसाराची व पोलादी पक्षसंघटनेची हिंदु समाजाला आजच्याइतकी पूर्वी कधींहि आवश्यकता नसतां, ज्वलन्त हिंदुत्वनिष्ठेचें ब्रीद बाळगणारीं वृत्तपत्रें अवघ्या हिंदुस्थानांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतकींसुद्धां असूं नयेत ह्या प्रकारची आम्हांस राहून राहून खंत वाटे. समुद्रपार साम्राज्यांचें वैभव भोगणाऱ्या भाग्यवंतांनाही जेथें ह्या 'पांचव्या दौलती' शिवाय आपलीं भांडारें उणीं वाटावींत, तेथें राहात्या घराची उजाड लंका झाल्यामुळें नव्या वैभवाचे इमले उठवावयास सजलेल्या नशिबाच्या शिपायांस प्रचारतंत्राचें अमोघ अस्त्र उपेक्षणीय कां वाटावें ह्याचेंही आम्हांस नवल वाटे ! कागद व खिळे ह्यांची गांठ घालून देण्याइतका पैसा केवळ यदृच्छेनें ज्यांच्या पदरीं पडला आहे, अशा राजकीय बनियांनीं द्रव्यबळावर हिंदुसमाजाची लाज भर बाजारांत लिलावास काढावी, हा प्रकार आम्हांस असह्य वाटला व अशाच एका तिरमिरींत 'आदेश' चे ओझें आम्हीं आमच्या असमर्थ खांद्यावर घेतलें. ज्यांच्या प्रकाशांत आजवर आम्ही आमचा राजकीय मार्ग शोधला, ज्यांच्या स्फूर्तिदायक साहचर्यामुळें ह्या खडतर मार्गावरील दगडगोटे आम्हांस सदैव सुसह्य वाटले, ते आमचे मित्र व सहकारी आपण आरंभलेला डाव अर्ध्यावर टाकून आमच्यांतून उठून गेले आहेत. आम्हीं सभोंवार वळून पाहतों तेव्हां आम्हांस मोकाट जागा व रिकामीं खिंडारें दिसतात. त्या जागा व तीं खिंडारें कधींही भरून निघणें नाहीं. कै. वर्मा किंवा मावकर आम्हांस परत कधींही मिळणार नाहींत. त्यांस आम्ही कायमचे मुकलों ! पण नियतीला दया नाहीं, कालचक्राला खंड नाहीं व विसंघटित आणि निर्बल समाजास भविष्यकाल नाहीं !

काळीज मारून टाकणाऱ्या आपत्तींचा वर्षाव होत असतांही अविचलपणें नियत मार्ग तोडीत राहाणाऱ्या तत्त्वज्ञ धैर्याची उदाहरणें जर आमच्या डोळ्यांसमोर

---

* हा व यापुढील लेख नागपूर येथील "**आदेश**" साप्ताहिकांत प्रसिद्ध झाले आहेत.

नसती, तीन रुपये व अलोट निष्ठा ह्यांच्या भरपूर भांडवलावरही सिंहासनें गदगदां हालवून सोडील अशी शक्ति निर्माण करतां येते, हें जर आम्हांस माहीत नसतें तर मनाच्या क्लांत व विगलित अवस्थेंत चार पानी ' **आदेश** ' चा कागदी प्राण, रुप्याचें चिलखत ल्यालेल्या बलिष्ठांच्या दिशेनें भिरकावून देण्याचें धाष्टर्य आम्हांस स्वप्नांतही झालें नसतें.

~ ~ ~

गेल्या आठ महिन्यांत तीस प्रवास प्रस्तर ( Mile Stones ) मागें टाकल्यावर आज ' **आदेश** ' चा एकतिसावा अंक नव्या स्वरूपांत वाचकांस सादर करीत असतां आम्हांस जितका आनंद वाटत आहे, त्याहीपेक्षां जास्त आश्चर्य वाटत आहे. कारण निष्कांचनतेच्या आमच्या मूळ भांडवलांत अजूनही कोठें तूट आली नाहीं कीं आमच्या चिवट आशावादाची भरगच्च शीग अजूनही कोठें ढळली नाहीं. ज्या अर्थी एकही अपघात न होतां ' **आदेश** ' चा अंक दर सप्ताहास बिनचूक अवतार घेतो, त्या अर्थी आमच्या संपन्न गंगाजळीस द्रव्याच्या अनेक गुप्त सरस्वती येऊन मिळत असल्याच पाहिजेत असा सरळ सिद्धांत काढणारे आंकडेशास्त्री दुर्भिळ नाहींत. आपलीच जीभ खाऊन पोटाची भर करण्याचें शास्त्र ह्या चतुर व्यवहारज्ञांस आकलन होण्याजोगें नाहीं. देशभक्ति, समाजसेवा, राष्ट्रकार्य, स्वार्थत्याग, इत्यादि भाववाचक वस्तूंचें द्रव्यमापन केल्याविना त्यांच्या चिंतातुर बुद्धीस चैन पडत नाहीं. पुणें आणि सुपें प्रांताची जहागिर सुखनैव सांभाळत बसण्याऐवजीं दऱ्याखोऱ्यांतून वणवण-णाऱ्या शिवाजीच्या बिनहिशेबी धाडसाला ह्यांनीं मूर्खत्वाच्या पंगतीस अलगत बसविलें असतें. कांटेकोर व्यवहाराच्या सावध जाळ्यांत जें गवसत नाहीं, तें बेछूट मूर्खपणाच्या पायावर कित्येकदां लोटांगण घेतें हें विचित्र सत्य कांहीं केल्या त्यांस आकलन होत नाहीं आणि त्यांच्या मानसिक उन्नतीसाठीं प्रयास घेण्याचें आम्हांस कारणही दिसत नाहीं. आमच्या धनत्तरतेचा त्यांनीं हेवा केला, किंवा आमच्या गुपित कुणग्याचें व्याज आकरण्यांत त्यांच्या रात्री व्यतीत झाल्या तर त्यांत आम्हांस धन्यताच वाटेल !

' आदेश ' चे आजपर्यंतचे अनुभव अत्यंत निष्प्रेमतेचे आहेत असें म्हणणें कृतघ्नपणाचें होईल. व्यवहाराचें अफाट वाळवंट तुडवत असतांना

सहकार, सहानुभूति व सहाय्य ह्यांचे शीतल झरे आमच्या प्रवासमार्गांत आम्हांस आडवे आले नसते, तर आमचीं हाडें त्या मुलखंटास केंव्हाच अलंकारभूत झालीं असतीं !

~

'आदेश' चें अवतारकार्य अगदीं उघड आहे. आज 'आदेश' चा कायाकल्प होत असतां आमच्या ध्येयाचा आम्हीं पुनरुच्चार करीत आहोंत.

वृत्तसृष्टीच्या आघाडीवर हिंदूंच्या वतीनें झुंजण्यासाठीं 'आदेश' चा अवतार आहे. हिंदूंचें स्वातंत्र्य, हिंदूंच्या धर्माचें रक्षण व हिंदूंच्या संस्कृतीचें वर्धन हीं पणास लागलीं असतां साऱ्या जगाचा बळी गेला तरी त्याची आम्हांस दरकार वाटणार नाहीं. बुद्धीच्या व भावनेच्या निकषावर आमचा पक्ष व त्यास आधारभूत असलेलें तत्त्वज्ञान एकदां नीट पारखून घेतल्यावर "जर–तर" ची भाषा वापरण्याचें आम्हांस कारण दिसत नाहीं. निर्बुद्ध तडजोडीची आम्हांस आवश्यकता नाहीं. निष्क्रीय चिकित्सेपेक्षां क्रियाशील एकांतिकतेस आम्हीं अधिक वश आहोंत. धोरण नव्हे, तर ध्येय म्हणून अहिंसेस कवटाळणाऱ्या व राष्ट्रांतील युयुत्सु वृत्तीस मूळांतच गारद करणाऱ्या सत्पुरुषांचा आम्हांस कंटाळा आहे. भारतवर्षांतील अलोट जनता अन्नान्न दशेस आली असतां, चीनमधील पीडीत मंगोलांस धनधान्य पाठवणाऱ्या आंतरराष्ट्रीय मूर्खतेची आम्हांस किळस वाटते. "स्लाव संघटना" आणि 'पवित्र मर्यादां' च्या गोष्टी पाहातां पाहातां बोलूं लागणाऱ्या स्टॅलिनच्या फसव्या देशाकडे याचक वृत्तीनें सहाय्यासाठीं टक लावणाऱ्या आत्मघातकी आशावादाची आम्हांस हिचक येते. युरोपांतील हत्याकांडापेक्षां डाक्क्यांतील हत्याकांडानें आम्हीं जास्त विचलित होतों व कीव्हच्या बेचिराखीपेक्षां अहमदाबादच्या बेचिराखीविषयीं आम्हांस जास्त चिंता वाटते.

दूरस्थ भविष्यकालीं मनुष्यमात्राचें कल्याण व्हावें अशी आमचीही सात्त्विक इच्छा आहे आणि तें सुंदर स्वप्न प्रत्यक्षांत आणण्याच्या कार्यक्रमाचा विधायक भाग म्हणून रशियन अस्वलाविषयीं बेचैन होण्यापेक्षां हिंदु अरण्यांतील रक्तपिपासू श्वापदांना ताळ्यावर आणणें आम्हांस अधिक महत्त्वाचें व व्यवहार्य वाटतें. साऱ्या जगांतील अन्यायांची व विषमतेची झाडलोट करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे ज्यानें त्यानें आपल्या देशांतील जातीय,

विभाग
क्रमांक

संकुचित व देशद्रोही कंटकांना उचलून फेकणें हाच होय, असा आमचा दृढ-विश्वास आहे.

बहुसंख्यांकांचा अल्पसंख्याकांवर जुल्म व्हावा, असें अर्थातच आम्हांस वाटत नाहीं, पण अल्पसंख्याकांनीं बहुसंख्याकांवर कुरघोडी करावी, असेंही आम्हांस वाटत नाहीं. ह्या देशांतील कोटयवधि मुसलमान बंधूंस सीमापार करून त्यांस अरबी वाळवंटें वसविण्यास पाठवावें किंवा हिटलेरचे मार्ग अवलंबून त्यांचे 'ज्यू' करावेत, अशी दुष्ट कल्पना आमच्या मनांस सहसा शिवली नाहीं. एका माणसास एक मत असावें व ह्या देशांतील स्वतंत्र लोकराज्याच्या छत्राखालीं सर्व धर्मांच्या मानव प्राण्यांनीं आनंदानें नांदावें, अशीच आमचीही शुभ व सात्त्विक इच्छा आहे.

आणि ह्या इच्छेच्या पूर्तीसाठीं प्रयत्न करीत असतां आडव्या येणाऱ्या स्वकीय किंवा परकीय व्यक्तींशीं तडजोड करण्याचें आमच्या कदापि मनांत येणार नाहीं !

~ ~ ~

पालटलेल्या काळाचीं प्रसादचिन्हें आज आम्हांस स्पष्टपणें दिसत आहेत. हिंदुत्वनिष्ठेला 'जातीय' म्हणून हिणविण्याचे दिवस झपाट्यानें मागें पडत आहेत. लोकराज्याच्या व हिंदुत्वाच्या दुष्मनांशीं मुकाबला घेण्यास ठाकणारे युवक आज आमच्या नेत्रांस सुखवीत आहेत. आंधळ्या आंतरराष्ट्रीयतेच्या व दुबळ्या अहिंसेच्या प्रतिगामी शक्ति त्वरेनें लय पावत आहेत.

विरोधाच्या कज्जलराशींनीं दिशा भारावून गेल्या असतांही मूठभर निष्ठावन्त वीरांनीं जें स्फुलिंग आपल्या हृदयांत जतन करून ठेवलें होतें त्यानें आतां पेट घेतला आहे ! अपवित्र विरोधाचा स्वाहाकार करणारा वन्हि आतां चेतला आहे ! ध्येयाचा प्रकाशमान ध्रुवतारा नव्या हिंदूंचें मार्गदर्शन करीत आहे.

आणि म्हणूनच अगदीं बेशकपणें '**आदेश**'ची ही कागदी नाव आम्हीं दर्यावर ढकलली, ही वावडी आम्ही वाऱ्यावर झोंकली ! हरिततृणांनीं विनटलेले नवे प्रदेश आम्हांस गंवसतील, तारामंडळाचा आम्ही भेद घेऊं असा आम्हांस विश्वास असला, तरी खडकावर होणारा चुराडा व वाऱ्यावर

बसणारे गोते सहन करण्याइतकी त्रयस्थ तत्त्वज्ञताही आमच्या ठायीं भरपूर आहे !

१–११–४१

卐 卐 卐

# यज्ञांतील अखेरची आहुती !

श्री. मावकर आम्हांला सोडून गेले; ह्या भयंकर कल्पनेशीं तडजोड करावयास अजूनही आमचें मन तयार होत नाहीं. टिळकपुतळ्यापासून चिटणीस पुन्यापर्यंतचा सारा प्रांत आपल्या चेतनामय अस्तित्वानें दणाणून सोडणारी मावकरांची सुरूसारखी उंच, शामल मूर्ति अचानक आम्हांला कोठूनतरी सामोरी येईल, आमचे खांदे अवखळपणें गदगदा हालवीत व निर्मळ हास्याचे फवारे उडवून ह्या मूढ, व्यथामय, गुंगींतून आम्हांस जागृति आणील अशी आशा अजूनही आमच्या हृदयांत घर करून आहे.

मावकरांची हाक कुठून तरी ऐकूं येईल, मावकरांचें हास्य कुठूनतरी कानीं पडेल, दाट कुरळ्या केसांनीं आच्छादिलेलें त्यांचें उन्नत मस्तक कुठेंतरी आमच्या दृष्टीस पडेल, ह्या आशेवर अजूनही आमचा जीव टांगला आहे. मावकर वारले हें आम्हांला खरें वाटत नाहीं. मावकर आम्हांला सोडून गेले ह्यावर आमचा विश्वास बसत नाहीं. कुणाला एकटे मोकलावें, कुणाला सोडून जावें हा मावकरांचा स्वभाव नव्हता. ज्याला कोणी जवळ करणार नाहीं त्याला मावकरांनीं जवळ केलें. ज्याला कुणी आपंगिता नाहीं, त्याला मावकरांनीं आपंगिलें. मग आम्हांला एकटे सोडून, मग आमच्या हातावर हात मारून, मग आम्हांला एकलेपणाच्या खाईंत लोटून, मावकर कसे जातील !

घरच्या दौलतीचें दोन्ही मुठी भरून दान केल्यामुळें निष्पर्ण झालेल्या ह्या चारुदत्तानें ज्या अभिजात औदार्यापायीं बरबाद इस्टेटीवरील भृत्यवर्गालाही अंतराय देऊन तोडण्याचें नाकारलें, ती उदारता जिवाभावाच्या जिवलगांना कशी अंतराय देईल ?

मावकर सापडतील ! संत आणि सैनिक असलेल्या त्या हुद्दारांकडे मावकर सापडतील ! वीणाझंकारांनीं मुखरित झालेल्या वासुदेवराव फडणीसांच्या चंद्रमौळी निवासांत त्यांचें वास्तव्य असेल ! नागर सौजन्यानें ज्यांच्या संपत्तीला शोभा आली आहे, त्या तात्याराव काळीकरांच्या वाड्यांत कदाचित् त्यांची गांठ पडेल ! कवींच्या तरल कल्पनेला दिसणारी स्वार्थनिरपेक्ष मैत्री ज्यांनीं प्राकृत जनांच्या जड नेत्रांना दाखविली, त्या शंकरराव मल्लाण्यांच्या पुढ्यांत पाहा, आईच्या कुशींत निजलेल्या बाळाप्रमाणें मावकर तेथें विश्रांति घेत असतील ! रुक्ष व्यवहाराच्या दर्शनी दगडा गोट्याआड जेथून मित्रभावनेचें शीतल जीवन झिरपत आहे, त्या गोपाळराव चिटणीसांकडे चौकशी करा, तेथें मावकरांचा शोध लागेल ! भंडाऱ्याच्या त्या तीक्ष्णबुद्धि, उदार हृदय, हास्यमुख हजरनवीस वकीलाला विचारा, सौंसरच्या त्या निगर्वी, सव्यसाची काळीकडे पुसतपास करा, साहित्यांतच नव्हे, तर संसारांतही सहृदयता दाखविणाऱ्या त्या शंकरराव शास्त्रीकडे शोध घ्या, किंवा हिंदुसभेच्या कार्यालयांत जरा डोकावून पहा, कुठेंतरी मावकर तुम्हांला अवश्य गवसतील ! कारण मावकरांचा जीव जितका त्यांच्या कुडींत नव्हता तितका तो त्यांच्या कार्यांत व मित्रांत होता !

~ ~ ~

लोक सांगतात, मावकरांची कुडी नष्ट झाली ! वृत्तपत्रें म्हणतात, मावकरांचा देहपात झाला ! जनवार्ता म्हणते, आपल्या रक्ताचें कारंजें उडवून मावकरांनीं आपल्या लाडक्या स्वातंत्र्यवीराच्या स्वागतार्थ रुधिराचा सडा घातला ! दारूच्या बाणासारखें उडणारें मावकरांचें पेटतें आयुष्य रोषणाई करीत, अगदीं अखेरच्या टोंकापर्यंत जळून खाक झालें !

'सावधान' चा संपादक परलोकवासी झाला ! हिंदुसभेचा मोहोरा कामीं आला ! मांडलेला खेळ अर्धा टाकून एक पटाईत खेळाडू उठून गेला ! आज दारिद्र्य संपलें, विपत्तींचा शेवट झाला, साऱ्या संघर्षांची तड लागली व सावरकरांच्या चरणीं आपली सेवा ऋजू करून मावकर अनंतांत विलीन झाले !

मावकरांचा देहपात झाला ! मावकर अनंतांत विलीन झाले ! प्रत्यक्ष विषादाला हसवतील असे मावकर मेले ! प्रत्यक्ष निराशेला आशावाद

शिकवतील अशा मावकरांचा काल झाला! ज्या मावकरांच्या लवचिक देहाला क्षणाची उसंत नव्हती तो देह चिरशांतींत मग्न झाला!

मावकरांच्या अमोघ वाणीला आतां खंड पडला. हिंदुत्वाच्या प्रेमानें धडकणारें मावकरांचें हृदय आज गार पडलें. चौतीस वर्षें अव्याहत चालणारा आयुष्याचा होम आज समाप्त झाला. आपल्या तारुण्याचें व कर्तृत्वाचें पुरतें उमललेलें फूल हिंदुराष्ट्रपतींच्या चरणीं अर्पण करून आज मावकर धन्य झाले!

~ ~ ~

मावकरांची अवघी हयात हा खरोखरच एक अखंड यज्ञ होता, एक सजीव हौतात्म्य होतें! एकामागून एक स्वार्थ त्यांनीं बेदरकार धुंदीनें व बेछूट उन्मादानें होमून टाकले. प्रिय पत्नीचा मृत्यु त्यांनीं अश्रुशून्य नेत्रांनीं पाहिला. लाडक्या अर्भकाचें निधन त्यांनीं त्याच विरागी स्थितप्रज्ञतेनें सहन केलें. लक्ष्मीच्या पुळपुट्या पावलांचे चंचल चाळे त्यांना कधींही विचलित करूं शकले नाहींत. भरल्या घरांची लंका झाली तरी त्यांच्या मुखावरील नामोहरम करणारें हास्य तसेंच तळपत राहिलें! आणे पैसाठीं घासाघीस करत बसणारा हिशेबीपणा त्यांना माहीत नव्हता. सारी जिंदगी पणास लावून बसलेल्या मावकरांना तो व्यवहार मानवण्यासारखा नव्हता. देहाची सुवर्णतुला करण्याऐवजीं देहाची राख करावयास ते बद्धपरिकर झाले होते!

मावकरांचा सारा स्वभाव बादशाही होता. त्यांनीं चार आठ आण्याच्या वर्गण्या देऊन वर्तमानपत्रांत आलेलें नांव न्याहाळलें नाहीं, त्यांनीं सारी जिंदगी आणि जिनगानी एका कार्यावरून ओवाळून फेकली! चार महिने सहन केलेल्या बंदिवासावर तुष्ट होऊन त्यांनीं उरलेली उमर सुखानें गुदरली नाहीं तर बंदिवासांत ज्यांचा वाराही लागणार नाहीं अशा यातना व कष्ट त्यांनीं आजन्म सहन केले! त्यांनीं मैत्री केली ती बादशाहीपणें केली व त्यांनीं शत्रुत्व केलें तेंही ताठर ऐटीनें केलें, बलवत्तर शत्रूंशीं केलें व अत्यंत दुस्तर परिस्थितींत केलें!

सैन्य किंवा संपत्ति ह्यांपैकीं कांहींच जवळ नसता ह्या शूर शिलेदारानें एका धनत्तर कांग्रेसश्रेष्ठींशीं निकराची लढाई घेतली व ती जिंकून दाखविली! साऱ्या तीन रुपयांच्या भांडवलावर त्यांनीं "सावधान" सारखें

स्फोटक पत्र काढलें व एखाद्या पिशाचाप्रमाणें सैराट धावणाऱ्या गांधीवादाच्या समंधाला त्यांनीं ह्या प्रांतांत गाडून टाकलें. आपलें इमान एकदां हिंदुसभेला वाहिल्यावर त्यांची मति कधींही चळली नाहीं. ते हिंदुसभेचे एकनिष्ठ शिपाई म्हणून जगले व हिंदुसभेचे एकनिष्ठ शिपाई म्हणूनच मेले !

~ ~ ~

नाहीं ! मावकर मेले, ह्या कल्पनेशीं तडजोड करावयास आमचें मन अजूनही तयार होत नाहीं ! आमचे डोळे आम्हांस फसवीत आहेत ! आमचे कान आमच्याशीं प्रतारणा करीत आहेत ! आसमंतात् विखुरलेला सारा वस्तुजात मावकराशीं संलग्नतेनें निगडित झाला आहे आणि त्याची ग्वाही आमच्यातर्फे पडत आहे ! मावकरांचे शब्द अजूनही आमच्या कानांत घुमत आहेत ! मावकरांची मूर्ति अजूनही आमच्या नेत्रांत डोलत आहे ! त्यांच्या स्नेहमय स्पर्शानें आमच्या अंगावर आलेले रोमांच अजूनही तसेच रेंगाळत आहेत !

मावकरांनीं दोस्तान्यांत कधींही दगलबाजी केली नाहीं ! मित्रभावानें पुढें झालेल्या हाताचा कृतघ्न चावा त्यांनीं कधींही काढला नाहीं ! त्यांच्या रक्तांतच वैर नव्हतें, दीर्घद्वेष तर नव्हताच नव्हता ! पडलेल्या शत्रूवरही त्यांनीं दया केली असती, दुष्मनाच्या तोंडांतही त्यांनीं पाणी घातलें असतें, दावेदाराच्या दुःखानेंही ते रडले असते ! त्यांनीं वैर केलें तें तात्त्विक वैर केलें, वैयक्तिक वैर केले नाहीं. त्यांची जिव्हा तिक्त होती पण त्यांच्या हृदयांत अमृताचे कुंभ ओसंडून राहिले होते. दुसऱ्याच्या दुःखानें रडावें व दुसऱ्याच्या आनंदानें हसावें असा त्यांच्या अव्याज हृदयाचा धर्म होता. कीडामुंगीलासुद्धा त्यांनीं हेतुपुरस्सर दुखवलें नसतें. मग जित्या माणसांना पीडा देण्याचा विचार त्यांच्या मनांत कसा येईल ?

ह्या दुष्ट जगांत, ह्या व्यवहारी जगांत, ह्या फसव्या जगांत, एखाद्या क्रीडाप्रिय बालकाच्या विश्वस्तपणें ते वावरत होते. ह्या हिशेबी दुनियेंत ते एक बिनहिशेबी होते. ह्या कुटिल दुनियेंत ते एक भोळ्या भाबड्या अंतःकरणाचे होते.

~ ~ ~

म्हणून म्हणतों, आमच्यावर दया करा व ते दुष्ट शब्द आम्हांला वारंवार ऐकवूं नका! आमची अशी क्रूर चेष्टा करूं नका!

मावकरांचें अवसान झालें नाहीं! मावकरांचा देहपात झाला नाहीं! मावकर आम्हांला सोडून गेले नाहींत! मावकरांच्या हृदयांतील निष्ठेची ज्वाला भडकून उठली व तिनें हजारों हृदयें प्रदीप्त केलीं! ती ज्वाला तशीच तेवत राहील. जोपर्यंत तमिस्त्र आहे, जोंपर्यंत अंधकार आहे, तोंपर्यंत अंगार जळत राहील, तोंपर्यंत मावकर जगत राहतील.

१९-४-४२

卐 卐 卐

## रक्त आणि अश्रु!

आज मावकरांचा अंत झाल्यावर त्यांच्यासारख्या जातिवंत स्वभावाचा एखादातरी माणूस मला दिसेल म्हणून मी सभोंवार दृष्टि फिरवितों, तेव्हां माझें हृदय हबकून जातें. कित्येक माणसें व कित्येक नांवें माझ्या मनः-चक्षूपुढून सरकतात, पण त्यांत मावकरांची सर करील असा कोणीच दिसत नाहीं. आजही या नगरांत शूर पुरुष आहेत, स्वार्थत्यागी पुरुष आहेत, "पत्रकर्ते राव" आहेत, पण त्यांत मावकर नाहींत! कुरळ्या केसांचा, तरवारीच्या पात्यासारख्या लवचिक व उंच देहाचा आणि सांवळ्या वर्णाचा हा तरुण माणूस म्हणजे एक अजब रसायन होतें. नागपुरी तरुणांना एक विशिष्ट असा लोभस स्वभाव आहे आणि त्या स्वभावाचे सारे उत्कृष्ट विशेष मावकरांत एकत्रित झाले होते. कडुजहर विरोधाचे, उपरोधाचे आणि परीक्षेचें दिवस संपून गेल्यावर "सावधान"च्या अखेरच्या ऐन उत्कर्षाच्या दिवसांत मावकरांवर प्रसिद्धीचे झोतच्या झोत तळपूं लागले व त्यांच्या विषयीं सर्व महाराष्ट्रभर एक विलक्षण कुतुहल निर्माण झालें. गांधीवादाचा काळा फत्तर एकामागून एक सुरुंग लावून उडवून देणारा हा संपादक चांगला बुज्रुक, चष्म्यांतून तिरपा पाहाणारा, मोजून मापून बोलणारा, असा एकादा शिष्ट असेल, अशी कां कोण जाणे कित्येकांची कल्पना होती.

पण मावकर तसे नव्हते. मावकर तसे असते तर त्यांना जें साधलें तें त्यांना साधलें नसतें. व्यवहारी दूरदर्शीपणा जिथें तोंडाला कुलूप घालील तिथें मावकर शब्दांची लवंगी लड पेटवून साऱ्यांची एकच दाणादाण करीत. ज्याच्या जवळ फटकायलाही इतर लोक घाबरतील, त्याच्या कुशींत बिनधोक बोटें टोचून ते उलट त्यालाच हैराण करीत; एवढेंच नव्हे तर कित्येकदां त्याच्याही प्रेमाचा आणि कौतुकाचा विषय होत! मावकरांचें हृदय अत्यंत शाबूत होतें. त्यांची निष्ठा अत्यंत कडवी होती. हास्याच्या व अवखळपणाच्या आवर्तनांत मग्न असणाऱ्या ह्या माणसाच्या स्वभावांत तत्त्वज्ञ व विरागी धैर्याचा असा एक भाग होता, कीं ज्यावर टक्कर खाऊन कोणत्याही शक्तीनें व संकटानें चूर व्हावें. अलेक्झॅण्डर, नेपोलियन, शिवाजी, कालिदास वगैरे विभूतींच्या पंक्तीस मावकरांस मरणोत्तर बसविण्याचा प्रयत्न मी केला, तर ते पुनर्जन्म व जोडा घेऊन निश्चित् माझ्या दाराशीं उभे राहातील! अनेक सामान्य पण दुर्मिळ गुणांचें त्यांच्या ठिकाणीं अत्यंत असामान्य असें मिश्रण झालें होतें. मावकर डोळे फिरविणाऱ्या उंचीपर्यंत प्रसंगीं लीलेनें चढून जात, पण एका विशिष्ट मानरेषेखालीं ते पडूं मात्र शकत नसत. ते अत्यंत तिक्त वाणीचे होते, पण कठोर करणी करतांना त्यांचे हात बेकाम होत. ते एखाद्याला शारीरिक ताडन करूं शकत, पण डूक धरून सडकीं कारस्थानें शिजविणें त्यांच्या स्वभावांत नव्हतें. त्यांचा जन्म झगडण्यांत गेला असला तरी अत्यंत व्यापक असें सौहार्द व अत्यंत जातिवंत असा जिव्हाळा हेच त्यांचे जन्मगुण होते. प्रत्यक्ष गांधींचीही केविलवाणी अवस्था त्यांना बघवली नसती. एखाद्या अगतिक मुसलमानावरही त्यांनीं दया दाखविली असती. सहानुभूति आणि सत्प्रवृत्ति त्यांनीं पुस्तकांतून पाठ केली नव्हती, ती त्यांच्या रक्तांतच होती! सर्वांच्या पाठीवर आपण थापा माराव्यात, सर्वांनीं मिळून खूप हसावे, संकटांची थट्टा करून आपण संकटांनाच हास्यास्पद करावें, आयुष्य हें आनंदाचें आणि प्रेमाचें अखंड चक्र असावें, हीच त्यांची वृत्ति होती. कालच आपण ज्याच्याशी कडकडून भांडण केलें, त्याच्याकडे पाहून आज हसल्याशिवाय त्यांना अगदीं राहावत नसे. मुलाविरुद्ध युद्ध पुकारलें असतां स्वयंपाकघरांत जाऊन त्याच मुलाच्या आईपाशीं खाऊसाठीं मावकरांनीं हट्ट धरल्याचें आणि तिनें तो अत्यंत वात्सल्यानें पुरविल्याचें एक उदाहरण मला ठाऊक आहे. म्हणूनच मी म्हणतों, कीं अत्यंत मोहक गुणांची आणि नीचतेचा संपर्कही नसलेल्या अत्यंत आकर्षक दोषांची वीण पडून

मावकरांचा स्वभाव बनला होता. त्यांच्या दोषांतही जिवंत रंगांची इतकी लयूलूट होती, कीं त्यांच्या गुणांइतकाच त्यांच्या दोषांवरही माणूस लुब्ध व्हावा!

कुणाला वाटे, मावकर हें पुरुषाच्या वाढलेल्या देहांत वावरणारे एक पोर आहे. " He is an overgrown child " ! कुणाला वाटे, **पी. जी. वुडहाऊसच्या** पुस्तकांतून सजीव झालेला मावकर हा एक उमदा खेळाडू पठा आहे! कुणाला वाटे, मावकर हा एक शूर, करारी, सैनिक आहे! ह्या साऱ्याच गोष्टी आपआपल्या परीनें खऱ्या आहेत. मावकरांची बालसुलभ सरलता माणसाला काबीज करीत असे. त्यांच्या सहवासांत आलेला माणूस सामान्यतः त्यांच्यावर प्रेम करूं लागे. ज्यांच्याविषयीं आदर वाटावा, ज्यांच्याविषयीं धास्ती वाटावी, ज्यांच्या प्रखर तेजानें माणसाला अंधेरी यावी, असे थोर महाभाग आजही माझ्या पाहण्यांत आहेत; पण ज्यांच्याविषयीं हटकून लोभ वाटावा असा आपल्याच पातळीवरील सवंगडी सांपडणें मात्र फार दुरापास्त दिसतें!

व्यवहारी जगाची सामान्य कोष्टकें खोटीं पाडणें हेंच मावकरांचें ब्रीद होतें. हिशेबांत त्यांची फारशी गति नव्हती. कामसूपणें " ए. जी. " च्या ऑफिसांत व्यवस्थित लेजरें ठेवणें व फुल्या मारणें हें काम त्यांना जमलें नसतें. पण ते हिशेबी व व्यवहारी राहिले असते, तर मग ते मावकरही नसते व कट्टर हिंदुसभाईतही नसते! कारण त्रैराशिकाच्या हिशेबानें हिंदुसभाईती ही तेव्हां अत्यंत तोट्याची बाब होती. तर्काचें, त्यागाचें व तत्त्वनिष्ठेचें राजकरण मावकरांनीं तागडीत घातलें असतें, तर त्यांचा तेव्हांच गांधीजन झाला असता. तीन रुपये गांठी मारून मग त्यांनीं " **सावधान** " काढला नसता, किंवा गांधीवादाच्या धोंगावणाऱ्या प्रवाहाविरूद्ध हात मारण्याचें त्यांना धाडस झालें नसतें!

~ ~ ~

तो काळच हिंदुत्वाला गंडांतरासारखा होता. आपली सारी संपत्ति, संघटना व सूडबुद्धि एकत्र करून हिंदुत्वनिष्ठांचें " शिरकाण " करण्याच्या गोष्टी गांधीजन तेव्हां बोलत असत. हिंदुत्वनिष्ठांवर नशाबाज गुंड घालावेत, त्यांच्या सभा मोडून काढाव्यात, त्यांना उभें राहावयास तसूभर जागाही राहूं नये म्हणून

ह्या प्रांतांतील गांधीजनांचे तेव्हां भगीरथ प्रयत्न चालले होते. नागपुरांतील स्वभावतःच वादळी असणाऱ्या सभांचें स्वरूप त्या काळीं कमालीचें रौद्र झालें होतें. सारे मुंगळे गुळाला जाऊन डकले होते, आणि चालत्या घोड्यावरील गामाशा उडून गेल्या होत्या! फक्त मूठभर निष्ठावंत तरुणांचा एक गट मात्र दांतनिकसीस येऊन प्राणांतिक लढत देत होता. त्या तरुणांच्या समरचातुरीचें कौतुक केल्याविना मोरोपंत अभ्यंकरांनाही राहावत नव्हतें व असले विनावेतन जीव होडीस लावणारे शूर शिलेदार पदरीं असणाऱ्या सेनापतीचा त्यांस निस्संशय हेवा वाटत होता. घड्याळाचे कांटे उलटे फिरविण्याचा व विरोधाची भरती पिऊन टाकण्याचा ह्या वेड्या पीरांचा अट्टाहास होता. संख्येच्या थंडगार गणितापेक्षां वेग, गति, गर्जना व प्रहाराच्या शास्त्राशीं परिचित असलेल्या तरुणांची ह्या गटांत गर्दी होती. बाहेर तुफान वादळ गर्जत असलें तरी हे तिळभरही हलत नव्हते व बाहेर कडाक्याची थंडी पडली असली तरी ह्यांचा उत्साह गारठत नव्हता! त्यांना सारी उष्णता व चेतना परस्परांपासून व एकाच श्रद्धेपासून मिळत होती. हिशेबी शाहाण्यापेक्षां स्वप्नाळू वेडगळांची ह्या गटांत जास्त चहा होती. हिंदुत्वनिष्ठ भ्रातृसंघांत मत्सर विसरतां येतो, परस्पर-स्पर्धा गाडून टाकतां येते, सहकाऱ्याचा उत्कर्ष आनंदाचे कढ आणूं शकतो, ध्येयावर प्रेम करणारीं माणसें स्वतःवर प्रेम करीत नाहींत, सामान्य माणसांची हर्षामर्षांची वजनेमापें त्यांच्या विषयांत खोटीं ठरतात, घड्याळाचे कांटे मागें सरकवितां येतात इत्यादि सिद्धांतांचे प्रत्यक्ष प्रयोग ह्यां गटांत चालले होते. ह्या गटांतील वातावरण इतकें वेगळें होते व वर्तनाचें सामान्य मान इतकें भिन्न होतें, कीं तेथें सम्मीलित होतांच कद्रू माणसाला कर्णाचें औदार्य प्राप्त होई व भीरू माणूस शौर्याच्या किमान मर्यादेखालीं घसरणें अत्यंत नामोष्कीचें समजूं लागे. ती दुनियाच वेगळी होती! तेथील मूल्येंही वेगळीं होतीं. त्या दुनियेंत जगूं चाहाणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मनाचें यंत्र आपोआपच वेगळ्या व लोक-विलक्षण दिशेनें फिरूं लागे. जपून पाऊल टाकण्याविषयीं ज्याची बाहेर वाहवा आहे, तो माणूस येथें येतांच खड्ड्यांत उडी मारण्याविषयीं विलक्षण उत्सुकता दर्शवी! कुणीतरी एक दिवस अचानक उठे आणि उकळत्या पाण्याप्रमाणें सळसळणाऱ्या हजारांच्या जमावांत घुसून डॉ. **मुंजांच्या** "गेंडा" विडंबन चित्रावर चाकूचे बेजा प्रहार करून तें चित्रच पळवून आणी व त्या सहस्रावधी बाप्यांना केवळ हास्यास्पद करून सोडी! दुसरा एखादा उठे आणि हिंस्र

विरोधकांच्या सभेंत एकाकी उभा ठाकून आंगभर मार खाऊन आणि जमेल तितका देऊन परत येई! त्यां माणसाच्या वडील धाऱ्यांना ह्या आंधळ्या धाडसाचें कौतुक वाटत नसलें तरी त्याचें सहकारी त्याच्या पाठीवर थाप देत, सगळयांची हिंमत वाढे आणि हें परितोषक त्या वीराला अगदीं पुरेंसें वाटे!

दुनियेत पैशाच्या मोहावर ज्यांनीं मात केली आहे, ते निदान कीर्तीच्या लोभाला तरी हटकून बळी जातात. पण ह्या गटांतील कित्येक लोकांनीं कीर्तीचा नक्षाही पार उतरवून टाकला होता. ह्या कंपूतल्या लोकांचा स्वतः मोठें होण्यापेक्षां मोठीं माणसें निर्माण करण्यावर विशेष भर होता. त्यांच्यापैकीं अनेक सज्जन कधींही सार्वजनिक रीत्या व्यासपीठावर वा समारंभांत आलें नाहींत, किंवा त्यांनीं सार्वजनिक कार्यही केलें नाहीं. पण ती "चक्री" म्हणजे विजेचा एक कारखाना होता. दिवा कुठेंतरी दूर लागे, धक्का कुठेंतरी लांब बसे, पण चेतना स्फूर्ति आणि शक्ति मात्र तिथूनच मिळे! मावकर त्या कंपूंत आले आणि त्यांनीं व्यवहारी पूर्णांकांना राम राम ठोकला. **वि. घ. देशपांडे** त्यांच्या सहवासांत येतात न येतात तोंच त्यांनीं सरकारी नोकरीचा स्वयंस्फूर्त राजिनामा दिला व एका नव्याच सैराट जीवनाला प्रारंभ केला! विपत्तीच्या काळांत भगवा ध्वज ह्याच शूर लोकांनीं झुंजत ठेवला. कांहीं जुन्या पणत्या आज विझल्या आहेत, कांहीं फुटून गेल्या आहेत, पण जळत्या ज्योतींची परंपरा आजही कायम आहे, तेजोदानाचें अमोल कार्य त्यांच्या हातून होऊन गेलें आहे!

~ ~ ~

मावकरांचें सबंध आयुष्य म्हणजे उत्पातांची अखंड मालिका होती. त्यांच्या अल्प आयुष्यांत नाट्य व प्रसंग ह्यांची रेलचेल आहे. आज मावकरांविषयीं लिहितांना स्मृति सैरावैरा धावत सुटते आणि हात जागच्या जागीं थबकतो. आठवणीच्या स्मशानभूमींतील प्रत्येक खुणेच्या प्रस्तरावर मस्तक टेकण्याचा मनाला अनिवार मोह होतो. मावकर मला प्रथम भेटले, तेव्हां आयुष्य आणि उल्हास ऐन बहरांत होती. हिस्लॉप कॉलेजांत मी ज्यूनिअर बी. ए. चा विद्यार्थी असतांच मावकरांची नजर माझ्यावर आणि माझी त्यांच्यावर पडली. कांहीं विशेष प्रकारचीं माणसें मावकरांना प्रथमदर्शनींच आवडत. नाजुक संभाविती दाखविणाऱ्या माणसापेक्षां जास्त उखडेल माणूस त्यांना चट्कन्

आकर्षित करी. वक्रगति मितभाषणापेक्षां फटकळपणाचे उघड हल्ले त्यांना जास्त पत्करत. धोपट मार्गानें जाणाऱ्या जीवापेक्षां, एखादी लोकविलक्षण लकब दाखविणाऱ्या वल्लींत त्यांना जास्त शक्यता दिसत व तीविषयीं ते अधिक अनुकूल मत करून घेत. प्रथमदर्शनींच परस्परांच्या सजातियत्वाविषयीं आमची मनोमन निश्चिती पटली. त्या दिवसांत मुंजेअभ्यंकर वाद निकराला पोंहोंचला होता. कॉलेजच्या तासांना बुट्टी मारून वामनराव लघाट्यांच्या हॉटेलांत आम्हीं तासन् तास गप्पा मारीत असूं. "**महाराष्ट्र भाषासंवर्धक मंडळाच्या**" व्यासपीठावर माझें भाषण असलें, कीं मावकर मला हटकून समोरच्या खुर्चीवर दिसत. एके सायंकाळीं कसल्यातरी राजकीय विषयावरील वादविवाद आटोपल्यावर माझ्याजवळ येऊन मावकर म्हणाले, "भावे, मी तुम्हांला खायचें ठरविलें आहे! तुम्हीं तयार रहा!"

१९३५ सालीं श्री. **वि. घ. देशपांडे** हे "**स्वच्छन्द**" नांवाचें साप्ताहिक चालवीत असत. त्या साप्ताहिकांत मॉरिस कॉलेजांतील विद्यार्थिनींनीं केलेल्या सार्वजनिक नृत्यावर मीं दोन टीकालेख लिहिले. त्या लेखांमुळें बऱ्याच कलावंत नवमतवादींचीं मनें घायाळ झालीं, पण कांहीं बुरसटलेल्या लोकांना माझे दोन्ही लेख आवडले. माझें अभिनंदन करणाऱ्या "प्रतिगामी" लोकांपैकीं मावकर एक होते. मला लवकरच "खाऊन टाकण्याचा" आपला इरादा ह्यावेळीं त्यांनीं पुन्हा एकदां बोलून दाखविला. लवकरच श्री. **मावकर** ह्यांनीं सुप्रसिद्ध "सावधान" पत्र काढलें व एके सायंकाळीं मला शुक्रवार तळ्याच्या पाळीवर नेऊन माझा वर्तमानपत्री लेखक बनवून टाकण्याचा आपला निश्चय त्यांनीं पुन्हा एकदां प्रगट केला. माझ्यासारख्या आळशी अवलियाला साप्ताहिक लेखनाचें जीव खाणारें काम जमणार नाहीं, म्हणून सोडवणूक करून घेण्याचा मीं प्रयत्न केला, पण श्री. मावकर माझ्या गुरूचेही गुरु होते. त्यांनीं मला पंडितजींच्या वाड्यांतील एका खोलींत बंद केलें, माझ्या समोर लेखनसाहित्य आणून ठेवलें, बऱ्याचशा सिगारेटसचा मला आहेर केला व दाराला बाहेरून कडी लावून त्यांनीं मला अस्सल नागपुरींत जतावलें,–'लेहा, ढोल, लेहा! लेहेन संपल तेव्हांच तुम्हांस सोडीन!"

आणि खरोखरच त्या दिवशीं त्यांना हवा असलेला लेख मीं लिहून दिला व त्यानंतर सतत चार वर्षें कित्येकदां "**सावधान**"च्या एका

कव्हरपासून दुसऱ्या कव्हपर्यंत पुरेल, इतका मजकूर मी प्रसवूं शकलों ! शिव्या देऊन किंवा ओव्या गाऊन मला लिहितें करण्याची कला केवळ मावकरांनाच साधली. स्तुतिपेक्षांही खमंग लागतील अशा शिव्या मावकरांनाच देतां येत असत ! आणि शिव्यांच्या प्रमाणावरून मैत्रीच्या प्रमाणाचा अंदाज बांधण्याची नागपुरी रीत आहे !

~ ~ ~

त्या दिवसापासून कॉलेजपेक्षांही पंडितजींच्या त्या अंधेऱ्या, ओलसर वाड्यांत माझीं उपस्थिति नियमानें लागूं लागली. "**सावधान**"**चें** सारें महाकाव्य त्या वाड्यांत रचलें गेलें. साऱ्या हिंदुत्वनिष्ठांचें तें केंद्रस्थान बनलें. मधेंच **बाळाजी हुद्दार** खाद्यांवर धोतर टाकून तेथें फेरफटका करीत, **बुवा उपाध्ये** बैठक मारावयास येत, **श्रीमंत घटाटे** व **काळीकरांच्या** मोटारी उभ्या राहून जात, **श्री. महादेव हरोडे व गोपाळराव चिटणवीस** हंसून खिदळून जात आणि **श्री. खांडवेकर, श्री. वासुदेवराव फडणवीस, श्री. शंकरराव शास्त्री, श्री. जगन्नाथप्रसाद वर्मा, श्री. ऊळाभाजे, रामाजी काळी, बिंदुमाधव पुराणिक, श्री. राजा वढे, श्री. सबनीस, श्री. कात्यायन, चित्रकार वकील,** आदींच्या मैफली पडत. छापखान्याचा लयदार खटका, कागदाचा व लोखंडाचा विशिष्ट वास, समानशीलांचीं गप्पाष्टकें, रात्रींचीं जागरणें, आणि चंद्रप्रकाश व उषःप्रभेची सरमिसळ होत असतां **मावकरां**बरोबर देवदर्शनास जाणें ह्या मग मला नेहमींच्या गोष्टी होऊन बसल्या. ज्या साऱ्यांच्या हृदयाचा एकच सूर लागला आहे, अशा सवंगड्यांच्या सहवासांत निर्माण होणाऱ्या आनंदाचा आकंठ अनुभव तेव्हां मला आला. ते दिवस अगदीं जवळचे आहेत ! पण ते दिवस आतां कायमचे गेले, ही जाणीव होतांच पोटांत तुटूं लागतें व जरेची आणि विरक्तेतेची एक कळा शरीरावर व मनावर फिरून जाते ! "**सावधान**" ही एक आदर्श संस्था करावयाची, "**सावधान**"च्या लेखकांची व सहकाऱ्यांची एक आदर्श वसाहत वसवावयाची, हीं **मावकरांचीं** एके काळीं स्वप्नें होतीं. "**सावधान**" व **मावकर** दोघेंही आपलीं अवतारकृत्यें आटोपून निजधामास गेलीं व सारे मनोरथ पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें क्षणांत कोसळून पडले ! विनाशानें ओरबाडून काढलेल्या त्या ढिगाऱ्यांतून सांपडेल ती सामुग्री

घेऊन पुन्हा कामाला लागण्यांत फारच तर थंड श्वास सोडत केलेल्या कर्तव्याचें समाधान असेल, पण सांडलेल्या किंवा संपलेल्या सोबत्यांच्या खुणा चौफेर दिसत असतां, त्या कामांत आनंद किंवा उल्हास कसा वाटावा ?

" **सावधान** "साठीं सहकार्य देणाऱ्या लोकांस हिंदुत्त्वाची सेवा व **मावकरांचा** स्नेह हा मुशाहिरा अगदीं भरपूर वाटे. " **सावधान** "च्या सुरवातीच्या दिवसांत लिहिण्याचे काम संपवून मी मावकरांस जागे करी व ते डोळे चोळींत पुढील कामास लागत. त्यांचें काम संपतांच खालींच एका फळीवर देह ताणून व उशाला कसलेंतरी फाईल घेऊन बादशाहाप्रमाणें झोपलेल्या **पुराणिकांना** " **विंद्या** " म्हणून मावकर उठवित व ते आणि संघाचे श्री. मोहरीर घड्या घालावयास बसत. फैजपूर कॉंग्रेसचे वेळीं चांचणी परीक्षेस बुट्टी मारून मी व माझे सहाध्यायी **श्री. जोशी** ह्यांनीं कॉंग्रेसवाल्यांच्या मजलशींत " **एक आणा—सावधान !** " चें काम केलें. प्रसिद्धी, पैसा, किंवा कलेची सेवा ह्यांचे कौतुक **वासुदेवराव फडणवीस** किंवा **रामाजी काळी** ह्यांस मुळींच वाटत नसे. पण केवळ **मावकरांच्या** शब्दासाठीं हें दोन्ही गुणी लेखक मानेवर खडा ठेवून बसत. " **प्रतिभे** "कडून तारावर तारा येत असतांही हूं कीं चूं न करणारे फडणवीसांसारखें शब्दप्रभु **मावकरांचा** निरोप येतांच आपली गडबडा लोळवणारी पोटदुखी विसरून सरळ होत ! "**सावधान**"च्या अखेरच्या दिवसांत **गोडश्यां**सारख्या तरुण चित्रकारानेंही आपल्या कलेचा कारभार **मावकरांस** वाहावयास सुरुवात केली होती.

" साहित्यांत कायमचें स्थान घेण्यासारखें लिखाण " म्हणून ज्यांच्या वाग्विलासाचा बापूजी अणे व बाबाराव खापर्डे ह्यांनीं गौरव केला, त्या फडणवीसांचे लिखाण केवळ मावकरांनींच मिळविलें व मराठी वाङ्मयास उपकृत करून ठेवलें. **फडणवीस, काळी** ह्यांच्या योग्यतेचीं माणसें संग्रहित करावयास केवळ त्यांच्या स्वभाव कारणीभूत होता. दरिद्री व अनाठायीं अभिमानाचा रोग मावकरांस कधींच जडला नाहीं. आपले लेखक भाडोत्री नाहींत व आपले लेखक बिनतोड आहेत, ह्या गोष्टीचा **मावकरांस** अत्यंत अभिमान वाटे. माणसांचें व मजकुराचें संपादन करण्यांत **मावकर** अत्यंत वाकबगार होते. त्यांना तीव्र कल्पनाशक्ति होती, ते अत्यंत सहृदय होते व

कमालीचे रसिक होते. दुसऱ्यांचें गुण ओळखणें व त्या गुणांचें निर्मत्सरतेनें चोज पुरविणें हा त्यांच्या स्वभावांतील असामान्य असा विशेष होता. जास्त काबिल लेखकाच्या हातांत लेखणी असतां स्वतः लेखणी उचलण्यापेक्षां दुसऱ्याचें आत्मीयतेनें कौतुक करण्यांत त्यांना अपार आनंद वाटे व म्हणूनच त्यांच्या लेखकांपाशीं जें कांहीं उत्कृष्ट असे, तें त्यांस मिळे. "**सावधान**"साठीं लिहिलेले सारे लेख जुळाऱ्याकडे पाठविण्यापूर्वी तल्लीनतेनें वाचून दाखविण्यांत त्यांना एक और आनंद वाटत असे. **मावकरां**कडून आपला लेख वाचून घेण्याची आम्हांस संवयच जडली होती. त्यांच्या अस्खलित, सावेश वाचनानें आमच्या लेखांत एक नवाच अर्थ आम्हांस दिसूं लागे !

जन्मजात जिव्हाळयाच्या जोरावरच **मावकरांनीं** माणसें जोडलीं. एरवीं **फडणवीस** व **काळी** केवढे मातबर लेखक ! पण त्या दारूच्या थंड कोठारांचा रंगीबेरंगी उद्रेक दिसण्यासाठींसुद्धां **मावकरांची** पेटती ठिणगी पडणें अपरिहार्य होतें. आपल्या खेळाडू प्रेरणेनें त्यांच्या सुप्त शक्ति **मावकरांनीं** जागृत केल्या, व ओघळलेले मणी सूत्रबद्ध केले !

कसल्याही खडतर परिस्थितींत स्थितप्रज्ञपणें हसणारे **मावकर** हे खरोखरच एक जबरदस्त खेळाडू होते. **मावकरांची** पत्नी दिवंगत झाल्याचें कळतांच मी त्यांच्या भेटीला गेलों. आंगणांतच पाण्याचा ओघळ पाहून माझें काळीज चरकलें. मावकर जोत्यावर अगदीं कोरड्या डोळ्यांनीं बसले होते. त्यांनीं सिगारेट मागतांच मीं सर्व पाकीट त्यांच्या हातावर रितें केलें, तेव्हां तें हसून म्हणाले, 'जास्त सहानुभूति कशाला दाखवतां ? वाटायचें तें मागेंच वाटून गेलें. तयारी झाली होती !' कॉंग्रेस सरकारनें "**सावधान**"कडून जमानत मागितली तेव्हां त्यांची प्रिय पत्नी क्षयानें झिजत होती. "बायको लवकर मरणार नसेल तर तिला गोळी घालीन आणि पैसे गोळा करावयास निघेन" असे अतिरेकी उद्गार तेव्हां मावकरांनीं काढले होते. मावकर राक्षस नव्हते. त्यांचें पत्नीवर आत्यंतिक प्रेम होतें. गरिबीच्या संसारांतील तिच्या कर्तव्यपरायण प्रेमाला ते सदैव धन्यवाद देत. मृत्यूची स्पष्ट चाहूल लागलेल्या त्यांच्या पत्नीनें अवसानापूर्वी एक तास मावकरांना जवळ बसवून डोळे भरून पाहिलें व त्यानंतर त्यांना झोपावयास सांगितलें. मृत्यु कांहीं क्षणांवर आला असतां--"मावकरांना उठवूं का ?" म्हणून विचारलें

असतां " कशाला त्यांची झोपमोड करतां ? ते फार जागले आहेत ! " असें त्या मरणोन्मुख साध्वीनें उत्तर दिलें. तिच्याविषयीं मावकरांची काय भावना असेल हें सांगावयास कशाला पाहिजे ? पण तिला गोळी घालण्याच्या गोष्टी बोलणारे मावकर आम्ही वर्धा ते नागपूर केलेल्या एका मोटर प्रवासांत रजपूत इतिहासांतील कांहीं प्रसंग आठवून अश्रु ढाळूं लागले होते ! चंद्रशेखरांचें " **काय हो चमत्कार !** " म्हणतां म्हणतां देखील ते स्फुंदूं लागत !

~ ~ ~

मावकरांची पत्नी दिवंगत झाली होती. मुंबई सरकारनें सहा हजारांची दुसरी जमानत मागून " **सावधान** "ला नख लावलें होतें. मावकरांचा सार्वजनिक व वैयक्तिक संसार पूर्णपणें उधळला होता. सुख-दुःखाच्या ऊनसांवलीच्या खेळांत मावरकांच्या आंगावर एके दुपारीं ऐन कडकडीत ऊन तळपत होतें. हिस्लॉप कॉलजसमोरील त्यांच्या खोलीवर मी व श्री. **देशपांडे** गेलों तेव्हां स्टोवर भात खदखदत होता व भाताच्या वाफेंत कणकेचे गोळे शिजून निघत होते. पोळया लाटण्याची भानगडीची कलाकुसर त्या अनभिज्ञ विधुराला परवडण्यासारखी नव्हती. आणि अशा स्थितींत मी व श्री. देशपांडे महासभेच्या कार्यालयांतून सहज म्हणून त्यांच्या भेटीस गेलों. " जेवायला या " म्हणून मावकरांनीं निमंत्रण देतांच " अवश्य " असें आमच्या जिभेवरील सरस्वती वदली. मावकर व त्यांचा छोटा मुलगा बाबा हे आमचे यजमान झाले. पण कणकेच्या गोळ्यांचें तें भाग्यशाली पक्वान्न केवळ आमच्याच दाय-भागाचें नव्हतें. आम्हीं हात उष्टावतांच घामाघूम होत श्री. **वर्मा** जिना चढले, व मिष्टान्नाला विटलेल्या श्रीमान **तात्याराव काळीकरांनीं** त्यांचा पाठपुरावा केला ! लागलीच पाटांचें वर्तुळ वाढलें, कणकेच्या गोळ्यांचा छेद गेले, तुपाच्या पुरवणीस तेल आलें आणि भाजीची पाठ तिखटानें राखली ! व मग एक गर्भश्रीमंत, एक बेचिराख देशभक्त, एक होतकरू पुढारी, एक संपादक व एक अंड्यांतून निघालेला वकील, ह्यांची आंगतपंगत खूप हसत उठली ! मावकरांच्या चेहऱ्यावर क्षणभरच विषाद दिसला, पण लागलीच वर्मा, मी व देशपांडे ह्यांच्या खिदळण्याला साथ करीत ते म्हणाले, " ह्या गरीब विधुराकडे तुम्हांला पोटभर जेवायला मिळालें नाही तरी पोटभर हसायला खास मिळेल. "

मावकरांचा स्वभाव फाजील उपचारांची पत्राज बाळगणारा नव्हता. कोणत्याही परिस्थितींत त्यांच्या वर्तनाची सहजता ढळत नसे व न्यूनगंडाची बाधा त्यांना कधीं होत नसे. खांद्यावर शुभ्र धोतराचा सोगा टाकून, ट्विलचा शर्ट घालून व तिरपी टोपी झुकवून त्यांनीं बिलकूल न बिचकतां कोणत्याही राजपुत्राशीं हस्तांदोलन केलें असतें व ह्या अनुग्रहाविषयीं त्याच्याकडून आभारांची अपेक्षा बाळगली असती !

स्वातंत्र्यवीर **सावरकर** हे **मावकरांचे** बालपणापासून पुजलेले वीरपुरुष होते. **मुंजे** व **परमानंद** ह्यांनाही ते अतिशय मानीत असत. **मुंजांना** खालीं ओढण्याचे गांधीजनांचे प्रयत्न जितके अधिक होत, तितकाच त्यांचा मुंजांविषयीं आदर वाढत जाई. १९३७ सालीं वीर **सावरकर** प्रथमच नागपुरास आले, तेव्हां "पुंडलिका भेटीं परब्रह्म आलेंगा" म्हणून "**सावधान**"नें त्यांचा जयजयकार केला. त्या खेपेस सावरकर जातीनें मावकरांकडे गेले व "मला अगदीं घरीं आल्यासारखें वाटतें" असें म्हणाले तेव्हां तर मावकरांना आनंदाचा उमाळा आला. "भावे, ह्या माणसाची मीं स्वप्नांतही पूजा केली. ह्याचे पाय आज माझ्या घराला लागले. मी धन्य झालों !" ह्या शब्दांत मावकरांनीं आपला आनंद तेव्हां मजपाशीं व्यक्त केला.

"**न्यू थिएटर्स**" हे **मावकरांचे** आवडते चित्रनिर्माते होते. "**विद्यापति**" मधील संगीताची किंवा पार्श्वसंगीताची शीळ मी घालतांच ते एकदम "आह !" म्हणून डोळे मिटीत ! "**देवदास**" "**मंझिल**" "**सपेरा**" "**मुक्ति**" "**अधिकार**" "**विद्यापति**" ह्या बेहोष चित्रांचीं वाटतील तितकीं पारायणें करावयास ते सिद्ध असत. **शरद् चट्टोपाध्याय** हा त्यांचा आवडता कादंबरीकार होता, जमना ही त्यांची आवडती नटी होती व नागपूर हें त्यांचें आवडतें शहर होतें !

~ ~ ~

दैवाची गति मोठी कुटिल आहे. ज्या पंडितजींच्या पुरातन वाड्यांत "**सावधान**" जन्मला, जेथें त्यानें वृत्तपत्रीय विक्रमाचा उच्चांक गांठला, जेथें पुंडलिका भेटीं परब्रह्म गेलें, त्याच वाड्यांत अखेर **मावकरांचें** शव आलें. सावधान दर शनिवारीं प्रसिद्ध होत असे, मावकरांचें प्रेतही त्या वाड्यांत

शनिवार १२ एप्रिल, ४१ ला आलें. वास्तविक मावकरांचें वास्तव्य आतां त्या वाड्यांत नव्हतें. पण दैवाच्या इच्छेनें मावकरांचा मृतदेह मात्र तेथेंच आला. "**सावधान**"च्या जुळाऱ्यांची जेथें वर्दळ असे, "सावधान"चे लेखक जेथें लेखण्या सरसावून बसत, नेमका त्याच खोलींत मावकरांचा देह अंत्य दर्शनार्थ ठेवण्यांत आला. आजही "**सावधान**"चे लेखक, जुळारी व ऋणानुबंधी बाहेरच्या पडवींत बसले होते. असें वाटावें कीं जणूं कांहीं ते "**सावधान**"चा अंक काढण्यासाठींच एकत्र आले आहेत! परतु "**सावधान**"चा संपादक त्या ऐतिहासिक खोलींत निःशब्द पहुडला होता आणि अखेरचें कर्तव्य करण्यासाठीं आम्ही आज एकत्र जमलों होतों. **रामाजी काळी** ओल्या डोळ्यांनीं बसले होते, **फडणवीसांनीं** हाताच्या तळव्यावर डोकें टेकलें होतें, **हरोडे** आणि **कात्यायन** ह्यांना बोलतां बोलतां मुसमुसून हुंदके येत होते व जेथें दर शनिवारीं मुलें "**सावधान**"च्या अंकासाठीं गर्दी करीत, त्या पंडितजींच्या वाड्याच्या चौकांत बांबू आणि दोऱ्यांचें विणकाम चाललें होतें! दैवाच्या ह्या भीषण करामतीचा मला अत्यंत चमत्कार वाटला!

श्री. **जगन्नाथ प्रसाद वर्मा** वारले, तेव्हां प्रांतांतील प्रमुख मंडळी कांहीं निमित्तानें नागपुरांत एकत्र आली होती. ह्या योगास अनुलक्षून **मावकर** म्हणाले, "वर्मा पहा कसा आपल्या शेवटच्या सभेची व्यवस्था करून पुढाऱ्यासारखा मेला!" **मावकर** व **वर्मा** ह्यांचा बालपणापासून अकृत्रिम स्नेह होता. वर्मांना राजकारणाची स्फूर्ति मावकरांपासून मिळाली होती. मावकरांच्या निधनसमयीं वर्किंग कमिटीच्या बैठकीसाठीं देशांतील अग्रेसर हिंदु पुढारी नागपुरास आले होते, सावरकरांच्या स्वागतासाठीं स्टेशनवर गेले असतां त्यांच्या देहाच्या पायघड्या झाल्या व मावकरांसाठीं स्मशानांत प्रत्यक्ष स्वातंत्र्यवीरानें पुष्पांजलि वाहिली, ह्या घटनेस अनुलक्षून वर्मा मावकरांस स्वर्गांत खचित म्हणाले असतील "**कोंड्या, तूं अखेर संपादका-सारखाच मेलास!**"

"**संपादकांत गणना पहिली जयाची**" म्हणून समयस्फूर्त काव्य करीत मावकर कित्येकदां छातीला हात लावीत. हा त्यांचा अभिमान वृथा नव्हता. ध्येयासाठीं काढलेली आणि अखेर धंद्याच्या चाकोरीनें गिळून

टाकलेलीं वृत्तपत्रें आजही ह्या प्रांतांत आहेत. परंतु पायांत सोन्याचीं पैंजणें घालून मोहाच्या कित्येक रंभा समोर आविर्भाव करीत असतांही '**सावधान**'चें व्रत ढळलें नाहीं. अत्यंत अल्प अवकाशांत राजकीय व साहित्यिक क्षेत्रांत "**सावधान**"नें इतिहास केला, कारण "**सावधान**"च्या मागें निष्ठेचीं, पीळाचीं आणि कर्तृत्वाचीं माणसें होतीं. जगाचे कित्येक कटु अनुभव घेतल्यामुळें तुच्छतावादाची ( Cynicism ) लकब आलेल्या **फडणवीसांनीं** "**सावधान**"च्या पहिल्या दोन चार अंकांसाठीं लिहिण्याचें स्वच्छ नाकारलें, पण त्या प्रेमळ माणसाचा तुच्छतावाद "कोंड्याच्या" लोभापुढें फार वेळ टिकला नाहीं. **फडणवीस** व **काळी** ह्यांनीं लेखणी उचलतांच मावकरांनीं टांकाचें टोंक मोडून टाकलें व ते पायास चाक बांधून बाहेर निघाले. त्यानंतर मावकर लेखक राहिले नाहींत, ते संपादक झाले. सभा, बाररूम, गांवांतील अड्डे, हॉटेल्स, राजकारणी पुरुषांचीं भवनें इ. ठिकाणीं मिळणाऱ्या माहितीचा, विशिष्ट शब्दसमुच्चयाचा व विनोदाचा कच्चा मसाला ते आपल्या लेखकांच्या स्वाधीन करीत व त्यावर आपल्या प्रतिभेचें व कसबाचें संस्करण करून त्यांचे लेखक असें चमत्कार घडवून आणीत, कीं त्यामुळें साऱ्यांनीं थक्क व्हावें! सावधानचीं शीर्षकें, सावधानचे विशिष्ट शब्दप्रयोग, सावधाननें कित्येकांच्या मस्तकांवर ठेवलेल्या टोपणनांवांच्या टोप्या, ह्यांनीं दर सप्ताहास प्रांत दुमदुमून जात असे! विद्रूप, ढोंगी व सुतकी चेहेरा घेऊन संताळपणाचें दंतहीन हास्य हसणाऱ्या गांधीवादावर "**सावधान**"नें इतके बिनतोड हल्ले चढविले, कीं अल्पावकाशांतच सत्ताधारी गांधीजनांना अहिंसक साधुत्वाचे मुखवटे भिरकावून देऊन **राजद्रोहाच्या** आरोपाखालीं "**सावधान**"पासून चार हजारांची जमानत घेणें अवश्य वाटलें. उपरोध व उपहासाची वाघनखें लावून सतर्क आणि मर्मभेदी मारागिरी करणाऱ्या "**सावधान**"चें पारिपत्य करावयास मुंबईच्या "राष्ट्रीय" सरकारला देखील राजद्रोह व सहा सहस्रांची जमानत ह्यांखेरीज दुसरें हत्यार सापडलें नाहीं! परंतु "**सावधान**"चे तुफान हल्ले, दूध व मधानें माखलेल्या भाषेच्या चाहत्यास फारसे मानवत नसले, तरीही ते व्यक्तिद्वेषानें प्रेरित नव्हते. अत्यंत अदय व अदाक्षिण शत्रूंशीं सामना द्यावयास ठाकलेल्या "**सावधाननें**" माजघरांतील मंद व विनम्र कूजितें करणें सर्व दृष्टींनीं व्यर्थ ठरलें असतें. मार्गाच्या सूक्तासूक्ततेची बिलकूल तमा न बाळग-

ज्यांच्या जहरी प्रतिस्पर्ध्यांशीं "**सावधान**"ला मुकाबला द्यावयाचा होता, आणि वृत्तीनें जग[illegible] असणाऱ्या मावकरांवर हा अटीतटीचा सामना देण्याचा प्रसंग विरोधाभासानें [illegible] होता ! कॉंग्रेस मंत्रीमंडळानें सप्तपाताळांत गाडलेला जाकीर हुसेनचा गुन्हा मावकरांना वेशीवर टांगावयाचा होता, पायतणांचें एक दुकान थाटण्यास पुरेसे होतील एवढे जुते ज्या चिटणीस पार्कांतील ऐतिहासिक सभेनें कॉंग्रेस मंत्र्यांस अर्पण केलें, ती ऐतिहासिक सभा मावकरांस गाजवावयाची होती व लेखणीच्या टोकानें प्रधानमंडळें उलथवून देईल असें पत्र त्यांस संपादित करावयाचें होते ! खरोखर, "सावधानचा संपादक" हीच मावकरांची खरी पदवी होय. डॉ. **हेडगेवार, वर्मा** व **मावकर** हें हिंदुत्वाचे तीन वीर पाठशिवणीचा खेळ खेळत एका वर्षाचे अवधीत आम्हांस सोडून गेले. त्यापैकीं प्रत्येकांस स्वतंत्र असें अवतारकार्य होतें, वैयक्तिक स्वास्थ्याच्या व सुखाच्या कल्पनांस प्रथम तिलांजलि देऊन आश्चर्यकारक चिकाटीनें व द्रष्टपणें डॉक्टरांनीं ह्या देशांत अशी एक संघटना निर्माण केली, कीं जिचा प्रत्येक हिंदुत्वनिष्ठास अभिमान व आसरा वाटावा. श्री. **वर्मा** ह्यांनीं मध्यप्रांतांत डळमळूं पाहाणाऱ्या हिंदुसभेस पडत्या काळांत जीवापाड प्रयत्न करून सावरून धरलें, स्वीकृत कार्यात यश मिळविलें व अतिश्रमानें उरी फुटून त्यांचा अंत झाला ! मावकरांनीं तेजस्वी हिंदुत्वनिष्ठांची ह्या नगरांतील परंपरा अखंड राखली व सभोंवार असंख्य शत्रूंचा गराडा पडला असतां वृत्तपत्रीय आघाडीवर इतक्या शर्थीनें व हिंमतीनें हत्यार केलें, कीं हिंदुत्वाच्या शत्रूंनीं कायमची सलाबत घेतली आणि अराष्ट्रीय व प्रतिगामी गांधीवाद ह्या प्रांतांत पांगळा होऊन पडला !

बरोबर एक वर्षांपूर्वी चवतीसच्या तरुण वयांत मावकरांचा अवतार संपला. मावकर वयानें व वृत्तीनें इतकें तरुण होते, कीं एखाद्या फुलपाखराच्या मरणाविषयीं जितका भ्रम उत्पन्न व्हावा, तितकाच त्यांच्या मरणाविषयीं होतो. ते जसे उडत बागडत जगले, तसेच ते मेले ! मावकर समाजप्रिय, उल्हासप्रिय आणि उत्सवप्रिय होते, अनेक गुणदोषांनीं आकर्षक बनलेल्या मनुष्य नांवाच्या प्राण्याविषयींच त्यांना इतका प्रेमा होता, कीं एका नैसर्गिक प्रतिक्रियेनें त्यांच्या विषयींसुद्धां कुणलाही लोभच वाटावा ! मावकर आजारी पडून, खंगून, शय्याबद्ध होऊन मेले नाहींत. शेकडों माणसांचे श्वास परस्परांत मिळून जात

असतां, शेकडों शरीरें परस्परांच्या उष्णतेंत प्रसन्न झालीं असतां, शेकडों मुखांतून निघणारे शब्द प्रचंड कोलाहल करीत असतां, लोकसंघांच्या ऐन गर्दीत, घाईत, मृत्यूला त्यांना गांठावें लागलें! आपला काळा साज आणि भयानक परिवेष क्षणभर बाजूला ठेवून हसत खिदळत मृत्यूनें त्यांना उचललें! जेव्हां जयनादांनीं दिशा भरल्या होत्या, आभाळांत फुलें फेकलीं जात होतीं व सर्वत्र भगवे ध्वज फडकत होते तेव्हां मृत्यूकडे त्यांनीं झेप घेतली! खेळून खेळून तोंड लाल झालेल्या मुलानें अचानक आईच्या आसऱ्यास जावें, तसें मावकर क्षणार्धांत मृत्यूच्या आसऱ्यास निघून गेले.

मावकरांचा वैयक्तिक संसार केव्हांच उध्वस्त झाला होता. पत्नीच्या व मुलीच्या मृत्यूचे प्रहार त्यांच्यावर लागोपाठ पडले. त्यांच्या स्वभावांत वैराग्यपर व आध्यात्मिक भाग नेहमींच होता. हिमालयांत कांहीं काळ तपश्चरणास जाण्याची कल्पना ते वारंवार बोलून दाखवीत. "भावे तुम्ही वकील व्हाल, लग्न कराल, तुम्हांला मुलंबाळं होतील आणि मग एक दिवस तुमच्या दारांत संध्याकाळीं एक साधू येऊन उभा राहील, मग तुम्ही विचाराल—कोण मावकर?" हे त्यांचें उद्गार मला आज आठवतात व मनाला तीव्र वेदना होतात. कोणताही बैरागी दिसला कीं मला **मावकर** आठवतात आणि परवांच मी मुंबईला **न्यू थिएटर्सचें "डॉक्टर"** हें उत्कृष्ट चित्र पाहिलें, तेव्हां मला वाटलें, कीं हें चित्र पाहाण्यासाठीं मावकर निश्चित कुठूनतरी येणार आहेत!

—खरोखर, जें झालें तें अत्यंत भयंकर व अकल्पित झालें!

~ ~ ~

—१२ **एप्रिल १९४१**!

तो एक ओलसर छायाबहुल असा अकाल दुर्दिन होता. आज मेलनें नागपूरास सावरकर येणार होते. सकाळपासून पावसानें संतत धार धरली होती. पावसांतच मी, देशपांडे व मावकर कार्यालयांतून स्टेशनवर गेलों. माझ्या हातांत त्या दिवशीं निघालेला "**आदेश**"चा तिसरा अंक होता. "**आदेश**"च्या दुसऱ्या अंकांतील लेख मावकरांनीं आम्हांला धांवत्या टांग्यांत वाचून दाखविले होते. पहिल्या अंकाची गॅलीभर मुद्रितें तपासून मावकर म्हणाले होते, "हं, माझ्या हातानें आदेशचा मुहूर्त झाला!" आतां माझ्या पाठीवर थाप देत ते म्हणाले, "लेख सुंदर साधला आहे. फिका नाहीं व भडक नाहीं. घाईत लिहिला आहे!" मित्रानें मित्राचें केलेलें तें अखेरचें कौतुक आहे ह्याची मला कल्पना

नव्हती. मावकरांची अमोघ वाणी दहाच मिनिटांत बंद पडेल, अर्ध्या तपाच्या आमच्या मैत्रीचा आतांच शेवट होईल व त्यांच्याच प्रेरणेनें उचललेल्या लेखणीवर त्यांच्या आठवणी लिहीत बसण्याचा प्रसंग येईल अशी तरळतीही शंका तेव्हां मला आली नाहीं. अतिरिक्त धूम्रपानानें आज मावकर किंचित् ठसकत होते, पण ते जीवनानें नेहमींइतकेंच रसरसलेले होते.

प्लॅटफॉर्मवर लोकांची झुम्मड होती. वातावरणांत पुष्पहारांचा सुवास तरंगत होता. आभाळांत मधूनच मेघ गुरगुरत होते. स्टॉलवर चहा पिऊन सिगरेट ओढत आम्ही मेलच्या फलाटावर गेलों. गर्जना आणि जयजयकारांचा कल्लोळ माजला होता. गाडी आली. सावरकरांचा डबा पुढें गेला. लोक तिकडेच धावले. मावकर आणि मी ह्यांत कांहीं लोक आले. सगळ्यांच्या नजरा सावरकरांच्या डब्याकडे होत्या. गर्दी—गोंधळ—ओरडा—धावपळ!! क्षणार्धांत कांहीं तरी झालें आणि एकाच क्रियेनें अकस्मात् सार्‍यांच्या वाचा बसल्या. थोडा वेळ सारीकडे गाढ स्तब्धता होती. नंतर कुणाच्यातरी तोंडून शब्द निघाले—

**" गाडीखालीं सापडले—मावकर गाडीखालीं सापडले ! "**
**" गाडीखालीं गेले ! मावकर ? मावकर ? मावकर ? "**
**" मावकर !—मावकर !—मावकर ! !**

फलाटाच्या एका टोकापासून दुसर्‍या टोकापर्यंत आर्त, चकित, अनैसर्गिक आवाज उमटले. डॉ. **परांजपे** खचून बांकावर बसले. नामदार **काळीकरांना** मूर्च्छना आली. चार चौघांनीं मावकरांचा देह वर काढला. चेहरा चादरीसारखा पांढरा पडला होता. मान सैल लोंबत होती. डोक्याला मागें ठोकर लागली होती. खांदा फाटला होता. पांखरू केव्हांच उडून गेलें होतें. स्ट्रेचरवरून शरीर चालविलें; फलाटावर दाट, तांबड्या रक्ताचे थेंब ठिबकत होते. तिसर्‍या फलाटापासून पहिल्या फलाटापर्यंत रक्ताचा माग लागला. तें मावकरांचें रक्त होतें. त्यावर शेकडों डोळ्यांतून आसवें सांडलीं. कुणी हळवे होते ते धोतरें सांवरून जपून पावलें टाकीत गेले आणि कुणी बेदरकार होते ते खुशाल तसेंच तुडवत पुढें चालले !

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
[समाप्त]
१२—४—४२



काळ्याभोर
आणि
पाणीदार
डोळ्यांसाठीं
Asha
काजळ
आशा
काजळ
Asha
: कारखानदार :
आयडियल इन्स्टिट्यूट, प्रायव्हेट लिमिटेड
मुंबई २.




रक्ताची
उष्णता
व
अश्रूंची
शीतलता
ह्या दोहोंचे
गुण–धर्म

**सन् फ्लास्क**

१९४२ सालापासून
आज दिनांकापर्यंत
सांभाळीत आहे.

**: बनविणार :**

**व्हिक्टरी फ्लास्क कंपनी, मुंबई ३८**

# "कॅमल" म्हणजेच उच्च दर्जा!

आपल्या पैशाचा योग्य मोबदला आपणांस पाहिजे असेल तर आपण कॅमलचाच आग्रह धरा. आमची शाई व ऑफीस पेस्ट हीं लोकप्रिय आहेत, कारण केवळ उच्च प्रतीची द्रव्यें, शास्त्रशुद्ध कृती व आकर्षक पॅकिंग-यामुळेंच कॅमल सर्वांच्या विश्वासाचे प्रतीक बनले आहे.




## कॅमल शाई व पेस्ट

सर्व गुणांत श्रेष्ठ

कॅम्लीन प्रायव्हेट लि. CAMEL INK * CAMEL INK * CAMEL INK * मुंबई-१६

CML.56.5 MAR

चोखंदळ गिऱ्हाईकांचे आवडते कापड दुकान

# आठवले, शाहाडे आणि कंपनी (प्रा. लिमिटेड)

(स्थापना १९१५)

टेलिफोन नं. २७५७९ टेलिग्राफ "Stepin"

आमचे येथें

- शर्टिंग, कोटिंग आणि मिलचे इतर कापड.
- सर्व पेठांची जरी व सुती पातळे.
- बनारसी शालू, शेले व कद.

तसेच

- इतर सर्व तऱ्हेचे कापड माफक दरांत मिळते.

दुकानाच्या वेळा : सकाळीं ९ ते १२ दुपारी ३ ते ८,
दर शुक्रवारी दुकान बंद राहील.

मॅनेजिंग डायरेक्टर

**गोपाळ गणेश आठवले**

**आठवले, शाहाडे आणि कंपनी, प्रा. लिमिटेड.**

- मुंबईत अगर बृहन्मुंबईत कोठेहि शाखा नाहीं.

IRBK-0106931

IRBK-0106981

# के. एच्. ढमढेरे

**कच्च्या सुगंधी मालाचे व्यापारी**

**४५ । ४७ प्रिन्सेस् स्ट्रीट्, मुंबई २.**

**तार**—Surework

**दूरध्वनी**
**३०६८३**

साबण, सुवासिक तेलें, सौंदर्यप्रसाधनें, उदबत्त्या, तपकीर, जर्दा, दंतधावनें, वगैरे सौगंधिक पदार्थ बनविण्यास लागणारी इसेन्शिअल ऑईल्स्, अॅरोमॅटिक केमिकल्स, परफ्युमरी, कंपाऊन्डस्, वगैरे कच्ची द्रव्यें मिळण्याचें विश्वसनीय ठिकाण—

**शाखा**
४४।४५ इझरा स्ट्रीट
**कलकत्ता १**

**शाखा**
पंडियन टेम्पल रोड
**कोचीन २**

**अवश्यं पठनीयम्**

आत्मानं सुशिक्षितं मन्यमानेन प्रत्येकेन जनेन

# OUR NATIONAL LANGUAGE
## WHAT DEFINITION SCOPE, & CHOICE?

निर्विकारतया, शास्त्रशुद्धरीत्या च लिखिते — अस्मिन् पुस्तके—

**श्री· यथार्थदर्शी**

आधुनिक चिकित्सापूर्ण तर्ककर्कश पद्धत्या प्रस्थापयति

**यत् संस्कृत भाषा एव**

भारत–राज्यभाषा–राष्ट्रभाषापदे प्रतिष्ठापनीया न हिन्दी, न आङ्गला, न अन्य–कापि भाषा इति! अस्य सिद्धान्तस्य खण्डनं न कापि कर्तुं शक्यति इति लेखकस्य आह्वानम्!! स्वीकरोतु कोऽपि!!!

मुंबई, पुणे, नागपूर, बडोदा, इत्यत्रस्थात् कस्मादपि प्रसिद्ध पुस्तकविक्रयालयात् अथवा —

**अ. भा. संस्कृत राष्ट्रभाषा कारिणी–सभा**

३१८ चर्नीपथः मुंबई ४

इत्यत्रतः प्राप्यते इदं पुस्तकम्।

मूल्यम् केवलं सार्धरूप्यकं प्रेषण–मूल्य सहितम्–

**space Donated by**

# L. KANT & Co.

Manufacturers of

Neon Signs, Glow Signs, Mercury Switches etc.

Tel. 22539 | **BOMBAY 4.** | Grams. KANTCo.

आपल्या मुलांना शक्तीकरितां

# डोंगरे
# बालामृत

द्या

: निर्माते :

के. टी. डोंगरे आणि कंपनी
(प्रा. लिमिटेड)
मुंबई—कानपूर



# plato

## लेखनांतील आनंद प्लेटो पेननें द्विगुणित होतो

लाखों लोकांनीं तें वापरून पसंत केलें आहे. घडण आणि उपयुक्तता या बाबतींत तें परदेशांत तयार होणाऱ्या उत्तम पेन्सच्या तोडीचें आहे.



खालील वैशिष्ट्यांतून आपली निवड करा.

★ तऱ्हेतऱ्हेचे आकर्षक रंग
★ शाई भरण्याच्या वेगवेगळया तऱ्हा
★ गोल्डप्लेटेड १४ कॅरट निब
★ ४ रुपयांपासून १८ रुपयांपर्यंत निरनिराळया किंमती

PLATO म्हात्रे प्रॉडक्ट

Shilpi-M. P. 533 MAR

व्यापारविषयक सर्व चौकशीसाठीं:
सोल डिस्ट्रिब्यूटर्स:
**बेस्ट फाउंटन पेन डेपो,**
७९, देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.

# शास्त्रशुध्दता
आणि
# विश्वसनीयता
यांची
# परंपरा

शास्त्रशुद्ध औषधीनिर्मितीची प्राचीन परंपरा अर्कशाला गेली तीस वर्षें निष्ठेनें पाळीत आहे. तज्ज्ञ चिकित्सक व प्रतिभाशाली संशोधक यांचें सहकार्य अर्कशालेस सतत लाभलेलें असून अर्कशाला औषधांच्या श्रेष्ठ गुणकारित्वाविषयीं सर्वत्र गाढ विश्वास व्यक्त होत आहे.

**युटोन** स्त्रियांकरितां आरोग्यरक्षक टॉनिक

**वसंत मिश्रण** आदर्श सुवर्णयुक्त टॉनिक

**शिशुजीवन** मुलांच्या दम्यावर गुणकारी

**लोहित** रक्तवर्धक, पौष्टिक

विश्वसनीयतेचें बोधचिन्ह

## आयुर्वेदीय अर्कशाला लिमिटेड, सातारा

मुंबई विक्रीकेन्द्र: २१८, गिरगांव, केळेवाडी नाका, मुंबई ४

change now to

# LIQUID SPICES

They're better than old-fashioned powder spices because they never

- deteriorate
- cause heartburn or thirst
- lose flavour or nutritive qualities

LIQUID SPICES
ARE ALSO
MORE ECONOMICAL

**SAIBA INDUSTRIES**

*Sole Selling Agents*

For Bombay, Madhya Pradesh, Rajasthan, Andhra and for exports

**AKBARALLY EBRAHIMJI**

Veer Nariman Road, Bombay 1.

*For Mysore*

**Nargundkar Brothers and Co.**

3503 Fort, Gadag